# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार ११ जून २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०







## राजस्थानात 11 जण वाहून गेले

### 8 जणांचे मृतदेह सापडले

**जयपूर :** पिकनिकसाठी राजस्थानच्या जयपूरहून टोंकमध्ये आलेल्या ११ तरु णांसोबत भयावह घटना घडली आहे. बनास नदीत अंघोळीसाठी उतरलेले हे ११ जण वाहून गेले आहेत. यापैकी आठ जणांचा बुडून मृत्यू झाला आहे. बनास नदीमध्ये हे ११ तरु ण



अंघोळीसाठी उतरले होते. परंतू पाण्याचा अंदाज न आल्याने हे सर्वजण बुडाले आहेत. दुपारी १२ वाजण्याच्या सुमाराची ही घटना आहे. बनास नदीच्या एका जुन्या पुलापाशी हे तरु ण पिकनिकसाठी आले होते. स्थानिकांनुसार सर्वजण एकत्रच पाण्यात उतरले होते. परंतू, काही वेळातच पाण्याचा वेग वाढला आणि सर्वजण एकामागोमाग एक पाण्यात खेचले गेले. स्थानिकांनी आरडाओरडा करत पोलिसांना याची माहिती दिली. टोंक पोलिस आणि एसडीआरएफची टीम तिथे पोहोचली परंतू तोवर उशीर झाला होता. या तरु णांना शोधण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन सुरु करण्यात आले. यावेळी ८ तरु णांचे मृतदेह सापडले आहेत. (पान २ वर)

## पेरण्यांची घाई नको; 15 नंतरच मोसमी पाउस

### ■ मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाऊस, पीक पाणी परिस्थितीचा आढावा ■

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाउस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतक-यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषि विभागाने केले आहे. तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाउस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी, मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज पाउस, पीक पाणी, धरणाच्या जलाशयातील पाणी साठा आदीचा आढावा घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातील पीक पाणी, पेरण्या खते पुरवठा याबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्यातील सर्व भागात पंधरा जून मोसमी पाउस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतक-यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पंधरा जून नंतरच पावसानंतर मार्गक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्यातील सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्के पेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात



शंभर टक्के हून अधिक पाउस झाला आहे. राज्यातील विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

**मोसमी पाउस तीन चार दिवसांत सक्रिय-** मोसमी पाउस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. दक्षिण व्दीपकल्पीय भारताच्या भूभागातील कर्नाटकात १२ ते १५ जून दरम्यान आणि कोकण आणि गोवा येथे १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाउस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली. त्यांनी सांगितले की, मोसमी पावसाच्या मार्गक्रमणासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होण्याची शक्यता येत्या तीन ते चार दिवसांत आहे. त्यानुसार मध्य महाराष्ट्रात १२ जून (पान २ वर)

## राज्यातील कोरोनाबाधित रूग्णांचा आकडा 1300 पार!

**मुंबई :**महाराष्ट्रात कोरोनाबाधित रु ग्णांच्या संख्येत झपाट्याने वाढ होउ लागली. शनिवारी, राज्यात आणखी ८६ रु ग्णांची नोंद करण्यात आली. त्यामुळे राज्यातील कोरोनाबाधित रु ग्णांची संख्या १ हजार



३६२ वर पोहोचली आहे. जानेवारीपासून राज्यात एकूण १८ कोरोनाबाधित रु ग्णांचा मृत्यू झाला आहे. अशा परिस्थितीत नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. राज्यात पुणे शहरात ३१ रु ग्ण आढळले. तर, मुंबईत २८ रु ग्ण आढळले. जानेवारीपासून १६ हजार २२६ चाचण्या घेण्यात आल्या. मुंबईतील एकूण रु ग्णांची संख्या ६४० वर पोहोचली आहे. गेल्या महिन्यात ६३४ कोरोनाबाधित रु ग्णांची नोंद करण्यात आली होती.महाराष्ट्रात आतापर्यंत १८ कोरोनाबाधित रु ग्णांच्या मृत्यूची नोंद झाली, जे इतर राज्यातील तुलनेत जास्त आहेत. मृतांमध्ये पार्किन्सन, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि इतर गंभीर आजार असलेल्या रु ग्णांचा समावेश आहे. राज्य आरोग्य विभागाने नागरी संस्थांना ऑक्सिजन सुविधांसाठी म ?क ड्रिल करण्याचे आदेश दिले आहेत. आरोग्य विभाग सतत लक्ष ठेवून आहे. रु ग्णालयांना सतर्क ठेवण्यात आले आहे. दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये, लोकांना पुन्हा मास्क घालण्याचा आणि गर्दी टाळण्याचा सल्ला देण्यात आला. वृद्ध, मुले आणि आधीच आजार असलेल्या लोकांनी विशेषत: सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे, असे अधिका-याचे म्हणणे आहे.

### आता मद्यप्रेमींच्या खिशाला बसणार झळ!

## दारू महागली, मंत्रिमंडळाकडून उत्पादन शुल्कात वाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** काही दिवसांपूर्वी देशात बिअरचे दर कमी होतील अशा बातम्यांमुळे मद्यप्रेमींना आनंद झाला होता. मात्र, आता राज्य सरकारने

### राज्य सरकारचा मोठा निर्णय



**बाटलीची किरकोळ विक्रीची किमान किंमत**

- देशी मद्य - 80 रूपये
- लिकर (MML) - 148 रूपये
- विदेशी मद्य- 205 रूपये
- प्रिमियम ब्रँड - 360 रूपये

उत्पादन वाढवण्याच्या दृष्टिकोनातून दारू विक्रीवरील कर वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे मद्यप्रेमींच्या खिशाला मोठी झळ बसणार आहे.राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या उपायांना आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या विभागाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने सचिवस्तरीय अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. या गटाने मद्यनिर्मिती धोरण, अनुज्ञप्ती, उत्पादन शुल्क तसेच कर संकलन वाढीसाठी इतर राज्यातील राबविण्यात येत असलेल्या चांगल्या पद्धतींचा, धोरणात्मक बाबींचा अभ्यास करु न शासनास शिफारशी व अहवाल सादर केला. त्या अनुषंगाने उत्पादन शुल्क विभागाच्या सुधारित आकृतीबंधास तसेच विभागाचे (पान २ वर)



## विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार मंत्रालयात पार पडली. राज्यातील शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ६२५० रु पयांची वाढ, पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात १०,००० ची वाढ, तर बी.एस्-सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनाही मिळणार ८,००० विद्यावेतन (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग) शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आंतरवासिता प्रशिक्षण काळात दरमहा १ हजार ७५० रुपये विद्यावेतन मिळत होते. (पान २ वर)

## 14 चिनी नागरिकांचा जीव वाचला

### चीनने मानले भारतीय नौदल आणि मुंबई कोस्ट गार्डचे आभार

**कोच्ची :** केरळच्या किनारपट्टीनजीक सिंगापूरच्या मालवाहतूक जहाजाला लागलेली आग विझवण्याचं काम अद्याप सुरू आहे.



भारतीय नौदलाचो आयएनएस सूरतने या जहाजावरील १८ सदस्यांना सुरक्षित बाहेर काढले आहे तर ४ क्रू मेंबर्स अजूनही बेपत्ता आहेत. या जहाजाला रविवारी आग लागली होती. मागील २ दिवसांपासून भारतीय नौदल, कोस्ट गार्डसह संयुक्त अभियानाद्वारे मोहिम हाती घेण्यात आली आहे. भारतीय तटरक्षक दलाची जहाजे सचेत आणि समुद्र प्रहारी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. तटरक्षक दलाचे डोर्नियर विमान बचाव कार्याचे हवाई सर्वेक्षण करत आहे. मंगळवारी तटरक्षक दलाचे जहाज समर्थ देखील बचाव कार्यात सामील झाले. सोमवारी केरळ किना-यापासून सुमारे ४४ न ?टिकल मैल अंतरावर सिंगापूरच्या एका मालवाहतूक जहाजाचा अपघात झाला. कोलंबोहून मुंबईला (पान २ वर)

## राज्यातील 8 आयएएस अधिका-यांच्या बदल्या

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रशासनातील खांदेपालट सुरू च असून आताही राज्यातील आठ आयएएस अधिका-




यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. वरिष्ठ आयएएस अधिकारी नितीन पाटील यांची राज्याच्या कापूस उत्पादक विपणन महासंघाच्या व्यवस्थापक पदी बदली करण्यात (पान २ वर)

## ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील कुटुंबांना घरे देणार-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनामार्फत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी विविध राबविल्या जातात. या प्रवर्गातील नागरिकांना गृहनिर्माणच्या विविध योजनांच्या माध्यमातून हक्काचे घर दिले जाते. केंद्र शासनाने या वर्षी ३० लाख घरे राज्याला उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे कोणीही व्यक्ती बेघर राहणार नाही. ग्रामीण भागात अनुसूचित जाती व जमाती मधील नोंदीत असलेल्या प्रत्येक कुटुंबाला यावर्षी प्राधान्याने घर देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन



२०२३-२४ आयोजित पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे झाला त्यावेळी ते बोलत होते.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मृद व जलसंधारण संजय राठोड, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, आमदार संतोष बांगर आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. त्यात मानवता, समता, बंधुता आणि संधीची समानता आहे. भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून 'घरोघरी संविधान' (पान २ वर)

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठी कार्यवाही करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यानुसार आगामी विधिमंडळ अधिवेशनात विधेयक आणण्यात येणार आहे. सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यात २००५ मध्ये अनुसूचित जाती जमाती आयोगाची स्थापना करण्यात आली होती. केंद्र शासनामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग कार्यरत आहेत. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याशी निगडीत विषय वेगवेगळे असल्याने या दोन्हींकरिता स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची शिफारस केंद्रीय जनजाती परिषदेने केली आहे. त्यानुसार राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आले आहेत. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याच्या अनुषंगाने, तयार करण्यात आलेल्या विधेयकाच्या प्रारू पास मान्यता देण्यात आली. तसेच या आयोगाकरिता निर्माण केलेल्या २७ पदांना आयोगाच्या आस्थापनेवर हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली.

## प्रेयसीच्या सरणावर ऊडी; आयसीयूत उपचार सुरू

**नागपूर :**नैराश्यातून आत्महत्या करणा-या प्रेयसीच्या सरणावर उडी मारण्याचा प्रयत्न करणा-या तरु णाला नातेवाईकांनी मारहाण केली. ही घटना सोमवारी ९ जून रोजी सायंकाळी कामठीतील कन्हान नदीच्या शांती घाटावर घडली आहे. मारहाणीनंतर बेशुद्ध झालेल्या तरु णावर सध्या रु ग्णालयात उपचार सुरू आहेत.दरम्यान, प्रेयसीच्या मृत्यूनंतर व्यथित झालेल्या तरु णाने थेट तिच्या सरणावर उडी मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी अन्त्यसंस्काराला आलेल्या तरु णीच्या नातेवाईकांनी चितेवर उडी मारणा-या तरु णाला जबर मारहाण केली. कामठी पोलिस ठाण्याच्या हद्दीत अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. प्रेमभंगाने निराश झालेल्या तरु णीने आत्महत्येचे पाउल उचलले. तिच्यावर अन्त्यसंस्कार सुरू असतानाच अचानकपणे तरु ण त्या ठिकाणी आला. त्याने सरणावर उडी घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तिथे हजर असलेल्या लोकांनी त्या तरु णाला चोप दिला. तरु णाला लोकांच्या मदतीने रु ग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. त्याच्यावर अतिदक्षता विभागात (आयसीयू) उपचार सुरू आहेत.




## आरोपीस शिलाँग पोलिस घेऊन रवाना

### सोनम कोलकाताला पोहोचली, येथून गुवाहाटीला नेणार

**इंदूर/वृत्तसंस्था :** इंदूरचे वाहतूक व्यावसायिक राजा रघुवंशी (२९) यांच्या हत्या प्रकरणात मंगळवारी एक नवीन खुलासा झाला. पती राजा यांची हत्या केल्यानंतर, सोनम रघुवंशी २५ मे रोजी शिलाँगहून सिलीगुडीमार्गे ट्रेनने इंदूरला पोहोचली. सोनम इंदूरला आल्यानंतर भाड्याच्या खोलीत राहिली. सोनमला वाराणसीमध्ये एका ड्रायव्हरने सोडले, तेथून ती गाझीपूरला पोहोचली. दरम्यान, इंदूरमध्ये, गुन्हे शाखा आणि मेघालय पोलिसांचे पथक आज आरोपी



विशालच्या घरी पोहोचले. गुन्ह्याच्या वेळी घातलेले कपडे जप्त करण्यात आले. गुन्हे शाखेच्या एसीपी पूनम चंद्र यादव यांनी सांगितले की, विशालनेच प्रथम राजा रघुवंशीवर हल्ला केला.मेघालय पोलिसांनी सोनमला पाटण्याहून विमानाने कोलकाताला नेले. येथून तिला गुवाहाटीला नेले जात आहे. येथून तिला शिलाँगला नेले जाईल. सोनम सुमारे ६ तास पाटणा पोलिस ठाण्यात राहिली, ती टेबलावर (पान २ वर)

## इंदूर विमानतळावर आरोपीला मारहाण



राजा रघुवंशी हत्या प्रकरणातील चार आरोपींपैकी एकाला इंदूर विमानतळावर उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने थप्पड मारली. सुशील लकवानी म्हणाले, 'मी त्याला (राजा रघुवंशी प्रकरणातील आरोपी) मारले कारण मला इंदूरच्या एका रहिवाशाची हत्या झाल्याचा राग आहे. त्यांना फाशी दिली पाहिजे. महिलेने पूर्ण नियोजन करून त्या पुरूषाची हत्या केली.'

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा 26 वा वर्धापन दिन

### 50 टक्के महिलांना निवडून द्या -शरद पवार

**पुणे/प्रतिनिधी :** मुलींना संधी मिळाल्यानंतर त्यांनी जनतेमध्ये विश्वास निर्माण करण्याचे काम केले. अगदी सैन्य दलातही ते दिसून आले. ऑपरेशन सिंदूरबाबत दोन महिलांनी माहिती देउन हे सिद्ध केले. भगिनींना संधी मिळाली तर त्याही कर्तृत्व दाखवू शकतात. राष्ट्रवादी काँग्रेसने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. निवडणुकीत ५० टक्के जागा महिलांना दिली जाणार आहे. दोन-तीन महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहे. त्यात ५० टक्के महिलांना निवडून द्या, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार (पान २ वर)




### मी खिशात पैसे घेउन बसतो काय?

#### दादानी शिवसेनेच्या मंत्र्यांना सुनावले

**पुणे/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा (अजित पवार) आज २६ वा वर्धापन दिन पुण्यात साजरा झाला. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना अजित पवार यांनी राज्यातील राजकारणासह विविध विषयांवर भाष्य केलं. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भारतीय जनता पक्षाबरोबर म्हणजे महायुतीबरोबर जाण्याचा निर्णय कधी व का घेतला? याबाबत देखील (पान २ वर)







# पान १ व १०

## राजस्थानात 11 जण वाहून गेले

अजून तीन जणांचा शोध सुरु आहे. या सर्वांना सआदत हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले असून त्यांच्या कुटुंबियांना देखील कळविण्यात येत आहे. डॉक्टरांनी या सर्व आठही जणांना मृत घोषित केले आहे. गावक-यांनुसार ज्या भागात ते उतरले होते तो खोलगट आहे. यामुळे अनेकजण तिथे बुडालेले आहेत. दुसरीकडे हॉस्पिटलमध्ये मोठ्या संख्येने मृतांचे नातेवाईक, स्थानिक जमा झालेले आहेत. सर्वजण जयपूरचे असल्याचे सांगितले जात आहे. मृतांमध्ये नौशाद (वय ३५, रा. हसनपुरा), कासीम, रा. हसनपुरा, फरहान, रा. हसनपुरा, रिजवान (२६, रा. घाटगेट), नवाब खान (२८, रा. पानीपेच कच्ची बस्ती, बल्लू, रा. घाटगेट), साजिद (२०, रा. घाटगेट), साजिद (२०) रा. (३०, रा. रामगंज बाजार) यांचा मृत्यू झाला, तर शाहरुख (३०, रा. घाटगेट), सलमान (२६, रा. घाटगेट), समीर (३२, रा. घाटगेट) यांचा समावेश आहे.

## 14 चिनी नागरिकांचा

जाणारे सिंगापूरचा झेंडा असलेले जहाज एमव्ही वान है ५०३ अचानक आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. आगीमुळे जहाजात मोठा स्फोट झाला. या जहाजावर जवळपास ६५० कंटेनर आहेत, ज्यातील अनेक कंटेनर समुद्रात पडलेत. ज्या वेगाने ही आग भडकत आहे त्यामुळे जहाजातील कंटेनर्समध्ये एखादे ज्वलनशील रसायन असू शकतो असे म्हटले जाते. सध्या जहाज कंपनी कंटेनर्स मालकांकडून त्यांनी ठेवलेल्या सामानाची माहिती मागवत आहे. नौदलाचं जहाज आयएनएस सुरतने आग लागलेल्या जहाजावरील १८ क्रू मेंबर्सना वाचवले आहे. काही क्रू मेंबर्स जखमी झाले आहेत आणि त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे. इतर चार जणांना किरकोळ दुखापत झाली आहे. क्रू मेंबर्सना मंगळुरू बंदरात आणण्यात आले आहे. जखमींवर कुंतिकाना येथील एजे रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**सोशल मीडियावर प्रतिक्रिया**-जहाजाला लागलेल्या आगीच्या घटनेबद्दल भारतातील चीनचे राजदूत यू जिंग यांनी सोशल मीडियावर लिहिले की जहाजातील क्रूमध्ये २२ लोक होते, त्यापैकी १४ चिनी नागरिक आहेत. ६ लोक तैवानचे आहेत. आम्ही भारतीय नौदल आणि मुंबई तटरक्षक दलाचे त्यांच्या पाठिंब्याबद्दल आभार मानतो. जखमी क्रू सदस्य लवकर बरे व्हावेत अशी आम्ही प्रार्थना करतो असे त्यांनी सांगितले.

## पेरण्यांची घाई नको;

रोजी मराठवाड्यातील काही भागात १२ ते १४ जून दरम्यान पाउस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा येथे १२ आणि १५ जून दरम्यान मुसळधार तर १३, १४ जून रोजी अति मुसळधार पाउस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाउस पडण्याची शक्यता आहे. या कालावधीत मच्छिमारांनी समुद्रात मासेमारी करण्यासाठी जाउ नये. वीजांच्या गडगडाटांसह वादळ होत असताना खुल्या मैदानावर काम करु नये, वीजा होताना झाडांच्या खाली आसरा घेउ नये, इलेक्ट्?निक उपकरणांचा वीज पुरवठा खंडित करुन ठेवावा, ओढा, तलाव, नदी आदी पाण्याच्या स्त्रोतातून तत्काळ बाहेर पडावे, वीज वहन करणा-या सर्व वस्तूंपासून दूर राहावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

## दारू महागली, मंत्रिमंडळाकडून

एकात्मिक नियंत्रण कक्ष उभारण्यास मान्यता देण्यात आली. या कक्षाच्या माध्यमातून एआय प्रणालीद्वारे राज्यातील आसवन्या, मद्य निर्माणी, घाउक विक्रेते आदींचे नियंत्रण करण्यात येणार आहे. विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार मुंबई शहर व उपनगरात एक नवीन विभागीय कार्यालय व मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर व अहिल्यानगर या सहा जिल्ह्यांकरिता प्रत्येकी एक वाढीव अधीक्षक कार्यालय नव्याने सुरू करण्यात येणार आहे. विभागाच्या महसुलात वाढीच्या प्रस्तावांना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार पुढीलप्रमाणे उत्पादन शुल्कात वाढ करण्यात येणार आहे. भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या (IMFL) रू. २६०/- प्रति बल्क लिटर पर्यंत निर्मिती मूल्य घोषित केलेल्या मद्यावरील उत्पादन शुल्काचा दर निर्मिती मूल्याच्या ३ पट वरुन ४.५ पट करण्यात येणार. देशी मद्यावरील उत्पादन शुल्काचा दर प्रति प्रुफ लिटर रुपये १८०/- वरुन रुपये २०५/- करण्यात येणार.महाराष्ट्र मेड लिकर (MML) हा धान्याधारित विदेशी मद्याचा नवीन प्रकार तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये फक्त महाराष्ट्रातील मद्य उत्पादक असे उत्पादन करु शकतील. त्यांना या नव्या प्रकारातील उत्पादनाची (ब्रँड) नवीन नोंदणी करुन घेणे आवश्यक राहील.उत्पादन शुल्काच्या दरातील वाढ व अनुषंगिक एमआरपी सूत्रातील बदल यामुळे १८० मि.ली. बाटलीची किरकोळ विक्रीची किमान किंमत मद्य प्रकारनिहाय पुढीलप्रमाणे :- देशी मद्य - ८० रूपये , महाराष्ट्र मेड लिकर (MML) - १४८ रूपये , भारतीय बनावटीचे विदेशी मद्य- २०५ रूपये , विदेशी मद्याचे प्रिमियम ब्रँड - ३६० रूपये.यापुढे राज्यात विविध सीलबंद विदेशी मद्य विक्री अनुज्ञप्ती (एफएल-२) व परवाना कक्ष हॉटेल / रेस्टॉरंट अनुज्ञप्ती (एफएल-३) कराराद्वारे भाडेतत्त्वावर (Conducting Agreement) चालविता येणार आहे. त्याकरिता वार्षिक अनुज्ञप्ती शुल्काच्या अनुक्रमे १५ टक्के व १० टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्यात येईल. मंत्रिमंडळ बैठकीत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बळकटीकरणासाठी ७४४ नवीन पदे व पर्यवेक्षीय स्वरूपाची ४७९ पदे अशा १ हजार २२३ पदांच्या सुधारित आकृतीबंध मान्यता देण्यात आली. विभागासाठी या विविध उपाययोजना राबविल्यानंतर मद्यावरील उत्पादन शुल्क व विक्री कराच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे १४ हजार कोटींची महसूल वाढ अपेक्षित आहे.

## विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात

यामध्ये ६ हजार २५० रूपयांची वाढ करून त्यांना दरमहा ८ हजार रूपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. तर याच अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना महागाई भत्त्यासह १० हजार रूपये वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. या वाढीनंतर पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना ३३ हजार ७३० रूपये इतके विद्यावेतन मिळणार आहे. ही वाढ १ जून २०२५ पासून मिळणार आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या दृष्टीने उपाय. विविध प्रकारच्या दरांमध्ये सुधारणा (राज्य उत्पादन शुल्क विभाग) राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या उपायांना आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या विभागाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने सचिवस्तरीय अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. या गटाने मद्यनिर्मिती धोरण, अनुज्ञप्ती, उत्पादन शुल्क तसेच कर संकलन वाढीसाठी इतर राज्यातील राबविण्यात येत असलेल्या चांगल्या पध्दतींचा, धोरणात्मक बाबींचा अभ्यास करून शासनास शिफारशी व अहवाल सादर केला. त्या अनुषंगाने उत्पादन शुल्क विभागाच्या सुधारित आकृतीबंधास तसेच विभागाचे एकात्मिक नियंत्रण कक्ष उभारण्यास मान्यता देण्यात आली.

## राज्यातील 8 आयएएस

आली आहे.तर आप्पासाहेब धुळाज यांच्याकडे राज्याच्या ओबीसी बहुजन कल्याण विभागाच्या सचिवपदाचा कार्यभार देण्यात आला आहे. तर लातूरच्या महानगर पालिका आयुक्तपदी मानसी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

***कोणत्या अधिका-याची बदली कुठे?*-१. नितीन पाटील** आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता, नवी मुंबई यांना महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. २. **एं.बी. धुळाज** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबई यांना सचिव, ओबीसी बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

**३. लहू माळी** व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबई यांना आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता, नवी मुंबई म्हणून नियुक्तकरण्यात आले आहे. **४. बाबासाहेब बेलदार** अतिरिक्त विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग यांना महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. **५. मुरुगनंथम एम.** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. **६. आदित्य जीवने** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांची सहव्यवस्थापकीय संचालक, छत्रपती संभाजी नगर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. **७. मित्रू पी.एम.** सहाय्यक जिल्हाधिकारी, भातकुली-तिवसा उपविभाग, अमरावती यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. **८. मिस. मानसी,** सहाय्यक जिल्हाधिकारी, देसाईगंज उपविभाग, गडचिरोली यांची महापालिका आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## ग्रामीण भागातील अनुसूचित जाती

हा उपक्रम राज्यात राबवण्यात येत असून त्यातून उद्देशिका प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महापुरुषांचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य शासन सातत्याने करत आहे. जे समाजाच्या भल्यासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करतात, अशा व्यक्तींच्या पाठीशी शासन कायम उभे आहे. राज्यात अनुसूचित जाती व जमातींसाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, त्यामध्ये शिष्यवृत्ती योजना, आश्रमशाळा, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, परदेशी शिक्षणासाठी साहाय्य, तसेच महामंडळांच्या माध्यमातून रोजगाराभिमुख योजना राबविल्या जात आहेत. प्रधानमंत्री आवास योजना, पीएम किसान योजना, पीएम फसल बीमा योजना, मुद्रा योजना आणि स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती-जमातीतील घटकांना लाभ मिळाला आहे. केंद्र शासनाच्या धोरणांमुळे लाखो तरुण उद्योजक घडत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक अंतिम टप्प्यात असून लोकशाहीर अण्णा भाउ साठे, क्रांतिगुरु लहूजी वस्ताद साळवे यांची स्मारके उभारण्याची कामेही वेगाने सुरु असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सामाजिक न्याय विभागाचा निधी त्याच विभागाच्या उद्दिष्टपूर्तीसाठीच वापरण्यात येत आहे, असे स्पष्ट करत त्यांनी समाजहितासाठी कार्य करणा-या पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्था यांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अभिनंदन केले.उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, या पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून समाजकार्य करणा-यांचे कौतुक होते, तसेच महामानवांचे स्मरणही होते. चांगल्या कार्याचा गौरव झाल्यास समाजात सकारात्मक प्रेरणा मिळते. यापुढे हा पुरस्कार सोहळा दरवर्षी घेतला जाईल. राजर्षी शाहू महाराज यांनी सर्व जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली. महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घातला. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाउ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला वैचारिक गुलामगिरीतून बाहेर काढल, संत रविदास महाराज यांनी समाजातील गरीब, शोषित, वंचित लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठवला. या महामानवांच्या कार्याचा आदर्श ठेवूनच समाजातील बांधवांनी कार्य करावे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक प्रगत राज्य असून, परकीय गुंतवणुकीत राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. उपमुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले, महाराष्ट्र हे दिव्यांग कल्याण विभाग स्थापन करणारे देशातील पहिले राज्य असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. पुरस्कार प्राप्त व्यक्ती व संस्थांची संख्या आणि पुरस्काराचे स्वरुप :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार ६१ व्यक्ती - (प्रत्येकी ७५ हजार), व १० संस्था (प्रती संस्था प्रत्येकी १ लाख), साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाउ साठे पुरस्कार २७ व्यक्ती (प्रत्येकी ७५ हजार ) व ६ संस्था ( प्रती संस्था प्रत्येकी १ लाख), कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाउराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार १ व्यक्ती -(प्रत्येकी ५१ हजार ), व १ संस्था (प्रती संस्था प्रत्येकी १ लाख). संत रविदास पुरस्कार १ व्यक्ती - (प्रत्येकी ५१ हजार), व १ संस्था (प्रती संस्था प्रत्येकी १ लाख). शाहु, फुले, आंबेडकर पारितोषिक एकूण १४ संस्थेला ६ महसुली विभागानूसार प्रत्येकी दोन संस्था ७.५० लाख सन्मानपत्र, मानपत्रासाठी चांदीचा स्क्रोल, स्मृतीचिन्ह, शाल, व श्रीफळ. ड?. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार ८ संस्था, राज्यस्तर ३ पुरस्कार प्रथम पुरस्कार ५ लाख, द्वितीय पुरस्कार ३ लाख व तृतीय पुरस्कार २ लाख, विभागीय स्तरावर पुरस्कार संख्या ५, प्रत्येकी १ लाख याप्रमाणे राज्यातील ९० व्यक्ती व ४० संस्थांचा एकूण १३० पुरस्कारार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## आरोपीस शिलॉंग पोलिस

डोके ठेवून रडत राहिली. तिने चहाही प्यायला नाही.दरम्यान, मेघालय पोलिसांचे एक पथक चार आरोपींसह इंदूर विमानतळावर पोहोचले. येथे एका व्यक्तीने एका आरोपीला थप्पड मारली. पोलिस आरोपींसह कोलकात्याला रवाना झाले आहेत. येथून ते गुवाहाटी मार्गे शिलॉंगला पोहोचतील. राजा-सोनमचे लग्न ११ मे रोजी झाले. राजा-सोनम २१ मे रोजी शिलॉंगला पोहोचले. कुटुंबाशी शेवटचे २३ मे रोजी बोलले. राजाचा मृतदेह २ जून रोजी सापडला. १७ दिवसांपासून बेपत्ता असलेली सोनम एक दिवस आधी ९ जून रोजी गाजीपूरमध्ये सापडली. त्यानंतरच खून प्रकरण उघडकीस आले.

## 50 टक्के महिलांना निवडून

क्षाचे नेते शरद पवार यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा वर्धापन दिन कार्यक्रम मंगळवारी पुण्यात झाला. यावेळी शरद पवार यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी राज्यभरातून पक्षाचे कार्यकर्ते पुण्यात आले होते. शरद पवार म्हणाले, १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. जनतेचा पाठिंबा मिळाला. सामान्य जनतेने संधी दिली. तुमच्या पैकी अनेक जणांना संधी मिळाली. प्रशासन चालवण्यास सामान्य कुटुंबातील व्यक्तीला संधी मिळाली तर तो ही कर्तृत्व दाखवू शकतो. राज्य चालवू शकतो. त्यासाठी अनेकांची नावे घेता येतील. पक्षाच्या कार्यकर्त्यांना संधी मिळाल्यावर त्यांनी अनेक चांगले निर्णय घेतले. त्याचा परिणाम राज्यात सुद्धा झाला.राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडेल, असे कधी वाटले नव्हते, अशी खंत व्यक्त करत शरद पवार यांनी देशहिताला पाठिंबा देण्याचा विचार मांडला. ते म्हणाले, देशाचा विचार दोन दृष्टिने केला पाहिजे. देशाचा विचार करताना राष्ट्रवादी कधी राजकारण आणत नाही. पहलगाममध्ये हत्या झाल्यानंतर राष्ट्रवादीने देशहिताची भूमिका घेतली. शेजारी राष्ट्रासोबत आपले संबंध चांगले राहिले नाही. सुसंवादाची परिस्थिती बांगलादेश, श्रीलंका, चीन, पाकिस्तानसोबत नाही, असे पवार यांनी सांगितले.

**दादांची आठवण रोजच येते** -दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून वेगळा वर्धापनदिन साजरा होत आहे. अशातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांना अजितदादांची आज आठवण येते का? असे विचारले असता त्या म्हणाल्या की, दादांची मला रोज आठवण येत असते. सगळ्या भावांची आठवण मला येते, मला सहा भाउ असून, सगळ्यांशी रोज बोलणं होतं आणि सगळ्यांना मी शुभेच्छा देत असते, असेही यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पुण्यात १० वाजून १० मिनिटांनी पक्ष कार्यालय येथे पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. यावेळी त्यांना याबाबत विचारले असता त्यांनी आपलं मत व्यक्त केलं. आपण जे स्टेटस ठेवलं आहे, त्याबाबत सुप्रिया सुळे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, माझ्या आईने मला जो सल्ला दिला, तो मला काल विमानात बसल्यावर आठवला आणि तो मी ट्विट केला. सशक्त लोकशाहीत स्वतःचं मत मांडण्यात गैर काय आहे, असं यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या. आज दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने वेगवेगळे वर्धापनदिन साजरे केले जात आहेत, पुढच्या वर्षी पुन्हा एकसंध राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पाहायला मिळणार का? असे यावेळी सुप्रिया सुळे यांना विचारले असता त्या म्हणाल्या की, तुमची जी अपेक्षा असेल ती मी माझ्या पक्षातील वरिष्ठांना कळवेन. तसेच गेल्या २६ वर्षांत पक्षासाठी ज्यांनी ज्यांनी जे जे योगदान दिलं, त्या प्रत्येकाचं योगदान हे महत्त्वाचं आहे, असेही यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या. सुप्रिया सुळे म्हणाल्या, ऑपरेशन सिंदूरची माहिती देण्यासाठी विदेशात देशाचे नेतृत्व करण्याची मला संधी मिळाली. ज्या, ज्या देशांत मी गेले त्या ठिकाणी एकच प्रश्न विचारला जात होता, तुमचा देश महात्मा गांधींचा देश आहे. आम्हाला आजही तुमच्या देशातील पंडित नेहरु यांचे भाषण आठवते. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु , इंदिरा गांधी यांच्याबद्दल सर्वच बोलत होते. मोदी यांच्याबद्दलही चांगले बोलले गेले. गैरसमज नसावा, असे सुप्रिया सुळे यांनी यावेळी सांगितले.

## मी खिशात पैसे घेउन

अजित पवार यांनी स्पष्टीकरण दिलं.तसेच याच कार्यक्रमात बोलताना अजित पवार यांनी शिवसेना शिंदेंच्या काही नेत्यांना देखील अप्रत्यक्ष सुनावल्याचं पाहायला मिळालं. सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विभागाचा निधी वळवल्याचा आरोप काही नेत्यांनी केला होता. त्यावर आज अजित पवार यांनी उत्तर देत थेट नाव न घेता मी खिशात पैसे घेउन बसतो काय? असं म्हणत शिवसेनेच्या मंत्र्यांना अप्रत्यक्ष सुनावलं आहे. कधी कधी काही बातम्या येतात की अजित पवार पैसे सोडत नाहीत. पैसे सोडत नाही, मग मी काय खिशात पैसे घेउन बसतोय का? शेवटी राज्य सरकारने अर्थसंकल्प सादर केल्यानंतर पहिल्या तीन महिन्यांत आम्ही २० टक्के पैसे सोडतो, दुस-या तीन महिन्यांत ४० टक्के सोडतो. तिस-या तीन महिन्यांत ६० टक्के सोडतो, नंतर ८० टक्के आणि शेवटी १०० टक्के सोडतो. अशा प्रकारचं ते नियोजन असतं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा पक्ष आहे. आता काही जण मला विचारतात की तुम्ही भाजपाबरोबर का गेला आहात? मी तुम्हाला सांगतो की, २०१९ साली आपल्या पक्षाने शिवसेना पक्षाबरोबर सरकार स्थापन केलं होतं. तेव्हा देखील आपण सत्तेसाठी काही तडजोडी केल्या होत्या. कारण शेवटी विरोधी पक्षात बसून आणि घोषणा देउन चालत नाही. आपण साधू संत नाहीत. आपण लोकांचे प्रश्न सोडवणारे आणि बेरजेचं राजकारण करणारे लोक आहोत.

## आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी बच्चू

वाजेपर्यंत व्यापारी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून आंदोलनामध्ये सहभागी होणार आहे. सकाळी नऊ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात व्यापारी आणि शेतकरी एकत्र येऊन आंदोलन करणार आहे. त्यामुळे आता बच्चू कडू यांचे हे आंदोलन राज्यभरात पेटतांना दिसत आहे. राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतमजुरांच्या उत्कर्षाकरिता स्वतंत्र आर्थिक महामंडळ, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या मजुरीत वाढ, शेतकऱ्यांप्रमाणे शेतमजुरांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याला विमा संरक्षण मिळावे, शेतमजुरांचे आर्थिक हित जपण्याकरिता स्वतंत्र मंडळाची उभारणी व्हावी, लागवड ते कापणीपर्यंतच्या सर्व शेतीकामांचा समावेश महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत करावा. हे शक्य नसल्यास तेलंगणाच्या धर्तीवर एकरी १० हजार रुपयांची मदत देण्यात यावी. रासायनिक खतांप्रमाणे सेंद्रिय तसेच मेंढी खतालादेखील अनुदान देण्याची तरतूद करण्यात यावी, दुधातील भेसळ रोखत गाईच्या दुधाला ५० रुपये तर म्हशीसाठी ६० रुपये प्रतिलिटर असा दर निश्चित करावा. कांद्याचे दर स्थिर राहावेत याकरिता ४० रुपये दर होईस्तोवर निर्यात बंदी लागू करू नये, अशा मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आज तिसऱ्या दिवशी पण त्यांचे आंदोलन सुरू आहे. त्यांची प्रकृती खालवली आहे तरी पण प्रशासन लक्ष द्यायला तयार नाही तर दुसरीकडे बच्चू कडू सुद्धा आपल्या मागण्यांवर ठाम आहे. बच्चू कडू यांच्या आंदोलन स्थळी भेट द्यायला रोहित पवार आणि सुप्रिया सुळे येणार असल्याची माहिती आहे. आठ जून पासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीजवळ प्रहाराचे अध्यक्ष बच्चू कडू हे उपोषला बसले आहेत.... त्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी, संपूर्ण सातबारा कोरा करणे,शेत मजूर कामगारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास मंडळ स्थापन करणे, मनरेगाच्या मजुरीत वाढ करणे, सेंद्रिय खताला अनुदान देणे.. या मागण्यासाठी बच्चू कडू उपोषणाला बसले आहे.या मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करत आहे यामुळे चांदूर बाजार तहसील कार्यालयात कार्यकर्त्यांनी मुंडण करून सरकारचा निषेध केला आहे.

## माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील

बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे ते एकेकाळी आमदार होते आणि स्थानिक प्रश्नांवर त्यांनी विधिमंडळात आवाज उठवलेला आहे. स्वाभिमान, कामगिरी आणि जनसंपर्क या तीन मूल्यांवर आधारित त्यांचे राजकारण अनेकांना प्रेरणादायी वाटते. गेल्या काही वर्षांपासून त्यांनी सक्रिय राजकारणाला थोडा विराम दिला होता. मात्र शिवसेनेच्या विद्यमान कार्यशैलीने ते पुन्हा एकदा सक्रीय राजकारणात उतरले असून त्यांनी शिंदे गटाच्या विचारधारेला स्वीकारले आहे.

**पक्षप्रवेश सोहळा : एकजूट, जोश आणि निष्ठेचा उद्गार-** मुंबईतील पक्षप्रवेश सोहळा हा केवळ एक राजकीय कार्यक्रम नव्हता, तर तो निष्ठावान कार्यकर्त्यांच्या उत्साहाचा महोत्सव ठरला. या समारंभात शिवसेनेचे अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. जलसंधारण मंत्री संजय राठोड, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार दीपक केसरकर, ज्येष्ठ नेते आनंदराव अडसुळ, कॅप्टन अभिजीत अडसुल, सचिव राम रेपाले, उपनेते काला शिंदे, प्रवक्ते राहुल लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख कार्यकर्त्यांच्या हस्ते धाने पाटील यांचा औपचारिक पक्षप्रवेश झाला.

कार्यक्रमात उपस्थित असलेले शेकडो कार्यकर्ते 'शिवसेना झिंदाबाद' आणि 'एकनाथ शिंदे आगे बढ़ो, हम तुम्हारे साथ हैं' अशा घोषणांनी आसमंत दणाणून सोडत होते. ही ऊर्जा केवळ एका नेत्याच्या प्रवेशाची नव्हे, तर परिवर्तनाच्या लाटेची नांदी होती. ज्ञानेश्वर धाने पाटील यांचा शिवसेनेत प्रवेश ही फक्त एका माजी आमदाराची पुनरागमन घटना नाही, तर विदर्भातील राजकीय समीकरणे ढवळून टाकणारी ठरू शकते. बडनेरासह अमरावती जिल्ह्याचे राजकारण आगामी काळात नव्या धर्तीवर चालेल, याचे संकेत या प्रवेशाने दिले आहेत. विद्यमान आमदारांकडे लोकांचा रोष आणि शिवसेनेच्या शिंदे गटाची वाढती लोकप्रियता पाहता धाने पाटील यांना पुन्हा एकदा विधानसभेत संधी मिळू शकते.

शिवसेनेच्या विद्यमान नेतृत्वाने विदर्भातील नेतृत्त्व निर्माण करण्याचा जो संकल्प केला आहे, त्यासाठी धाने पाटील सारख्या नेत्यांचा उपयोग उपयुक्त ठरेल, हे स्पष्ट आहे. त्यांच्या प्रामाणिक प्रतिमेचा उपयोग संघटन बांधणीसाठी केला जाणार आहे, अशी माहिती पक्षातील वरिष्ठ सूत्रांकडून समजते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने गेल्या काही महिन्यांत राज्यभरामध्ये आपली संघटना आणि राजकीय पायाभूत रचना अधिक बळकट केली आहे. पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद, ठाणे, कोकण आणि आता विदर्भातील जिल्ह्यांमध्ये शिवसेनेचे विस्तारकार्य वेगाने सुरु आहे. शिंदे गटाने स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधण्याचे धोरण राबवले आहे. यामध्ये पूर्वीच्या असंतुष्ट नेत्यांना पुन्हा एकत्र करून नवे नेतृत्व तयार करण्याचा प्रयत्न होत आहे. धाने पाटील यांचा प्रवेश हे याचेच ताजे उदाहरण आहे.

**'धाने पाटील यांचे येणे ही आमच्यासाठी ऊर्जा'** -कार्यक्रमात बोलताना मंत्री संजय राठोड म्हणाले, 'ज्ञानेश्वर धाने पाटील हे एक अभ्यासू आणि जनतेच्या प्रश्नांवर लढणारे नेतृत्व आहे. त्यांचा शिवसेनेत प्रवेश झाल्यामुळे विदर्भात पक्ष अधिक मजबूत होईल.'

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, 'शिवसेना महिला, युवक, ग्रामीण आणि शहरी भागात आपल्या कार्यकर्त्यांच्या आधारावर मजबूत झाली आहे. धाने पाटीलसारख्या अनुभवी नेतृत्वाची साथ ही आगामी काळात मोठा परिणाम करेल.'

**'शिवसेना म्हणजे माझा आत्मा' -धाने पाटील** - पक्षप्रवेशानंतर बोलताना ज्ञानेश्वर धाने पाटील म्हणाले, 'शिवसेना म्हणजे फक्त पक्ष नाही, तर एक विचारधारा आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी मी नेहमीच बांधिल आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्या विचारांना नवा आयाम दिला आहे. त्यामुळे मी माझ्या कार्यकर्त्यांसह पुन्हा शिवसेनेत प्रवेश करत आहे. माझं राजकारण हे सामान्य जनतेसाठी आहे आणि तेच शिवसेनेच्या कार्यपद्धतीशी जुळतं.'

**शिवसेनेला नवसंजीवनी-**ज्ञानेश्वर धाने पाटील यांचा प्रवेश म्हणजे शिवसेनेच्या शिंदे गटासाठी केवळ राजकीय शक्तीप्रदर्शन नाही, तर एक प्रकारची नैतिक आणि संघटनात्मक नवसंजीवनी आहे. विदर्भातील स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये या प्रवेशामुळे उत्साह संचारलेला असून पक्षात नव्याने कामाला चालना मिळाली आहे. राजकीय दृष्टिकोनातून पाहता, धाने पाटील यांचा पुन्हा राजकारणात प्रवेश आणि तोही शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, हे विरोधकांसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. आगामी निवडणुकांमध्ये या प्रवेशाचा निश्चितच मोठा परिणाम होणार आहे. तसेच जिल्ह्याच्या राजकारणात प्रभावी ठरलेले शिवसेनेचे महानगरप्रमुख संतोष बद्रे यांच्या उपस्थितीत बडनेरा विधानसभा मतदारसंघातील शेकडो कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.

**शेवटच्या श्वासापर्यंत उद्धव ठाकरे सोबत- पराग गुडधे**

संकटाच्या काळात उद्धव ठाकरेंना सोडणार नाही. बाप बिमार झाला म्हणजे आपण शेजारच्याला बाप म्हणत नाही. शेवटच्या श्वासापर्यंत उद्धव ठाकरे सोबत लढत राहू आणि या संघर्षाच्या काळातही शिवसेनेला नवीन उभारी देऊन पुन्हा त्याच दमाने परत संघटना उभी करू. गेलेल्या लोकांचा इतिहास कर्तुत्व आणि नेतृत्व जिल्ह्याने पाहिले आहे. त्या मावळ्यांना सोबत घेऊन पुन्हा शिवसेनेला गत वैभव प्राप्त करून देऊ. येणाऱ्या जिल्हा परिषद महानगरपालिका, पंचायत समितीच्या निवडणुका सगळ्या प्रश्नाचे उत्तर देईल.

-पराग गुडधे,शिवसेना जिल्हाप्रमुख,अमरावती

## उबाठा जिल्हाप्रमुख सुनील

भाजपा नेत्यांच्या संपर्कात होते. त्यांनी शिवसेना उबाठाला रामराम करून भाजपामध्ये प्रवेश केला आहे.

**जिल्ह्यात उबाठाला दुसरा मोठा धक्का-** शिवसेना उबाठा गटाला शहर आणि जिल्ह्यात एका मागून एक धक्के मिळत आहे.काही दिवसापूर्वी आशिष पडोळे ,श्याम देशमुख, राहुल माटोळे सहित शेकडो शिवसैनिकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थिती शिंदे सेनेमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर प्रिती बंड यांनी उबाठाला रामराम करून शिंदे सेनेमध्ये प्रवेश केला.त्यानंतर आता सुनील खराटे यांनी भाजप प्रवेश केला आहे.शिवसेना उबाठाला एका पाठोपाठ एक झटके बसत आहे. येणाऱ्या महानगरपालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत याचे परिणाम निश्चित दिसून पडतील.

## भाजपाचा अजेंडा देशाच्या

पक्षातच मिळू शकते.भाजपचा अजेंडा हा देशाच्या सर्वांगीण विकासावर केंद्रीत आहे, असे सांगून बांगलादेशी नागरिकांच्या खोट्या कागदपत्रांद्वारे अमरावती शहरातील वास्तव्याच्या प्रश्नावर सुनील खराटे यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. राष्ट्रहितासाठी स्पष्ट दिशा आणि निर्णयक्षम नेतृत्व आवश्यक आहे, जे आज भाजपमध्ये उपलब्ध आहे असे खराटे म्हणाले.सरकार आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करणाऱ्या धोरणामुळे मतदारांशी थेट संवाद साधता येतो आणि लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर कार्यवाही करता येते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मी भारतीय जनता पक्षात सामील होत असून, माझे कार्य हे निःस्वार्थ आणि समाज हितासाठीच राहील. अमरावती शहर, महाराष्ट्र राज्य, आणि देशासाठी मी सतत कार्यरत राहील, असे सुनील खराटे यांनी सांगितले.

## जिल्हाकचेरीवर किसान सभेचे

नवे शेती कर्ज वाढीव असावी .दुप्पट असावे. कर्ज विना अडथळा मिळावे. व्याजदर शून्य असावा.

बच्चु कडू यांचे अन्नत्याग आंदोलनाच्या मागण्यांचे समर्थन यावेळी करण्यात आले. शेतकरी ,शेतमजूर ,अपंग व महिलांच्या मागण्या प्रामुख्याने असल्याचे सांगितले. सदर आंदोलनात तुकाराम भस्मे, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे, जे एम कोठारी, विनोदराव जोशी, उमेश बनसोड ,सतीश चौधरी ,शरदराव मंगळे ,सुनील मेटकर, नितीन राजे, निळकंठ ढोके ,दिगंबर नगेकर ,कैलास ठाकरे ,शर्मा , धनंजय मस्के, प्रा. विजय रोडगे ,प्रा. प्रसेनजीत तेलंग ,संतोष सुरजुसे ,हरिदास राजगिरे, चंद्रकांत वडस्कर ,सागर दुर्योधन, अशोकराव राऊत, किशोर काळे ,शंकर नारनवरे, मारुती पाचपोर ,सुनील गडेकर, भूषण नाचवणकर ,एड.क्रांती देशमुख, प्रफुल्ल देशमुख यांचा समावेश होता.

## बडनेरा पोलिसांची अवैध दारूवर

राहुल नगर, जुनी वस्ती, बडनेरा) व आकाश नारायण हिवराळे (वय २८, रा. पाचबंगला, जुनी वस्ती, बडनेरा) असे अटक आरोपींची नावे आहेत. दोन्ही आरोपींकडून ७० हजार ६०० रुपयांचा देशी दारू साठा व एक दुचाकी जप्त करण्यात आली आहे. सदर कारवाई पंचासमक्ष करण्यात आली असून, आरोपींविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर, तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईचे नेतृत्व पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण आणि पोलीस उपनिरीक्षक सचिन माकोडे यांनी केले. त्यांच्या पथकात सुधीर प्रांजळे, इरफान रायलीवाले, शशी शेळके, धनराज ठाकूर, बाबूसिंग राठोड व शुभम कडूकार यांचा समावेश होता.

## निम्न पेढी प्रकल्पातील बाधित

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, निम्न पेढी प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या पुर्णत्वास गती देणे आवयश्यक आहे. प्रकल्पात सुमारे ७५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा होणार असून यातून १ हजार ३०० हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. तसेच पिण्याचे पाणीही उपलब्ध होणार आहे. प्रकल्पातून शेतकऱ्यांना पाईपने पाणी पुरवठा होणार असून सुमारे ३५० किलोमीटरची पाईप लाईन टाकण्यात येणार आहे. जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून निम्न पेढी प्रकल्प महत्वाचा असून प्रशासनाकडून प्रकल्प पुर्ण करण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहे. यात प्रामुख्याने बुडीत क्षेत्रातून अद्यापही स्थलांतरीत झाले नसलेल्या नागरिकांचे स्थलांतर करण्यात येणार आहे. पुनर्वसनासाठी ज्या गावांना जमीन आवश्यक आहे, त्यांची उपलब्धता करण्यात येणार आहे. ही जागा नागरिकांच्या सोयीची असणार आहे. येत्या १५ जून पर्यंत नागरिकांनी जागेचा ताबा घेतल्यास त्यांना घरकुल योजनेत समाविष्ट करून घर बांधण्यासाठी सहाय्य पुरविण्यात येणार आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून मुलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वाढीव मोबादला म्हणून १०१ कोटींचा निधी प्राप्त झाला असून २७८ कुटुंबांना पहिल्या टप्प्यात ५७ कोटींचे वाटप करण्यात येणार आहे. प्रकल्पाचे काम पुर्ण करून यात पाणी साठविण्यात येणार आहे. त्यामुळे नागरीकांनीही प्रकल्प पुर्ण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले.

## आरडी एजंटकडील पैसे हिसकावणारा

घेण्यात आले आणि त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भवर, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, मनीष वाकोडे, प्रकाश झोपाटे, सतीश देशमुख, फिरोज खान, सचिन बहाले, प्रशांत मोहोड, अलीमुद्दीन खतीब, नाझिमुद्दीन सय्यद, विकास गुडधे, सचिन भोयर, सूरज चव्हाण, निखिल गेडाम, रंजीत गावंडे, अशोक खंगार, किशोर खेंगरे यांनी केली.

## लग्नाचे आमिष देऊन

तुझा नवरा मरणार आहे, आपण लग्न करू असे सांगून शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले. त्यानंतर पुन्हा त्याच रात्री आणि नंतर ८ जूनच्या रात्रीही त्याने बळजबरी करून अत्याचार केला, असा आरोप पीडितेने तक्रारीत केला आहे. सामाजिक दबाव आणि घरगुती अडचणींमुळे पीडित महिला काही काळ गप्प राहिली. मात्र आरोपीकडून सुरू असलेल्या धमक्या व त्रासामुळे तिने अखेर अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात धाडसाने तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी या प्रकरणात गंभीर दखल घेतली आहे.

## १४ जूनला अमरावतीत जिल्हा

नाही, तर मूल्यांसाठी लढतो आहे.'या पार्श्वभूमीवर १४ जून रोजी अमरावती येथे भव्य मशाल मोर्चा आयोजित करण्यात येणार असून, यामध्ये काँग्रेसचे सर्व स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनतेचा सहभाग अपेक्षित आहे. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती आणि राज्यपालांना निवेदन सादर करण्यात येणार आहे.

कामठी मतदारसंघात मतदानातील संशयास्पद वाढ याकडे लक्ष वेधताना देशमुख म्हणाले, 'लोकसभेतील भाजपची मते १.१९ लाख होती. परंतु अवघ्या काही महिन्यांत ती १.७५ लाखांवर पोहोचली, म्हणजेच ५६ हजार मतांची वाढ झाली. कामठीत ३५ हजार नवीन मतदार नोंदवले गेले, आणि त्यातील जवळपास सर्वच मत भाजपकडे गेले यावर कोणताही विश्वास ठेवू शकत नाही. ही बाब निवडणूक आयोगाने गंभीरतेने तपासावी.'

खासदार बळवंत वानखडे म्हणाले 'ही लढाई केवळ काँग्रेसची नाही, ही लढाई देशाच्या लोकशाही मूल्यांची आहे. कुठल्याही दबावाला झुकता कामा नये. संविधान, स्वातंत्र्य आणि जनतेचा अधिकार वाचवण्यासाठी आम्ही संघर्ष चालूच ठेवू.'

या पत्रकार परिषदेला हरिभाऊ मोहोड, प्रदीप देशमुख, संजय बेलोकार, संजय वानखडे यांचे सह काँग्रेसचे जिल्हा पदाधिकारी, युवा नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ बुधवार, ११ जून २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# नागरिकांच्या तक्रारी वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने सोडवाव्यात - जिल्हाधिकारी

## तक्रार निवारण दिनात नागरिकांच्या अडचणींना जिल्हाधिकाऱ्यांचा नाविन्यपूर्ण उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**नागरिकांच्या तक्रारी वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने सोडवाव्यात, प्रशासन आणि जनतेत थेट संवाद घडावा तसेच शासनाच्या सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचाव्यात या उद्देशाने वाशिम तहसील कार्यालयात जिल्हा प्रशासनाच्या वतीने आज दि. १० जुन रोजी तालुकास्तरीय तक्रार निवारण दिन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी ३ नागरिकांनी उपस्थित राहून विविध तक्रारी व मागण्यांची निवेदने मांडली.**



या उपक्रमास परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी आकाश वर्मा, उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली देवकर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी निलेश गायकवाड, तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा चव्हाण, निवासी नायब तहसीलदार साहेबराव नप्ते तसेच नायब तहसीलदार कैलास देवळे आदी अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, नागरिकांच्या प्रलंबित महसूल विषयक तक्रारींवर तातडीने कार्यवाही करा. प्रकरणे प्रामाणिकपणे तपासून मुदत मर्यादेत निकाल लावणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. कोणत्याही प्रकारचा टाळाटाळ किंवा विलंब सहन केला जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. सेवा अधिक जलदगतीने व पारदर्शक पद्धतीने नागरिकांना मिळाव्यात यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर म्हणाल्या , प्राप्त तक्रारींची निवेदनांची नोंद ठेवा, विभागनिहाय कारवाईला गती द्या.

तक्रार निवारण दिनाच्या कार्यवाहीदरम्यान उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी महसूल विभागास महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. त्या म्हणाल्या, महसूल विभागाकडे येणाऱ्या तक्रारींचे व्यवस्थित वर्गीकरण केले जावे. प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यांच्या नोंदी यांची यादी तयार करून त्या जिल्हाधिकारी यांच्या समक्ष तक्रार निवारण दिनाच्या बैठकीत सादर कराव्यात. तसेच, ज्या विभागाच्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्या तक्रारींच्या प्रती संबंधित विभागांना अधिकृतरित्या पाठवाव्यात. एका तक्रार निवारण दिनामध्ये संबंधित विभागांना तक्रारींची माहिती देऊन त्या संदर्भात तातडीने कार्यवाही अपेक्षित आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**दर मंगळवारी वाशिम तालुकास्तरीय तक्रार निवारण दिन:**

नागरिकांच्या प्रशासनाशी थेट संवादाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी दर मंगळवारी वाशिम तहसील कार्यालयात तालुकास्तरीय तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमामार्फत नागरिक आपल्या समस्या व तक्रारी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमोर मांडू शकतात. जिल्हा प्रशासनाच्या या उपक्रमामुळे पारदर्शकता, जबाबदारी व तत्पर सेवा यांना चालना मिळत असून, नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होत आहे.



## क्रीडा संकुलास स्व. पुंडलिकराव गवळी यांचे नाव द्या

### शिवसेनेची मागणी, क्रीडा अधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हयाचे शिल्पकार दिवंगत खासदार पुंडलीकराव गवळी यांनी लोकआग्रहास्तव शिवसेना प्रमुखांकडे तगादा लावल्याने वाशिम जिल्हयाची निर्मिती झाली. त्यामुळे स्व. गवळी यांना जिल्हयाचे शिल्पकार असे संबोधिल्या जाते. दरम्यान, येत्या १ जुलै रोजी जिल्हा निर्मितीला २७ वर्षे पुर्ण होत असल्याच्या पार्श्वभुमीवर वाशिम जिल्हा क्रीडा संकुलाचे स्व. पुंडलिकराव गवळी क्रीडा संकुल असे नामकरण करण्याची मागणी शिवसेना शहरप्रमुख डॉ. विशाल सोमटकर यांनी केली आहे.

वाशिम जिल्हा निर्मितीसाठी अनेक आंदोलने झाले तरी कोणत्याही राजकीय पुढाऱ्याने ही मागणी गांभीर्याने घेतली नव्हती. यानंतर राज्यात सत्तांतर होवून विधानसभा निवडणुका झाल्यानंतर शिवसेना- भाजप युतीचे सरकार स्थापन झाले. दरम्यान, शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे हे वाशिम जिल्हा दौऱ्यावर असताना स्व. खा. पुंडलिकराव गवळी यांनी वाशिम जिल्हा निर्मितीसाठीची लोकभावना शिवसेना प्रमुखांसमोर मांडली आणि शिवसेना प्रमुखांनी लगेच वाशिम जिल्हा लिहीण्यास सुरुवात करण्याचे आवाहन केले. यानंतर काही दिवसात वाशिम जिल्हा निर्मीतीची घोषणा होवून १ जुलै १९९८ रोजी वाशिम जिल्हा नकाशावर आला. या घटनेला येत्या १ जुलै रोजी २७ वर्ष पुर्ण होत असून जिल्हावासियांना व येणाऱ्या पिढीला स्व. पुंडलिकराव गवळी यांच्या कार्याची माहिती व्हावी. यासाठी म्हणून वाशिम येथील क्रीडा संकुलाचे स्व. पुंडलिकराव गवळी क्रीडा संकुल असे नामकरण करावे. अशी मागणी शहरप्रमुख डॉ. विशाल सोमटकर यांच्या नेतृत्वात दिलेल्या निवेदनाव्दारे करण्यात आली. या निवेदनावरशाम खरात, अमोल मापारी, कैलास थोरात, अब्दुल आकीब, राजु पुणेवाड, सय्यद कफील, अजय राईतकर, गोपाल सोमटकर, अस्मत जहागीरदार, गोपाल सारसकर, सुधाकर कुटे आदिंसह शिवसैनिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## माता रुख्मिणीची पालखी विठ्ठलाच्या भेटीला



■ प्रतिनिधी | कारंजा ■

युगे अठ्ठावीस वीटेवर उभा असलेला पंढरपूरचा पांडुरंग हे अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत आहे. आषाढी-कार्तिकीची वारी हा मराठीजनांचा कुळाचार आहे. रुक्मिणीचे माहेरघर असलेले कौंडण्यपूर येथून माता रुख्मिणीची दिंडी विठ्ठलाच्या भेटीच्या ओढीने पंढरपूरच्या दिशेनी निघाली.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा श्री विठ्ठलाच्या दर्शनाकरीता दिंडी निघाली. श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्रीक्षेत्र कौंडण्यपूर ( विदर्भ ) पायदळ दिंडी सोहळ्याचे हे ४३१ वे वर्ष आहे. कारंजा (लाड) येथे मुक्कामी असलेली दिंडी सकाळी पंढरपूरच्या दिशेने रवाना होताना माणक नगर, बायपास येथील श्री संजय नायसे यांच्या घरी दर्शन व अल्पोहार करिता दि. १० जून रोजी सकाळी ८:३० वाजता आगमन झाले. कारंजा मानोरा मतदार संघाचे आमदार सईताई डहाके ह्या प्रामुख्याने

ही दिंडी कारंजा तालुक्यामध्ये आल्यापासून दिंडी सोबतच मार्गक्रमण करीत, विठ्ठल चरणी सेवा अर्पण करीत आहेत. दर्शनाकरीता परिसरातील आबाल-वृद्धानी एकच गर्दी केली.

## अपंग प्रशासनामुळे कारंजा येथील वृद्धाने गमावले दोन्ही पाय

■ प्रतिनिधी | कारंजा ■

बायपास परिसरात रहिवासी हेतू वसाहतीत वाढ होऊन मिनी कारंजा हे नविन शहर वसले आहे. पर्यायाने बायपास परिसरात वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या संख्येत भरमसाठ वाढ झाली आहे.त्यातच आजूबाजूच्या गावातील नागरिकांचा राबता हा बायपास परिसरातच असतो. त्यामुळे सदैव बायपास परिसरात वर्दळच पहावयास मिळते.

मानवी वसाहतीत वाढ झाल्यामुळे वस्तू, फळ, भाजीपाला, खाद्य पदार्थ इत्यादीची मागणी वाढली. मागणी वाढल्याने पुरवठा हेतू पुरवठादार वाढलेत. पुरवठा करण्यासाठी पुरवठादार अनधिकृतपणे रस्त्याच्या लगत दुकान थाटून धंदा करतात. पर्यायाने सामान्य नागरिकांना गाडीने, टू-व्हिलर ने तर दूरच साधे पायदळ चालणे मुश्किल आहे. काल वटपौर्णिमा असल्यामुळे तुषार कॉलनी येथील अंदाजे ६० वर्षीय



### बायपास वरील रस्ते बनले अपघात प्रणवस्थळ

पाणीपुरवठा मधील सेवानिवृत्त पाचडे नामक इसम आंबे घेण्याकरिता झाशी राणी चौक बायपासला आले असता त्यांना टिप्परने धडक दिली. या दुर्घटनेत त्यांच्या दोन्ही पायांचा अक्षरशः चुराडा झाला. अपघात झाल्यानंतर तात्काळ त्यांना रुग्णवाहिकेद्वारे सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले असता तेथे नेहमीप्रमाणे रेफर टू अमरावती करण्यात आले. सद्यस्थितीत अपघातग्रस्ताला नागपूर येथे हलविले असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. कारंजा येथील झाशी राणी चौकात अपघात होणे काही नवीन नाही.जनता टाहो फोडून रडत राहते पण जनतेच ऐकायला प्रशासनाला वेळ नाही. मागील काही दिवसापूर्वी बायपास मधील झाशी राणी चौकात एका शाळकरी मुलीचा अपघाती मृत्यू झाला. फक्त दोन-तीन दिवस प्रशासनाने रहदारीला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला. त्या नंतर येरे माझ्या मागल्या प्रमाणे वाहतूक व रहदारी जैसे थे झाली. कुठे लोडगाड्या, कुठे फेरीवाले तर कुठे मुजोर वाहनधारक आपल्या स्वतः च्या मालकीची जागा असल्या सारखे रस्त्यात उभे राहतात. वारंवार प्रशासनाच्या लक्षात अनेकांनी आणून दिलं, परंतु त्यावर कोणाचाही अंकुश नाही . अतिक्रमण हटाव मोहिमे

## उमेश सुरुसे यांनी जलसिंचन प्रकल्पांबाबत जलसंपदा मंत्री यांना दिले निवेदन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील वाशिम तालुक्यातील नामांकित सापळी येथील युवा शेतकरी उमेश रमेश सूरुसे यांनी गावाला व शेतीसाठी मुबलक पाणी मिळण्यासाठी सापळी ला धरण मंजूर झाले असून जल सिंचन प्रकल्पां बाबत जलसंपदा कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिले.

## केळी उत्पादन संघाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी सुभाष रौंदळे



■ प्रतिनिधी | अकोट ■

केळी पिकांमधील उल्लेखनीय कार्याची दखल घेत दानापूर येथील सुभाष रौंदळे यांची केळी उत्पादक शेतकरी संघाच्या अकोला जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती महाराष्ट्र राज्य केळी उत्पादक शेतकरी संघाचे संस्थापक अध्यक्ष किरण चव्हाण यांच्या आदेशाने करण्यात आली असून प्रदेश सरचिटणीस सचिन कोरडे यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती प्रदान करण्यात आले. याप्रसंगी प्रयोगशील शेतकरी गोपाल येऊन, राजेश वानखडे, महेश मामनकर, अशोक घायल, दिगंबर ढगे , आदी मान्यवर उपस्थित होते. सुभाष रौंदळे हे अकोला जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष असून ते एक प्रयोगशील केळी उत्पादक आहेत. माढा (जि. सोलापूर ) येथे झालेल्या केळी परिषदेत संस्थापक अध्यक्ष किरण चव्हाण यांनीही घोषणा केली होती. यावेळी सचिन जोध, वैभव जंवजाळ , विकास जवंजाळ, अक्षय बनकर, मंगेश मानकर, पवन गिरे उपस्थित होते.

> निर्यातक्षम केळी उत्पादक, केळी प्रतिक्रिया उद्योग आणि तसेच केळीला योग्य दल मिळावेत यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन व काम करू, केळी उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा आपला प्रमुख उद्देश राहील.
>
> **सुभाष रौंदळे**
> कार्याध्यक्ष केळी उत्पादक शेतकरी संघ

## मंगरूळपीर गट विकास अधिकारी यांनी तहसीलदारांना आपत्ती व्यवस्थापनाची दिली चुकीची माहिती

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

मंगरूळपीर तालुक्यात आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सक्षम आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे, अशी भूमिका उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव आणि किशोर देशमुख यांनी घेतली आहे. या उद्देशाने, गटविकास अधिकारी यांना उपविभागीय अधिकारी यांनी एक विनंती पत्र दिले. या पत्रात प्रत्येक गावातून आपत्ती व्यवस्थापनात कार्यरत असणाऱ्या होतकरू व जिगरबाज युवकांची नावे संकलित करून ती सादर करण्याचे निर्देश तहसीलदारामार्फत गटविकास अधिकारी, पंचायत समिती मंगरूळपीर यांना देण्यात आले.

तहसीलदारांनी १८/३/२०२५ आणि १३/५/२०२५ रोजी पत्र तसेच फोनद्वारे माहितीची मागणी केली. मात्र, गटविकास अधिकाऱ्यांनी तब्बल ६७ दिवसांच्या विलंबाने, म्हणजेच २८/०५/२०२५ रोजी पत्र क्रमांक २१६४ अन्वये माहिती सादर केली. धक्कादायक बाब म्हणजे, ही माहिती अत्यंत चुकीची आणि हास्यास्पद असल्याचे पडताळणीत समोर आले आहे. तऱ्हाळा, शेलूबाजार, वरूड बु., लाठी, वानोजा, पिंप्री भायजी महाराज या गावांची दिलेली नावे तपासली असता, त्यात आपत्ती व्यवस्थापनासाठी पात्र नसलेल्या निष्क्रिय लोकांचा समावेश असल्याचे दिसून आले. काही सरपंचांनीही या यादीला 'बचोका का खेळ' असे टीका केली आहे.

## ग्रामपंचायत सदस्यपदावर गदा!

### वरदरी बु.च्या सविता जाधव यांना जिल्हाधिकाऱ्यांचा झटका

■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील वरदरी बु. गावात मोठी प्रशासकीय उलथापालथ झाली आहे. ग्रामपंचायत सदस्य सौ. सविता प्रेमदास जाधव यांना जिल्हाधिकारी वाशिम यांनी सदस्यपदासाठी अपात्र घोषित केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

हा निर्णय २८ मे २०२५ रोजी पारित करण्यात आला असून, गंगाधर काळूसिंग राठोड यांनी केलेल्या तक्रारीनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे.

**काय आहे प्रकरण :** ग्रामपंचायत अधिनियम १९५९ अंतर्गत दाखल प्रकरणात, अर्जदार गंगाधर राठोड यांनी सविता जाधव यांच्याविरुद्ध सदस्यपदासंदर्भात आक्षेप नोंदवला होता. जिल्हाधिकारी कार्यालयाने सखोल चौकशीनंतर राठोड यांचा अर्ज ग्राह्य धरत जाधव यांना अपात्र ठरवले.

**आदेशाचे मुद्दे:** गंगाधर राठोड यांचा विवाद अर्ज मंजूर, सौ. सविता जाधव यांना ग्रामपंचायत सदस्य पदावरून अपात्र घोषित, खर्चासंदर्भात कोणताही आदेश नाही, तहसीलदार मालेगाव यांना आदेशाची तामील करून पोच सादर करण्याचे निर्देश, गटविकास अधिकारी पंचायत समिती मालेगाव यांना पुढील कार्यवाहीचे आदेश, गावात राजकीय तापमान वाढले!

सदस्यपद रद्द झाल्यानंतर गावात राजकीय हालचालींना वेग आला आहे. समर्थक आणि विरोधकांमध्ये चर्चा रंगली आहे. जाधव यांचे समर्थक यास राजकीय सूडाची भावना मानत आहेत, तर काही ग्रामस्थ जिल्हाधिकाऱ्यांच्या पारदर्शक निर्णयाचे कौतुक करत आहेत. आता या पदासाठी नव्याने भरती केली जाईल की पुन्हा निवडणूक लागेल, हे लवकरच स्पष्ट होईल. पण सध्या तरी वरदरी बु.च्या ग्रामपंचायतीत सत्तेचे समीकरण बदलणार हे नक्की!

## संशयास्पद स्थितीत इसमाचा मृतदेह आढळल्याने खळबळ

### चान्नी ठाणे हद्दीतील विवरा परिसरातील घटना



> *विवरा परिसरात संशयस्पद इसमाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच मृतदेहाचा पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. उत्तरीय तपासणी अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.*
>
> ***रवींद्र लांडे,***
> *ठाणेदार चान्नी*

**खेट्री :** पातुर तालुक्यातील चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत विवरा चरणगाव रस्त्यावरील सोलर प्लांटच्या बाजूला संशयस्पद इसमाचा मृतदेह आढळल्याची घटना मंगळवार दि.१० जून रोजीच्या संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास उघडकीस आली, रमेश निंबोकार ४९ असे मृतक इसमाचे नाव आहे. मृतक दुपारी घरून कामानिमित्त बाहेर गेला होता. संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास विवरा परिसरात संशयस्पद मृतदेह आढळल्याचे वृत्त गावात पसरताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पोलिसांना माहिती दिली, ठाणेदार रवींद्र लांडे आपल्या ताफ्यासह त्वरित घटनास्थळी दाखल झाले, आणि मृतदेहाचा पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालय अकोला येथे पाठविण्यात आले आहे. मृतक रमेश निंबोकार याचा संशयस्पद मृत्यूप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपासाची प्रक्रिया चान्नी पोलिसांनी सुरू केली आहे.

## गोरक्षण रोडवरील १३२ केव्ही उपकेंद्राच्या आवारभिंतीच्या कामात अनियमितता

### संबंधित अधिका-यांची अर्थपूर्ण डोळेझाक

■ समीर ठाकूर ■

**अकोला :** स्थानिक गोरक्षण रोडवरील महापारेषण कंपनीच्या अधिनस्थ असलेले १३२ केव्हीचे उपकेंद्राच्या आवारभिंतीचे काम सुरू आहे. सदर कामात निविदेतील अटी व शर्तीचे उल्लंघन होत असून मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचे दिसून येत आहे. या संदर्भात मुंबई येथील 'प्रकाश गंगा' या सुप्रीमो कार्यालयाकडे तक्रार सुद्धा पाठविण्यात आली असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, शहरातील गोरक्षण रोडवर महापारेषण कंपनीचे १३२ केव्हीचे उपकेंद्र आहे. सदर उपकेंद्र हे अतीसंवेदनशील असल्याने त्याची आवारभिंत सुरक्षेच्या दृष्टीने उंच करण्याच्या कामाला मंजुरात देण्यात आली. त्यानुसार सदर कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदा ही तब्बल २५.९० टक्के कमी दराने भरल्याने धीरज अनिल मालपाणी यांना देण्यात आली. निविदेची अंदाजित रक्कम १ कोटी ४२ लक्ष ५२ हजार ४२२ अशी होती तर कंत्राटदार मालपाणी यांनी २५.९० टक्के कमी दराने निविदा भरल्याने हे काम चक्क १ कोटी ५ लक्ष ६१ हजार २६ रुपये एवढी झाली. तब्बल ३६ लक्ष ८५ हजार रुपयांचा फरक या प्रकरणात दिसून येत आहे. एवढ्या अल्प दरात हे काम होत असल्याने या कामाच्या गुणवत्तेवरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे दुरुस्ती आणि उंची वाढविण्याचे असलेले हे काम सुद्धा दर्जाहीन झाल्याच्या गंभीर आरोप करण्यात आला आहे. तर कामाची मुदत संपल्यावर सुद्धा सदर काम पूर्ण झाले नसल्याचे दिसून येत आहे. या कामाचे परीक्षण केल्यास अनेक ठिकाणी भिंतींना डागडुजी केल्याचे स्पष्ट दिसून येत असून जुन्या खळखळीत झालेल्या भिंतींवरच ही भिंत उभारल्या गेली असल्याचे दिसून येत आहे. या सर्व कामाकडे त्याची देखभाल करणारे स्थापत्य विभागाचे अधिकारी सहाय्यक अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आणि विभागीय कार्यकारी अभियंता यांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

> या कामाची माहिती घेऊन सांगतो, सद्यस्थितीत आमच्या पाहणीप्रमाणे काम बरोबर सुरू आहे. तरी सुद्धा या कामाची तपासणी पुन्हा करावयास सांगतो. कंत्राटदाराचे कुठलेही देयक काढण्यात आले नाही.
>
> **सागर जारे**
> कार्यकारी अभियंता ( स्थापत्य विभाग ) महापारेषण

कोट्यावधी रुपयाचे असलेले हे काम काही लाखो रुपयातच होत असल्याचा गंभीर आरोप सुद्धा करण्यात आला आहे. तर मार्च अखेरच्या नावाखाली सदर कंत्राटदाराला काम पूर्ण होण्या अगोदरच मोठ्या प्रमाणात देयकाची पूर्तता केली असल्याची सुद्धा माहिती विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त आहे. तर याप्रकरणी वरिष्ठ अधिकारी वर्गाने तात्काळ लक्ष देत कारवाई करावी व दर्जेदार स्वरूपाचे काम करून घ्यावे अशी मागणी जोर धरत आहे.

जनमाध्यम
epaper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक १९६ ■ बुधवार ११ जून २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# विद्यार्थ्यांच्या पाठीवर पुस्तकाचा तर पालकांच्या खिशावर पैशांचा बोजा

## शालेय साहित्याच्या दरात २० टक्के वाढ

वर्धा जनमाध्यम :- उन्हाळ्याच्या दीर्घ सुट्यानंतर २३ जूनला नवीन शैक्षणिक सत्राला प्रारंभ होत आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी शालेय साहित्य खरेदीची लगबग सुरू होते. मात्र, दरवर्षी महागाईचा फटका पालकांना बसतो. यंदाही शालेय साहित्याच्या किंमतीत २० टक्के वाढ झाली असल्याने या शैक्षणिक सत्रात पालकांना अधिकचा आर्थिक भुर्दंड बसणार आहे. एक हफ्त्यानंतर नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होणार आहे. शालेय वस्तू खरेदीकरिता बाजारपेठ सजल्या आहेत. शालेय साहित्यालाही महागाईची झळ बसली असून, वस्तुंच्या किंमतीमध्ये १५-२० टक्के वाढ झाल्याचे दिसून येत आहे. छोटा भीम, बार्बी, डोरेमन, शिनचॅन, बालगणेशा, हनुमान, बेनटेन आदी रंगीबेरंगी कार्टूनचे चित्र रेखाटलेल्या वस्तूंना वाढती मागणी आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी वह्या, पुस्तके, गणवेश, कंपास बॉक्स, दप्तर, पाण्याची बॉटली या वस्तू खरेदीची लगबग २ आठवड्यानंतर वाढणार आहे. १०० रुपयांपासून ते १५०० रुपयांपर्यंतचे दप्तर बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मुलांना दप्तराचे ओझे वाटू नये, याकरीता वजनाने हलक्या बॅगलाही मागणी आहे. शाळेच्या दप्तराचा पावसापासून बचाव करण्यासाठी स्वतंत्र कव्हरही विक्रीसाठी उपलब्ध आहे. शहरातील दुकानांमध्ये शाळेचे दप्तर, पाण्याची बाटली, खाऊचा डब्बा, कंपास बॉक्स यांचा एकत्रित संच



विक्रीसाठी उपलब्ध असून, हा संपूर्ण संच ५०० ते १००० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे. पाण्याच्या बॉटलच्याही किंमती वाढल्या असून ६० रुपयांपासून ते २०० रुपयांपर्यंतच्या बॉटल बाजारत उपलब्ध आहेत. नामांकित शाळांकडून विशेष-दुकानातूनच खरेदी अट घातल्याने पालकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. अमूकतमूक दुकानातूनच गणवेश खरेदी करण्याचा अट्टाहास केल्याने पालकांना खिसा रिकामा करावा लागत आहे. शैक्षणिक साहित्यातील दरवाढीमुळे पालकांचे मात्र बजेट कोलमडणार आहे. शाळा सुरु होण्यास अद्यापही एक आठवडा बाकी आहेत. त्यामुळे बाजारपेठेत तेवढी गर्दी नाही. मात्र, शाळा सुरू होण्याला दोन चार दिवस बाकी असताना खरेदीसाठी पालकांची गर्दी उसळणार आहे,

> नवीन शैक्षणिक साहित्य दुकानात आणण्यात आलेले आहेत. मात्र, वाहतूक खर्चात वाढ झाल्याने यावर्षी शैक्षणिक साहित्याच्या किंमतीत १५ ते २० टक्के वाढ झाली आहे. त्याला आम्हीही काही करू शकत नाही. **भुषण कठाळे,** विक्रेता वर्धा

> नवीन शैक्षणिक सत्राला येत्या काही दिवसात प्रारंभ होत आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी शालेय साहित्य खरेदीची लगबग सुरू होते. मात्र, दरवर्षी महागाईचा फटका पालकांना बसत आहे. यंदाही शालेय साहित्याच्या किंमतीत वाढ झाली आहे. शिक्षण, साहित्य महाग झाल्याने मुलांना शिकवायचे कसे ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरवर्षी साहित्याच्या भरमसाठ महागाईची झळ सोसावी लागत आहे. या महागाईमुळे आमची मुले शिक्षण घेऊ नयेत का? आम्ही मुलांना शिकवायचे कसे ? या विवंचणेतच किती दिवस जगायचे, यावर मंथन होणे गरजेचे आहे. **- दिपक बोंबले, पालक वर्धा**

# साटोडाचे सरपंच हरीश विरूटकर पायउतार



**वर्धा जनमाध्यम** : ग्रामपंचायत कार्यालय साटोडा येथे सरपंच बादल उर्फ हरीश विरूटकर यांचेवर अविश्वास ठराव घेणेसाठी विशेष सभा घेण्यात आली. अध्यासी अधिकारी तहसीलदार संदीप पुंडेकर, ग्रामविकास अधिकारी विलास नव्हाळे, विस्तार अधिकारी सुनिल गावंडे,मंडळ अधिकारी आदे यांचे उपस्थितीत सभा सुरु झाली. विषय होता सभागृहात विश्वासात न घेता कामकाज करणे त्यावेळी बाजू मांडताना सरपंचांनी सांगितले की प्रत्येक सभेला सदस्य प्रोसेडिंग वर सही करतात. त्यामुळे सर्व काही बरोबर आहे. विषयाची बाजू मांडताना ग्रामपंचायत सदस्य अजय जानवे यांनी सांगितले की गावाच्या विकासाकरिता प्रशासकीय मंजुरी द्यावीच लागते. त्याशिवाय कामे करताच येत नाही खरेदी करतांना वस्तूची पत, कंपनी, बाजारभाव पाहून खरेदी करावी लागते. १५ वा वित्तआयोग अंतर्गत घरगुती कचरा कुंडी खरेदी करण्यात आली त्याची मार्केट मधील किंमत १०० रुपयापेक्षा कमी असतांना जे. एम. वर २४९ रुपये किंमत बिलामध्ये लावन्यात आली एकूण १६. ४४ लक्ष रुपयाची खरेदी केली. तसेच ४ लोकल वॉटर कुलर खरेदी केली त्याची प्रति नग ४३००० रुपये बिल लावण्यात आले. नामवंत ब्लु स्टार कंपनीचा वॉटर कुलर २६००० रुपयाचा आहे. अश्या प्रकारे लाखो रुपयाची खरेदी ही जादा दराने खरेदी केली. आजपर्यंत असाच कारभार सुरु होता.सदस्यांना विश्वासात न घेता कामकाज करणे या कारणामुळे १३ सदस्यांनी हात वर करून ठरवाच्या बाजूने मतदान केले.सभेला १४ सदस्य उपस्थित होते. ठरावाच्या विरोधात स्वतः सरपंच यांनी हात वर केला. ठरावाच्या बाजूने ३/४ मते असल्यामुळे ठराव मंजूर झाल्याचे जाहीर करण्यात आले. सभेमध्ये उपसरपंच प्रितीताई शिंदे, लता कोपरकर, कल्पना वाटकर गैरहजर होते.

# बाल व किशोरवयीन कामगारांना कामावर ठेवणे कायद्याने गुन्हा

## बाल कामगार प्रथा विरोधी दिन

**वर्धा जनमाध्यम** : बालमजुरी ही एक अनिष्ठ प्रथा असून ती सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांशी निगडीत असल्यामुळे या प्रथेविरुध्द विस्तृत प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे. यासाठी दरवर्षी १२ जुन हा दिवस जागतिक बाल कामगार प्रथा विरोधी दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील सर्व दुकाने, आस्थापना धारक, उद्योजक, बांधकामनियोक्ते, विटभट्टी व इतर आस्थापना मालकांनी बाल व किशोरवयीन कामगारांना कामावर ठेऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

भारतीय राज्यघटनेनुसार शिक्षाण आणि आरोग्य बालकांचे मुलभुत अधिकार आहेत. बालकाचे हे अधिकार अबाधित ठेवण्यासाठी बालमजुरीप्रथा कायम स्वरुपी नष्ठ होणे आवश्यक आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयाने १४ वर्षाखालील मुलांना बालमजुरी करण्यास प्रवृत्त करणा-या विरुध्द जबर शिक्षेची तरतुद केली आहे. अधिनियमांतर्गत १४ वर्षाखालील बालकांना कोणत्याही व्यवसाय, प्रक्रियेत कामावर ठेवणे तसेच १४ वर्ष पुर्ण परंतु १८ वर्ष पुर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलांना धोकादायक उद्योग व प्रक्रियेमध्ये कामावर ठेवणे गुन्हा आहे. जर मालकाने किंवा नियोक्त्याने बाल अथवा किशोरवयीन मुलांना कामावर ठेवल्याण त्यास ६ महिने ते २ वर्षापर्यंत कारावास किंवा २० हजार ते ५० हजार रुपये पर्यंत दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होऊ शकते अशी तरतूद आहे. असे जिल्हा सरकारी कामगार अधिकारी यांनी कळविले आहे.

# पालकमंत्री डॉ. भोयर आज जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. भोयर आज दि.११ जुन रोजी जिल्ह्याच्या दौ-यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम असा आहे.



दि.११ जुन रोजी सकाळी ११.३० वाजता नागपूर येथून वर्धेकडे प्रयाण करतील दुपारी १२.३० वाजता वर्धा येथे आगमन व दुपारी १२.३० ते २ वाजेपर्यंत प्रशासकीय कामासाठी राखीव दुपारी २ वाजता शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेस उपस्थिती. दुपारी ४ वाजता संत बाबा गोधडीवाला धाम दयालनगर येथे नझुल जमीन मालकांना हक्क बाबत शिबिरास उपस्थिती. सायंकाळी वर्धा येथून नागपूर कडे प्रयाण करतील.

# पर्यावरण यांची सांगड घालत महिलांनी वडवृक्ष लावून साजरी केली वडपुजन

## दरवर्षीच केले जाते वडवृक्षारोपण

**हिंगणघाट जनमाध्यम** ; आधार फाउंडेशनच्या महिला मंचा द्वारे स्थानिक उदय गृहनिर्माण सोसायटीतील हनुमान मंदिराच्या प्रांगणामध्ये वटसावित्रीच्या पूजनाची पारंपरिक पद्धत जोपासत वटसावित्रीचे पूजन म्हणजे वटवृक्ष लावणे ही काळाची गरज ओळखून खऱ्या अर्थाने वटसावित्री चा सण साजरा केला. पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा सदापर्णी बहुवार्षिक वृक्ष म्हणजे वटवृक्ष होय. परंपरा आणि पर्यावरण याची योग्य सांगड घालून वटवृक्ष रोपण व त्याचे संवर्धनाचे कार्य आधार फाउंडेशनच्या महिलांनी हाती घेतला गेल्या नऊ



वर्षापासुन हिंगणघाट शहर व परिसरात आधार फाऊंडेशन द्वारे विविध समाजपयोगी व मानवी कल्याणकारी उपक्रमाचे आयोजन केल्या जाते हा महाकाय वटवृक्ष शांत, थंड व सर्वाधिक प्राणवायू देणारा असून त्याची साल, मुळे व फळे अतिशय गुणकारी समजल्या जात असल्यामुळे शहरांमध्ये विविध ठिकाणी रोपणासाठी वटवृक्षाचे वृक्षारोपण समुद्रपुर नगरपंचायतिचे मुख्य कार्यकारी अधिकारी पौर्णिमा गावित, लोकमान्य हायस्कूल दारोडा शाळेच्या मुख्याध्यापिका उषाताई घोडमारे,आधार फाऊंडेशनच्या कार्यकारी अध्यक्षा माधुरी विहिरकर,स्वाती वांदिले यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा गावित यांनी वृक्षारोपण हि काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन ज्योती धार्मिक यांनी केले तर आभार प्रदर्शन शिल्पा हिंगणे यांनी केले.

# हिंगणघाट येथे वादळी वाऱ्यासह पाऊस; झाडं कोसळली

**हिंगणघाट जनमाध्यम** , मंगळवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे नजीकच्या बोरगाव (नां) येथे घरांचे छप्पर उडून मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. अनेक घराच्या भिंती पडल्या आणि अनेक झाडेसुद्धा उन्मळून पडली. मंगळवारी झालेल्या याच अवकाळी पावसामुळे मौजा-वेणी,सास्ती तसेच धोची येथील अनेक घराचे छप्पर उडाले.अनेक घरांची पडझड झाली असून येथसुधा मोठी झाडे धाराशायी झाली असल्याची माहिती आहे.



## आश्रम परिसरातील झाड कोसळले; एक महिला जखमी

**पवनार जनमाध्यम** , मोठा अपघात घडला. जोरदार मंगळवारी अचानक दुपारी ३ वाजताच्या दरम्यान आलेल्या वादळी वाऱ्याच्या पावसामुळे आश्रम परिसरात वाऱ्यामुळे परिसरातील एक जुने पिंपळाचे झाड बुडासह उन्मळून पडले. या घटनेत झाडाखाली वनिता प्रभाकर हजारे ही महिला सापडल्याने ती गंभीर जखमी झाली .



घटनेनंतर नागरिकांनी तात्काळ मदतकार्य सुरू करत जखमी महिलेला रुग्णालयात दाखल केले. सुदैवाने घटनास्थळी इतर कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, परिसरातील अन्य साहित्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले,

अपघाताची माहिती मिळताच सेवाग्राम पोलीस आणि पवनार ग्रामपंचायत कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून, झाड हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. दरम्यान, नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले.

या वादळामुळे शहरातील अनेक भागांत झाडे उन्मळून पडण्याचे प्रकार घडले असून, विजेचा पुरवठाही काही वेळासाठी खंडित झाला होता.


# अधिसूचना

**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), उ.व.प्र.**
**जिल्हाधिकारी, वर्धा यांचे कार्यालय**
क्र.सह.म.अ./उ.जि./भूसं/उ.व.प्र/कावि-४२४/२०२५
दिनांक २६.०५.२०२५

**भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९(१) खालील अधिसूचना**

भुसंपादन प्रकरण क्रमांक - ०५/एलएक्यू-४७/२०२३-२४
मौजा - आंजी, तालुका-देवळी, जि.वर्धा

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त अधिनियम** असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना क्र.११ राजपत्र २४ ते ३० ऑक्टोबर, २०२४ अन्वये पान क्र.५ ते ६ अ.क्र.१३२० वर प्रारंभिक अधिसुचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशिलवार निविर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, वर्धा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी **पुनर्वसाहत क्षेत्र** म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा या कार्यालयास (अधिसूचना काढण्यापुर्वी अधिकाऱ्यांचे नांव व पत्ता नमुद करावा) पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**
**जमिनीचे वर्णन**
**भुसंपादन प्रकरण क्रमांक - ०५/एलएक्यू-४७/२०२३-२४**
**मौजा - आंजी, तालुका - देवळी, जि.वर्धा**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) हे.आर. मध्ये |
|---|---|---|
| १. | ५६/१, ५६/२, ५६/३ | ०.०६ |
| २. | ५७ | ०.०६ |
| ३. | ५८/२ | ०.०४ |
| ४. | ५८/३ | ०.०४ |
| ५. | ९२/१ | ०.०३ |
| ६. | ९२/२ | ०.०३ |
| ७. | ९३/२ | ०.०४ |
| | **एकुण** | **०.३०** |

**अनुसूची - दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | - | निम्न वर्धा प्रकल्प |
| सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन | - | पिंपळगांव ल.का.क्र.६ च्या पुच्छ नालीचे मातीकाम व बांधकामाकरीता |
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार पायाभूत सुविधा, सोयी सुविधा, याबाबत व इतर लाभासंबंधात) | - | या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणी पुरवठा, सिंचन होणार असल्यामुळे त्या परिसरातील शेतकऱ्यांना त्याच बरोबर ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांचे जीवनमानात सुधारणा होणार आहे. |

**अनुसूची - तीन**
**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**
**---- निरंक ----**

**अनुसूची - चार**
**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**
**---- निरंक ----**

**टिप -**
उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

Digitally signed by
NARENDRA SADASHIVRAO FULZELE

दिनांक - २६.०५.२०२५
ठिकाण - वर्धा

**(क्र.जिमाका-वर्धा/६९/२०२५-२६)**

**स्वाक्षरी/-**
**जिल्हाधिकारी, वर्धा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### केरळात कोरोना पाठोपाठ आता हेपेटायटीसच्या रुग्णांमध्ये वाढ




**तिरुवनंतपुरम :** केरळमध्ये गेल्या काही दिवसांपासून कोरोनाचे रुग्ण वाढत आहेत. अशातच आता केरळमध्ये हेपेटायटीस या प्राणघातक प्रादुर्भावामुळे चिंता वाढत आहे. याचा सर्वाधिक परिणाम त्रिशूर जिल्ह्यात दिसून येत आहे, तिथे हेपेटायटीसच्या रुग्णांमध्ये अचानक वाढ झाली आहे. यामुळे आरोग्य विभागाने याबाबत लोकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.त्रिसूर जिल्ह्यात हेपेटायटीसच्या रुग्णांमध्ये अचानक वाढ झाली आहे. यानंतर प्रशासन सतर्क झाले असून जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांनी याबाबत लोकांना सूचना दिल्या आहेत. फक्त उकळलेले आणि फिल्टर केलेले पाणी पिण्यास सांगितले आहे. शिळे अन्न खाणे टाळा. विशेषतः हॉटेल्स आणि ढाब्यांना स्वच्छतेची विशेष काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हॉटेल्स आणि ढाब्यांना पिण्याचे पाणी व्यवस्थित उकळल्यानंतरच द्यावे आणि गरम पाण्यात थंड पाणी मिसळू नये असे सांगण्यात आले आहे. केरळमध्ये या संसर्गामागील मुख्य कारण हेपेटायटीस ए आणि ई विषाणू आहे, जो दूषित अन्न आणि पाण्याद्वारे पसरतो. पावसाळा सुरू होणार आहे आणि या काळात रोग पसरण्याचा धोका आणखी वाढतो. हेपेटायटिसचा संसर्ग शरीरात प्रवेश केल्यानंतर, त्याची लक्षणे दिसण्यास १५ ते ६० दिवस लागू शकतात.ताप आणि शरीरदुखी, थकवा आणि अशक्तपणा, डोकेदुखी आणि मळमळ, डोळे आणि त्वचा पिवळी पडणे, लघवी काळी पडणे. अतिसार जर यापैकी कोणतीही लक्षणे दिसली तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा. स्वतःहून औषधे घेणे टाळा.

### हवाईदलात होणार ३ अत्याधुनिक आय-स्टार विमानांचा समावेश



**नवी दिल्ली-**भारतीय हवाई दलात लवकरच ३ अत्याधुनिक आय-स्टार विमानांचा समावेश होणार आहे. त्यामुळे भारत देखील अमेरिका, इस्त्राईल आणि ब्रिटनसारख्या देशांच्या यादीत सहभागी होईल. या विमानांच्या खरेदीसाठी संरक्षण मंत्रालय उच्चस्तरीय बैठकीत मंजुरीसाठी आपला प्रस्ताव ठेवणार आहेत. या प्रकल्पाची किंमत सुमारे १० हजार कोटी रुपये असेल.आय-स्टार विमाने ही उच्च-उंचीवरील गुप्तचर विमाने म्हणून ओळखली जातात. या विमानांमुळे भारतीय हवाई दलाला रडार यंत्रणा, मोबाइल हवाई सुरक्षा प्रणालीसारख्या शत्रूच्या लक्ष्यांवर अचूक हल्ले करता येतील. भारतीय लष्कराच्या पाकिस्तानविरुद्ध सुरू असलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर संरक्षण मंत्रालय या महिन्याच्या अखेरीस उच्चस्तरीय बैठकीत हा प्रस्ताव मांडण्याची अपेक्षा आहे.

### खराब हवामानामुळे शुभांशू शुक्ला यांचे उड्डाण पुढे ढकलले



**नवी दिल्ली-**भारताच्या हवाई दलाचे पायलट ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांचे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकासाठीचे मिशन ॅंदस-४ हे पुढे ढकलण्यात आले आहे. खराब हवामानामुळे हे लॉंचिंग पुढे ढकलण्यात आले आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था(इस्त्रो)ने ही माहिती आपल्या अधिकृत एक्स वर पोस्ट करत दिली आहे.इस्त्रोचे प्रमुख डॉ. व्ही. नारायणन यांच्या हवाल्याने एक्सवरील पोस्टमध्ये लिहिले, खराब हवामानामुळे भारताचे गगनप्रवासी यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पाठवण्यासाठीचे ॅंदस-४ चे लॉंचिंग १० जूनच्या ऐवजी ११ जूनला केले जाणार आहे. लॉंचिंगची पुढील वेळ ११ जूनला संध्याकाळी ५.३० वाजता आहे.

### चांदीच्या दरात वाढ कायम

**मुंबई-**आजही सलग तिसऱ्यांदा सोन्याच्या दरात किरकोळ घट झाली आहे. बाजारातील एकवेळी सोन्याची संदिग्धता कायम असताना बाजारातील सोन्याच्या दरात आज घट कायम राहिली आहे. सलग चार वेळा सोन्याच्या दरात वाढ झाल्यानंतर आज तिसऱ्यांदा घट झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील अमेरिका व चीनची व्यापारावर सकारात्मक चर्चा व पुरवठ्यातील सरलता,घटलेली मागणी वाढता पुरवठा यामुळे सोन्याच्या दरात घट घडून येत आहे. आंतरराष्ट्रीय दबाव कायम असतानाही भारतीय सराफा बाजारात सोन्याने आजही खालची पातळी राखली आहे. 'गुड रिटर्न्स' या संकेतस्थळावरील माहितीनुसार, सोन्याच्या २४ कॅरेट प्रति ग्रॅम किंमतीत ११ रूपयांची घट होऊन दर ९७५८ रूपयांना पोहोचले आहेत. तर प्रति तोळा किंमत ९७५८० रूपये आहे.चांदीच्या दरात आज प्रति ग्रॅम किंमत १ रूपयाने वाढत १०९ रूपये दरावर पोहोचली आहे तर प्रति किलो चांदी १०९००० रूपयांवर पोहोचली आहे. यामुळे प्रति किलो चांदीचा भाव तब्बल १००० रुपयाने वाढला आहे. चांदीच्या एमसीएक्सवरील निर्देशांकात ०.४२ इ घसरण होत किंमत पातळी १०६६३५.०० आहे.

### चोकोबारमध्ये सापडली मेलेली पाल

**पंजाब-** लुधियानामध्ये एका आईस्क्रीममध्ये मृत पाल आढळल्याने खळबळ उडाली आहे. एका मुलाने रस्त्यावरील विक्रेत्याकडून एक चोकोबार विकत घेतला होता. यामध्ये एक मृत पाल आढळली, मुख्य म्हणजे हे आइस्क्रीम मुलाने खाल्ले होते. यामुळे विषबाधा झाल्यामुळे, मुलाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रस्त्यावरील विक्रेत्याकडून आईस्क्रीम खरेदी केल्यानंतर, त्यात एक मृत पाल दिसली होती. लुधियाना येथील जिल्हा आरोग्य विभागाच्या प्रयत्नांना न जुमानता, रस्त्यांवर आणि परिसरात निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांची विक्री सर्रास सुरूच आहे. परिणामी, रस्त्यावरील गाडीतून खरेदी केलेल्या आईस्क्रीममधून एक पाल बाहेर पडली, यामुळे विभागातही खळबळ उडाली आहे.लुधियानातील ग्यासपूर भागात ही घटना घडली आहे. गयासपूरच्या सुंदर नगरमध्ये, एका ७ वर्षांच्या मुलाने रस्त्यावरील विक्रेत्याकडून २० रुपयांना आईस्क्रीम खरेदी केले होते. मुलाने २० रुपयांना दोन चोको बार कुल्फी खरेदी केल्या. मुलाने आईस्क्रीम बाउलमध्ये टाकले आणि ते खाऊ लागला तेव्हा त्याला आईस्क्रीममध्ये एक मृत पाल दिसली. त्याने ताबडतोब ही पाल आजीला दाखवली, त्यानंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील लोकांनी मुलाला ताबडतोब एका खाजगी रुग्णालयात नेले.

---

## 'कॅपिटल मार्केट'मधून निधी उभारणारी

# पिंपरी-चिंचवड ही देशातील पहिली महानगरपालिका : मुख्यमंत्री

## महानगरपालिका हरित कर्जरोखे मुंबई शेअर बाजारात लिस्टिंग कार्यक्रम

**मुंबई-**देश विकसित होण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महापालिकांनी आर्थिक बाबतीत आत्मनिर्भर व्हायला पाहिजे, असा आग्रह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सातत्याने राहिला आहे. प्रधानमंत्र्यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत पिंपरी चिंचवड महापालिकेने हरित कर्जरोखे 'इश्यू' केले. अशा' कॅपिटल मार्केट' मधून निधी उभारणारी पिंपरी- चिंचवड ही देशातील पहिली महानगरपालिका ठरली आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज काढले.पिंपरी-चिंचवड महापालिकेचा हरित कर्जरोखे मुंबई शेअर बाजारात लिस्टिंग कार्यक्रम बॉम्बे स्टॉक एक्सचेंज मधील बीएसई आंतरराष्ट्रीय सभागृहात पार पडला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. कार्यक्रमप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार सर्वश्री महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंग, अप्पर मुख्य सचिव असिम गुप्ता, प्रधान सचिव डॉ. के गोविंदराज,बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे व्यवस्थापकीय संचालक सुंदरम रामामूर्ती उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पिंपरी - चिंचवड महापालिकेने जारी केलेल्या हरित कर्जरोख्यांना



जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळाला. गुंतवणूकदारांनी भरभरून गुंतवणूक केली. कर्ज रोखे इश्यू झाल्यानंतर काही मिनिटातच १०० कोटी रुपयांची गुंतवणूक याद्वारे करण्यात आली. त्यानंतर पाच पटीने गुंतवणूकदारांमध्ये वाढ झाली. यावरून गुंतवणूकदारांचा हरित कर्ज रोख्यांवरील विश्वास दिसतो. या रोख्यांचा कालावधी ५ वर्षांचा असून त्यासाठी ७.८५ टक्के स्पर्धात्मक व्याजदर निश्चित करण्यात आला आहे. शेअर बाजारात कर्जरोखे ' लिस्टिंग ' करण्याची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट आहे. ' कॉर्पोरेट' अटी शर्तींची पूर्तता करीत ' लिस्टिंग'ची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या निधीतून पायाभूत सोयी सुविधांची कामे पूर्ण करण्यात येणार आहे. ही कामेही हरित पद्धतीची, पर्यावरण पूरक आणि शाश्वत विकासाची असणार आहेत. केंद्र शासनाकडूनही हरित कर्ज रोखे इश्यू केल्यामुळे २० कोटीचे प्रोत्साहनपर अनुदानही महापालिकेला प्राप्त झाले आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. महापालिकेच्या संपूर्ण यंत्रणेचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमपूर्वी बेल वाजवून कर्जरोखे मुंबई शेअर बाजारात लिस्टिंग करण्यात आले. हरित कर्ज रोख्यांद्वारे महापालिकेने २०० कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभारला आहे. बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज (बीएसई) च्या इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणालीवर खासगी गुंतवणुकीच्या माध्यमातून हरित कर्ज रोखे इश्यू करण्यात आले होते. गुंतवणूकदारांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर असलेला विश्वास अधोरेखित करत, इश्यू सुरु होताच केवळ एका मिनिटात १०० कोटी रुपयांचा मूळ भाग भरला गेला, तर एकूण ५१३ कोटी रुपयांच्या निविदा प्राप्त झाल्या, म्हणजेच रोख्याला ५.१३ पट अधिक मागणी मिळाली. हरित कर्ज रोखे इश्यूला क्रिसिल आणि केअर या मान्यताप्राप्त संस्थाकडून 'एए इ' (ं) पतमानांकन प्राप्त झाले आहे. हरित कर्ज रोख्यातून उभारलेला निधी निगडी प्राधिकरणातील हरित ते इंद्रायणी नगर चौक दरम्यानचा टेल्को रस्ता विकास प्रकल्प या दोन महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे.

---

# पक्षफुटीवर शरद पवारांचे थेट भाष्य

**पुणे-**आज राष्ट्रवादी पक्षाचा वर्धापन दिन आहे. यावेळी पुण्यात खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. राज्यातील प्रमुख नेते या कार्यक्रमासाठी उपस्थित आहेत. शरद पवार यांनी म्हटले की, हा पक्ष सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला संधी देतो. महाराष्ट्राचा चेहरा बदलणाऱ्यांना कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांचा हा पक्ष आहे. तुम्हा सगळ्यांच्या बांधिलकीवर आणि कष्टावर हा पक्ष उभा आहे. जिल्हा परिषद, नगरपालिका, महापालिका निवडणुका २ ते ३ महिन्यावर आल्या आहेत. तिथे ५० टक्के भगिनींना निवडून द्यायचं आहे. त्यांना संधी दिली तर त्याही कर्तृत्व दाखवू शकतात.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, हा धोरणात्मक निर्णय आपण घेतलेला आहे, तो यशस्वी करण्याच काम येत्या निवडणुकीत आपल्याला करायचे आहे. पक्षांमध्ये संकट आली फूट पडली फूट पडेल असं कधीच वाटतं नाही, काही विरोधी विचारांसोबत गेली आणि ही फूट पडली यावर मला अधिक भाष्य करायचं नाही जे राहिले ते विचारवादी राहिले,

असल्याचे बोलताना शरद पवार दिसले. शरद पवार यांनी एकप्रकारे अजित पवार यांच्यावरच निशाणा साधला.जयंतरावांनी संघटना मजबूत करण्याचे काम केले.



पुढचे तीन महिने महिलांना प्रवाहात आणले जाईल. हाडांच्या कार्यकर्त्यांना संधी देणार असल्याचेही शरद पवार यांनी म्हटले आहे.

राष्ट्रवादीला लोकांचा प्रतिसाद मिळाला. मला १०० विश्वास आहे, येत्या निवडणुकीत चांगले चित्र पाहायला मिळेल. निलेश लंके सारखे लोक हे राष्ट्रवादीचा मौल्यवान ठेवा आहे, म्हणत शरद पवार यांनी लंकेचे कौतुक केले आहे.

पुढच्या दोन ते तीन महिन्यामध्ये महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिकेच्या निवडणुका आहेत आणि या निवडणुकांमध्ये आपण महिलांना ५० टक्के संधी देणार असल्याचे शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे. यामुळेच आता आगामी निवडणुकांमध्ये शरद पवार गटाकडून महिलांना मोठी संधी मिळणार असल्याचे स्पष्ट आहे. पुढील काही महिन्यात महिलांना अधिक प्रवाहात आणले जाईल, असेही शरद पवार यांनी म्हटले आहे.

---

# प्रदेशाध्यक्षपदातून मुक्त करण्याची जयंत पाटील यांची मागणी

## निवडणुकांपर्यंत थांबण्याचा दिला सल्ला



**पुणे-**पुण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदावरून पायउतार होण्याची इच्छा व्यक्त केली. यानंतर शरद पवारांनी पाटील यांना लगेच निर्णय न घेता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपर्यंत थांबण्याचा सल्ला दिला आहे. जयंत पाटील यांनी पक्षाने नवीन चेहऱ्यांना संधी द्यावी, असे मत मांडलं होतं. मात्र, शरद पवारांनी त्यांना निवडणुकीनंतर यावर विचार करू, असं स्पष्ट सांगितलं आहे.

पुण्यातील बालगंधर्व रंग मंदिरात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा वर्धापन दिन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात बोलताना जयंत पाटील म्हणाले,'मला पवार साहेबांनी बरीच संधी दिली. सात वर्षांचा कालावधी दिला.

शेवटी पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी देणे आवश्यक आहे.' त्यांनी पुढे कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले की, 'तुम्हा सर्वांदेखत साहेबांना विनंती करेन की, नवीन लोकांना संधी द्यावी. शेवटी पक्ष पवार साहेबांचा आहे. पवार साहेबांनी यावर योग्य निर्णय घ्यावा.

आपल्याला बरेच पुढे जायचे आहे.' त्यांच्या या बोलण्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला आणि त्यांनी जयंत पाटील यांच्या इच्छेला विरोध दर्शवला.

---

# अजित पवार गट, मिंधे गट लवकरच फुटतील

**मुंबई-**अजित पवार गट, मिंधे गट हे फक्त बुडबुडे आहेत. हे बुडबुडे लवकरच फुटतील. तसेच मोदी, शहा यांच्या भ्रमाचे भोपळे रोज फुटत आहेत. तसेच आपण हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पुढे नेत आहोत, असा काही जणांचा भ्रम आहे. मात्र, महाराष्ट्रद्रोह्यांचे बूट चाटणे, हे बाळासाहेबांचे विचार नाहीत, असे सांगत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी मिंध्यांना चांगलेच फटकारले. हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार मिंधे यांनी कधी आत्मसात केले? ते कोणत्या काळात बाळासाहेबांसोबत होते? काहीजण स्वतःबाबत गैरसमज बाळगतात. त्यातील तो एक भ्रम आहे. महाराष्ट्राच्या मुळावर आलेल्या मोदी, शहा, फडणवीस यांचे बूट चाटणे हा बाळासाहेबांचा विचार कधीही



संजय राऊत यांचा घणाघात

असून शकत नाही. महाराष्ट्र, मुंबईची लूट सुरू असताना मराठी माणसाची गळचेपी होत असताना ते महाराष्ट्रद्रोह्यांचे बूट चाटत असतील, तर त्यावर काही बोलण्याची गरज नाही, असे संजय राऊत म्हणाले. सध्या ईडी, सीबीआय आणि तपास यंत्रणा यांच्या हातात सर्व सूत्रे आहेत. कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी लिहिलेल्या लेखामुळे फडणवीसांपासून मोदीपर्यंत सर्वांना मिरच्या झोंबल्या आहेत. तपास यंत्रणाचा कसा गैरवापर होत आहे, ते त्यांनी मांडले आहे. पक्ष फोडून, आमदार, खासदार विकत घेत, तपास यंत्रणांचा गैरवापर, पैशांचा गैरवापर करत त्यांनी निवडणुका जिंकल्या आहेत. अजित पवार यांचा गट, मिंधे यांचा गट हे बुडबुडे आहेत. हे बुडबुडे लवकरच फुटतील. काही माणसे पक्की असतात, तर काही कच्ची मडकी असतात. पक्क्या माणसांपैकी नाशिकमधील विलास शिंदे आहेत. तर चंद्रहार पाटील यांच्यासारखी काही कच्ची मडकी आहेत. त्यांच्यासाठी आम्ही प्रतिष्ठेचा विषय केला. त्यांच्यासाठी आम्ही प्रतिष्ठा पणाला लावली. मात्र, स्वार्थासाठी, लाभासाठी बेईमानी करावी, त्याला आम्ही काय कमी दिले. त्यांच्या विटयात त्यांना मतं मिळाली नाही. ज्या माणसासाठी आम्ही प्रतिष्ठा पणाला लावली, त्यांनी बेईमानी करावी, याचे वाईट वाटते, असे संजय राऊत म्हणाले.

---

### तमिळनाडूतील प्रसिद्ध मंदिरात मांसाहार करताना पकडले

**तमिळनाडू-**तमिळनाडूतील तिरूवन्नामलाई या प्रसिद्ध मंदिरात एक धक्कादायक घटना घडली. येथे मंदिरात दर्शनासाठी आलेला एक व्यक्ती मंदिर परिसरात मांसाहारी अन्न खाताना आढळून आला. याची माहिती मिळताच मंदिर प्रशासन सतर्क झाले आणि त्यांनी तातडीने या व्यक्तीविरोधात तक्रार दाखल केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना तिरूवन्नामलाई मंदिर परिसरात घडली. या मंदिरात दर्शनासाठी आलेल्या काही भक्तांनी या व्यक्तीला मंदिर परिसरात मांसाहारी जेवण करताना पाहिले. त्यामुळे त्यांनी लगेचच मंदिर प्रशासनाला याबाबत माहिती दिली. यावेळी मंदिराच्या वरिष्ठांनी त्या व्यक्तीची चौकशी केली.



---

# ३ गुप्तचर विमानांसाठी मोजणार १० हजार कोटी

## आय-स्टार विमानाचा प्रस्ताव तयार, लवकरच मंजुरीसाठी मांडणार

**नवी दिल्ली-**पाकिस्तानविरोधात ऑपरेशन सिंदूर राबवल्यानंतर हिंदुस्थानने आता संरक्षण दलांवर अधिक लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. हिंदुस्थानी हवाई दलासाठी तीन आधुनिक आय-स्टार गुप्तचर विमाने खरेदी करण्याची तयारी सरकारने चालवली आहे. हे विमाने गुप्तचर, पाळत ठेवणे, लक्ष्य अधिग्रहण आणि शोध लावण्यासारखे काम करतेय. या तीन गुप्तचर विमानासाठी तब्बल १० हजार कोटी रुपये मोजले जाणार आहेत. यासाठी संरक्षण मंत्रालय जूनच्या चौथ्या आठवड्यात होणाऱ्या उच्चस्तरीय बैठकीत मंजुरीसाठी आपला प्रस्ताव ठेवणार आहे.

ही गुप्तचर विमाने मिळाल्यानंतर भारताचा अमेरिका, ब्रिटन आणि



इस्त्रायलसारख्या निवडक देशांमध्ये समावेश होईल. गुप्तचर विमाने या देशांकडे आधीच आहेत. आधुनिक आय-स्टार गुप्तचर विमान डीआरडीओच्या सेंटर फॉर एअरबोर्न सिस्टीम्सने विकसित केलेल्या स्वदेशी प्रणालींनी सुसज्ज असेल. त्यांची यशस्वी चाचणी आधीच घेण्यात आली आहे. हे विमान दिवस आणि रात्री कोणत्याही हवामानात काम करण्यात तरबेज आहेत. हे विमान हिंदुस्थानी हवाई दलाच्या ताफ्यात आल्यानंतर शत्रूच्या हालचालींवर दूरवरून लक्ष ठेवण्यास मदत होईल.

**३१ तेजस लढाऊ विमाने**

हिंदुस्थानकडे सध्या ३१ तेजस लढाऊ विमाने आहेत. तेजस लढाऊ विमाने हे सुखोई, राफेल, मिराज आणि मिगपेक्षा हलके आहे. हवाई दलाने जम्मू आणि कश्मीरमधील अवंतीपोरा हवाई तळावर हलके लढाऊ विमान तेजस एमके-१ तैनात केले, तर एप्रिल २०२४ मध्ये, कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीने ५ व्या पिढीतील स्वदेशी लढाऊ विमानाच्या डिझाइन आणि विकासासाठी १५,००० कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी दिली.

---

# ज्येष्ठ साहित्यिक वामन देशपांडे यांचे निधन

**मुंबई-**ज्येष्ठ साहित्यिक वामन देशपांडे यांचे मंगळवारी सकाळी निधन झाले. गेले काही दिवस डोंबिवलीतील आरिंदम रुग्णालयामध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. वामन देशपांडे यांचे मंगळवारी सकाळी रुग्णालयातच निधन झाले. कविता, कादंबरी, लेख याचबरोबर धार्मिक विषयावरील प्रदीर्घ लेखन देशपांडे यांनी केले. मसापच्या डोंबिवली शाखेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काही वर्षे काम पाहिले. त्यांची सुमारे १२५ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. रिझर्व्ह बॅंकेतून निवृत्त झाल्यानंतर वामनराव डोंबिवलीत वास्तव्यास आले. परदेशी असलेला मुलगा आल्यावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

वामन देशपांडे हे एक मराठी लेखक, समीक्षक, कवी आणि संगीतज्ञ होते. ते अनेक विषयांवर लेखन करत आणि विविध साहित्य संमेलनांमध्ये सक्रिय होते. त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत, ज्यात कथा, कादंबऱ्या,



समीक्षा, भावगीत आणि भक्तिगीत यांचा समावेश आहे. वामन देशपांडे यांचा जन्म यवतमाळ येथे झाला. त्यांनी कथा, कादंबऱ्या, समीक्षा, भावगीत, भक्तिगीत, संत साहित्य अशा विविध विषयांवर लेखन केले आहे. ते संगीत समीक्षक आणि संगीतज्ञ म्हणूनही ओळखले जातात. ते विविध अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांमध्ये हजेरी लावत होते. त्यांनी मुलांसाठी संत तुकाराम आणि इतर विषयांवर लेखन केले आहे. त्यांनी सार्थ श्रीज्ञानेश्वरी या ग्रंथाचे भाषांतर केले आहे.

---

### कपिल शर्माच्या शोमध्ये पुन्हा दिसणार सिद्धू

**मुंबई-**कॉमेडीयन कपिल शर्मा याचा कॉमेडी शो 'द ग्रेट इंडियन कपिल शर्मा'च्या तिसऱ्या सीझनची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या शोचा प्रोमो नेटफ्लिक्स इंडियाने अधिकृतपणे जारी केला आहे. या प्रोमोमध्ये निर्मात्याने नवजोत सिंग सिद्धूच्या परतीची घोषणा केली आहे. हा प्रोमो शेअर करताना कॅप्शनमध्ये लिहिलेय की, एक खुर्ची पाजी यांच्यासाठी प्लीज प्रत्येक फन्नीवार वाढणार आमचा परिवार नवजोत सिंग सिद्धू आणि अर्चना पुरन सिंह यांच्या परतीसोबत.. असे म्हटले आहे.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## गर्दीचे बळी

मुंबईची विस्तारीत उपनगरे असलेल्या दिवा-मुंब्रा दरम्यान खचाखच गर्दीने धावणाऱ्या लोकलमधील दरवाजात उभे असणारे काही प्रवासी खाली पडले आणि त्यातच काहींचे बळी गेले तर काही जखमी झाले. सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस. या दिवशी मुंबईतील उपनगरी रेल्वेगाड्या तुडुंब गर्दीला घेऊन धावत असतात. मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ दोन लोकल गाड्यांतील दरवाजात उभे असलेले प्रवासी एकमेकांना घासले गेले, त्यातूनच काही जण खाली पडले व ही दुर्घटना घडली अशी माहिती सुरुवातीला पुढे आली. नेमके किती मृत्युमुखी पडले किंवा नेमके किती जखमी झाले याची माहितीसुद्धा धड मिळत नव्हती. मुंबईच्या उपनगरी रेल्वेतून रोज पंचाहत्तर लाखांहून अधिक प्रवास करतात.एवढ्या संख्येने प्रवाशांना घेऊन धावणारी क्षमता जगात कुठेही नसावी. रात्रीचे चार तास सोडले तर सीएसटी-चर्चगेटपासून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेल आणि विरार, पालघर, डहाणूपर्यंत लोकल्स धावत असतात. मध्य, पश्चिम, हार्बर मार्गावरील उपनगरी सेवा ही तर मुंबईची जीवनवाहिनी आहे. आता मेट्रो, मोनो मुंबईकरांची अत्यावश्यक सेवा बनली आहे. लोकल्स आणि मेट्रो हा मुंबईकरांचा श्वास आहे. मग ही सेवा चोवीस तास तत्पर व कार्यरत ठेवणे हे जसे रेल्वेला आव्हान आहे तर रेल्वेचे कर्तव्यही आहे. याच महामुंबईतून देशाच्या खजिन्यात सर्वात जास्त महसूल जमा होतो. याच महानगरातून देशाला सर्वात जास्त जीएसटी मिळतोय. त्या बदल्यात रेल्वे मंत्रालय ७५ लाख मुंबईकरांचा रोजचा लोकल प्रवास सुखाचा व्हावा म्हणून काय सेवा सुविधा देते? मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील दादर, कुर्ला, घाटकोपर, ठाणे, कळवा, डोंबिवली, कल्याण तसेच अंधेरी, वसई-विरार या स्थानकांवर नेहमीच गर्दीचा कहर असतो. सीएसटीवरून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेलला जाणाऱ्या व येणाऱ्या लोकल्स तुडुंब गर्दीने नेहमीच भरलेल्या असतात. कोंडवाड्यात जशी जनावरे दावणीला असतात, त्याहीपेक्षा लोकलमधील प्रवाशांची अवस्था वाईट असते. मुंब्रा येथे कसाराहून सीएसटीकडे जाणारी व सीएसटीहून कसाराकडे जाणारी या लोकल जात असताना दरवाजात उभे राहून लटकून प्रवास करणारे एकमेकांना घासले गेले व त्यातले डझनभर खाली पडले असे सांगण्यात आले.धावत्या लोकलमध्ये प्रवाशांना स्वत:चा तोलही सांभाळता आला नाही, जे खाली पडले त्यांना धरून किंवा खेचून पुन्हा डब्यात आणणे इतरांना शक्य झाले नाही. या अपघातात कुणी किती जखमी झाले, कोणाचे हात-पाय मोडले, कुणाला जीव गमवावा लागला याचा तपशील नंतर येईलच, पण गर्दीने भरलेल्या लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडले ही बाब अतिशय गंभीर आहे. ही वेळ त्यांच्यावर का आली, त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर कोणी देणार नाही. देशात जिकडे तिकडे वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होत आहे. वंदे भारत ट्रेनची क्रेझ वाढत आहे. पण मुंबईतील लोकल्समधून रोज प्रवास करणारे लाखो प्रवासी मात्र वाऱ्यावर सोडले आहेत. रोज पोटापाण्यासाठी व रोजगारासाठी लक्षावधी मुंबईकर गर्दीने भरलेल्या लोकल्समधून दोन-अडीच तास प्रवास करीत कामावर पोहोचत आहेत आणि त्याच गर्दीतून सायंकाळी-रात्री घरी परतत आहेत.गर्दीचे दुष्टचक्र संपणार कधी? लोकल प्रवाशांना दिलासा कधी? लोकलमधून मुंबईकरांना कधी सुखाने प्रवास करायला मिळणार? सर्वसामान्य लोक कोणीही हौस म्हणून लोकलने प्रवास करीत नाहीत. स्वस्तात व जलद प्रवास करता येतो म्हणून लाखो लोक लोकल्स प्रवासाकडे आकर्षित होतात. गेल्या दोन वर्षांत एअर कंडिशन्ड लोकल्स धावू लागल्या आहेत. जशी त्यांची संख्या वाढत आहे तसे विना एसी लोकल्स कमी होत आहेत. मुंबईत एसी लोकल्स हव्या आहेत, त्याला मागणीही बरीच आहे. एसी लोकल्समधून प्रवास करणारा वर्गही मोठ्या संख्येने आहे. पण सर्वसाधारण लोकल परवडते म्हणून त्या लोकलने प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांवर अन्याय होता कामा नये याची दक्षता रेल्वे प्रशासनाने घेतली पाहिजे.गेल्या वीस वर्षांत मुंबईत झालेल्या रेल्वे अपघातात ५१,८०२ लोकांचा मृत्यू झाला. मुंबईत रेल्वे अपघातात रोज सात ते आठ लोक मरण पावतात. पण त्याची कुठे बातमीही प्रसिद्ध होत नाही. 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी मुंबईच्या उपनगरी रेल्वेची अवस्था झाली आहे. सन २०२५ या नवीन वर्षात जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत मुंबईत रेल्वे अपघातात ६६३ लोक ठार झाले. त्यातले २७२ जण लोकलमधून खाली पडून मरण पावले, तर ३९१ जण रेल्वे रूळ ओलांडताना मृत्युमुखी पडले. दोन लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडून मरण पावले किंवा जखमी झाले, असे प्रथमच घडले असावे. आता तरी राज्य सरकार, केंद्र सरकार व रेल्वे प्रशासन यांचे डोळे उघडणार आहेत की नाही? मुंबईतील लोकल प्रवासावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही? प्रत्येक ट्रेनमध्ये प्रत्येक लोकलच्या डब्यात विनातिकीट अनेक प्रवासी असतात.प्रथम श्रेणीच्या डब्यातही विनातिकीट लोकांची अगदी महिलांचीही बरीच गर्दी असते. आपल्याला तिकीट कोणी विचारायला येणार नाही याची त्यांना खात्री असते. विनातिकीट प्रवासी हे दैनंदिन पासधारकांना रोजची डोकेदुखी असते पण धावत्या लोकलमध्ये डब्यात येऊन तिकीट तपासणी जवळपास बंदच झाली आहे. मध्य व पश्चिम रेल्वेचे टीसी जातात कुठे हा पासधारकांना रोज प्रश्न पडलेला असतो. भिखारी, फेरीवाले, विक्रेते, डब्यात गलिच्छ फडकी मारून सफाई केल्याचा आव आणणाऱ्यांची गर्दी भरपूर असते. हातात तान्हे बाळ घेऊन भीक मागणाऱ्यांची संख्याही बरीच आहे. हे सारे लोक स्टेशनात तरी कसे येतात, लोकलमध्ये कसे चढू शकतात? यांना रोखणारी, हटवणारी, व कारवाई करणारी यंत्रणा कुठे दिसत नाही. लोकलधील खचाखच गर्दीमध्ये पाकीटमार व मोबाईल चोरांच्याही टोळ्या सावज शोधत असतात. पण कुठे रेल्वे पोलिसांचा त्यांना धाक आहे असे कुठे दिसत नाही. मुंब्रा येथे गर्दीत तोल न सावरता आल्यामुळे डझनभर प्रवासी खाली पडले, ही गर्दी नियंत्रित होणार नसेल तर पुढेही असे अपघात होत राहतील. मुंबईची जीवनवाहिनी सुरक्षित राहिली पाहिजे याची जबाबदारी रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिसांची आहे.

## तमिळ-कन्नडचा वाद

**प्रसिध्द चित्रपट अभिनेते कमल हसन यांच्या एका विधानावरून अलीकडे चांगलाच वाद माजला. तमिळी भाषेतून कन्नडचा जन्म झाल्याचे त्यांचे विधान वादाला खतपाणी घालणारे ठरले आहे. वास्तविक पाहता आजघडीला कोणती भाषा जुनी, कोणती श्रेष्ठ असा वाद घालण्याचे काहीही कारण नाही. भाषा भगिनी परस्पर सहकार्याने वाढतात, हे नेहमीच पहायला मिळाले आहे.**



दक्षिण भारतातील सुप्रसिध्द अभिनेते कमल हसन यांनी कन्नड भाषा तमिळ भाषेतून निर्माण झाल्याचे विधान केल्यावरून अलीकडेच मोठा वाद निर्माण झाला. यावरून कर्नाटकात प्रचंड गदारोळ सुरू आहे. सामान्य कन्नड भाषिकांपासून ते कर्नाटकच्या राजकारण्यांपर्यंत सर्वांनीच हसन यांच्यावर टीका केली आहे. हसन यांच्या नवीन 'ठग लाईफ' या चित्रपटावर बहिष्कार टाकण्यात आला आहे. त्यानंतर त्यांनी या वादावर स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, की मी भाषेबद्दल बोलण्यास पात्र नाही. कोणताही राजकारणी भाषेबद्दल बोलण्यास पात्र नाही, मीही यात सामील आहे. तथापि, यानंतरही हा वाद थांबताना दिसत नाही. त्यांच्या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्बान पुढे आलेल्या विधानाने वाद सुरू झाला. चेन्नईमध्ये कमल हसन यांच्या 'ठग लाईफ या चित्रपटाच्या प्रमोशनप्रसंगी त्यांच्यासोबत कन्नड चित्रपट स्टार शिवराजकुमार देखील उपस्थित होते. त्या वेळी हान शिवराजकुमार यांच्याकडे बोट दाखवत म्हटले, की तो आमच्या कुटुंबाचाही एक भाग आहे. त्यांची भाषा (कनड) ही आमच्या भाषेतून (तमिळ) आली आहे. कन्नड भाषिक लोकांनी हसन यांच्या या विधानाला त्यांचा अपमान असल्याचे म्हणत गोंधळ घातला.कर्नाटकमधील बेळगाव, म्हैसूर, हुबळी, बंगळूरू आदी भागांमध्ये कन्नड समर्थक संघटनांनी हसन यांच्या विरोधात निदर्शने केली आणि बिनशर्त माफी न मागितल्यास त्यांचे चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होऊ न देण्याची धमकी दिली. हसन यांनी माफी मागण्यास नकार दिल्यानंतर हा वाद जणू दोन राज्यांमधील वादविषय बनला.

### भाषांच्या उत्पत्तीसाठी संशोधन

द्रविड भाषांच्या उत्पत्तीचा शोध घेण्यासाठी अनेक लोकांनी संशोधन केले.वसाहतवादी विद्वान आणि संशोधक रॉबर्ट काल्डवेल यांनी द्रविड भाषांवर केलेल्या संशोधनाचा संदर्भ जगभरातील लोक घेतात. त्यात भाषातज्ज्ञांचाही समावेश आहे. द्रविड भाषाअंतर्गत १३० भाषा ओळखल्या गेल्या आहेत. पूर्वी पाच द्रविड भाषा होत्या. त्यात तमिळ, तुळु, कन्नड, तेलुगू आणि मल्याळम यांचा समावेश आहे. त्यांना 'पंच' द्रविड भाषा म्हणतात. आता आदिवासी भाषांवरही बरेच संशोधन केले जात आहे. द्रविड भाषा गटात १३० हुन अधिक भाषा मोडत आहेत. कन्नड, तमिळ आणि तेलुगू यांचे नाते आई आणि मुलीचे नाही तर बहिणींचे आहे. कन्नड भाषेचा उगग तमिळ पाषेतून झाला नाही; परंतु लोक आपल्या भाषेचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी त्याबाबत आग्रह घरत राहतात.भाषेभोवती ते राजकारण खेळतात. कर्नाटकच्या राजकारण्यांनी हसन यांच्या विधानावर टीका केली आहे. काँग्रेस नेते आणि मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले, की कन्नडचा इतिहास खूप जुना आहे; पण बिचाऱ्या'हसन यांना त्याची काहीच माहिती नाही.माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते बी. एस. येडियुरप्पा यांनी हसन यांच्या विधानाला अहंकाराची मर्यादा ओलांडणारे आणि कनड भाषेचा तसेच अभिनेते शिवराजकुमार यांचा अपमान करणारे म्हटले. हसन हे तामिळनाडूमधील मक्कल निधी मय्यम (एमएनएम) या राजकीय पक्षाचे संस्थापक आहेत आणि त्यांचा पक्ष राजकारणात सक्रिय आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या विधानाला कर्नाटक आणि तामिळनाडूमधील पाण्यासह अनेक मुद्द्यांवरच्या जुन्या वादांशी देखील जोडले जात आहे.

कर्नाटकमधून तीव्र वाद उभा राहिल्यानंतर माफी न मागता कमल हसन म्हणाले, 'मी जे बोललो, ते प्रेमाने बोललो होतो आणि अनेक इतिहासकारांनी मला भाषेचा इतिहास शिकवला आहे. माझा कोणत्याही भाषेचा अपमान करण्याचा कोणताही हेतू नव्हता, तामिळनाडू हे नेहमीच उदार आणि पुरोगामी राज्य राहिले आहे. असे दुसरे कोणतेही राज्य नाही, असे मला म्हणायचे नाही; पण तामिळनाडू हे एक अतिशय दुर्मीळ राज्य आहे, जिथे मेनन (एम. जी. रामचंद्रन) मुख्यमंत्री राहिले. नंतर रेड्डी (ओमंडूर रामास्वानी रेडियर) मुख्यमंत्री राहिले, तमिळ (एम. करुणानिधी) मुख्यमंत्री राहिले आणि मंडया येथील कन्नड अय्यंगारही तामिळनाडूचे मुख्यमंत्री राहिले. राजकारणी भाषेवर बोलण्यास पात्र नाहीत. त्यांच्याकडे याबद्दल बोलण्याची क्षमता नाही.इतिहासकार, पुरातत्वशास्त्रज्ञ आणि भाषाशास्त्रज्ञांनी या बाबींवर सखोल चर्चा करावी, असे माझे म्हणणे आहे.

### श्रेष्ठत्वाचा वाद

कन्नड आणि तमिळींनधील श्रेष्ठत्वाचा वाद गाजत असला, तरी इतिहासात या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. दोन्ही द्रविड भाषांचा इतिहास खूप जुना आहे. भाषातज्ज्ञांच्या मते दोन्ही द्रविड कुटुंबातील महत्वाच्या भाषा आहेत. त्यांचा उगम द्रविडच्या वेगवेगळ्या शाखा म्हणून झाला. कन्नड ही आज सुमारे ३.८ कोटी लोकांची पहिली आणि सुमारे एक कोटी लोकांची दुसरी भाषा आहे. दुसरीकडे भारत, श्रीलंका, सिंगापूर, मलेशिया, मॉरिशस, फिजी आणि दक्षिण आफ्रिका यासह सुमारे सात देशांमध्ये तमिळ एक महत्त्वाची भाषा म्हणून बोलली जात आहे. कन्नड भाषेचा जन्म सुमारे २,५०० वर्षे जुना असल्याचे मानले जाते.

सर्वात जुना कन्नड शिलालेख हलमिदी या छोट्या समुदायात सापडला आहे. तो सुमारे ४५० इसवीसनपूर्व असल्याचे आढळून आले आहे. हा कदंबांचा शिलालेख आहे. तथापि, काही इतिहासकारांचा दावा आहे, की कन्नड भाषा इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकातही बोलली जात होती.अलेक्झांड्रियाचे विद्वान टॉलेमी यांनी लिहिलेला भूगोल हा कन्नड भाषेच्या प्राचीनतेचा एक महत्त्वाचा दस्तावेज मानला जातो. त्यात कर्नाटकमधील कलगेरिस (सध्याचे कलकेरी), बदामिओस (बदामी), मोडोगुल्ला (मुदुघल) सारख्या ठिकाणांचा उल्लेख आहे. हा दस्तावेज इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील आहे. या इतिहासकारांचा विश्वास आहे, की कन्नड भाषेचा उगम इसवी सन पूर्व सुमारे ९५० वर्षांमधील आहे. कर्नाटकमध्ये सापडलेल्या सम्राट अशोकच्या शिलालेखांमध्येही कन्नड शब्द सापडले आहेत. तथापि, भाषातज्ज्ञांचा अंदाज आहे, की कन्नड लिपी अशोकाने लिहिली होती. कन्नड भाषेचा विकास ब्राह्मी लिपीच्या दक्षिणेकडील रूपांपासून झाला, असे मानले जाते. कन्नड भाषेला तिचे सध्याचे नाव नवव्या शतकात मिळाले. राजा नृपतुंगावर कविराज मार्ग हा काव्यग्रंथ कन्नड भाषेतील सर्वात जुना साहित्यिक ग्रंथ मानला जातो.

यापूर्वी सातव्या शतकात बदामी येथील कप्पे अभंडूचा रेकॉर्ड कन्नडचा पहिला काव्यग्रंथ मानला जातो. त्याआधीही पाचव्या शतकात मंगलेशचा बदामी रेकॉर्डदेखील सापडला आहे. कन्नड भाषा जुनी आणि पूर्व-जुनी अशा दोन भागात विभागली गेली आहे. जुन्या कन्नडचा रेकॉर्ड ८०० ते १००० इसवी सनाचा आहे, तर पूर्व-जुनी कन्नडचा रेकॉर्ड ४५० ते ८०० इसवी सनाचा आहे. कन्नड गाषेच्या आधुनिक लिपीचे सर्वात जुने रूप कदंब लिपी मानली जाते. होयसाळा कन्नड लिपी ही या भाषेची सर्वात सजावटीची लिपी मानली जाते. ती होयसाळा राजांनी कल्याण चालुक्य कन्नड लिपोतून विकसित केली होती.

कन्नड भाषेचे वेगवेगळे प्रकार आज कनड भाषेचे २० हुन अधिक वेगवेगळे प्रकार दिसतात. त्यात सोलिगा कन्नड, कोडावा, ह्वेका, कुंडा, आरे भाशे, वडागा कन्नड, हुबळी कन्नड आणि गुलबर्गा कन्नड यांचा समावेश आहे. तमिळ भाषा ही इसवी सन पूर्व २५०० ते १५०० या काळातील भाषा मानली जाते.भाषाशासज्ञांचा विश्वास आहे, की तमिळ भाषा द्रविड भाषेचा देखील एक भाग आहे. तो सुमारे ३,५०० वर्षांपूर्वी संस्कृत घेऊन भारतात आलेल्या 'इंडो-आर्या 'च्या आगमनापूर्वी येथे बोलली जात होती. या दाव्यानुसार, तमिळ भाषा ४,००० ते ४,५०० वर्षे जुनी असू शकते. तमिळ भाषेचे साहित्य, कविता आणि धार्मिक हस्तलिखिते इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापर्यंत आढळतात. तथापि, द्रविड भाषा गटापासून वेगळी भाषा म्हणून तमिळ भाषेची सुरुवात इ.स.पूर्व एक हजारपासून झाली, असे मानले जाते. ही क्लासिक तमिळ मानली जाते.

मध्ययुगीन काळात चोल साम्राज्यातील राजराज चोल-१ आणि राजेंद्र चोल-१ यांनी तमिळ शिलालेख, मंदिर वास्तुकला आणि साहित्याला प्रोत्साहन दिले.

दोन्ही भाषांचा इतिहास पाहिल्यास त्या एकाच भाषा गटातून जन्माला आल्या आहेत हे स्पष्ट होते; परंतु कमल हसन यांचा कन्नड भाषा तामिळ भाषेतून जन्माला आली आहे, हा दावा बरोबर वाटत नाही.द्रविड भाषा गटाचा भाग असल्याने, दोघांमध्ये काही समानता असू शकतात; परंतु प्रत्यक्षात दोन्ही भाषा खूप वेगळ्या भाषा म्हणून विकसित झाल्या आहेत.

**व्ही. त्यागराजन**

## भाजपाचे ऑपरेशन बंगाल!

गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या पश्चिम बंगाल दौऱ्यात ज्याप्रकारे आक्रमक भाषण केले आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना टार्गेट केले, ते पाहता, या खेपेच्या विधानसभा निवडणुकीत, भाजपा, सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला हरविण्यासाठी आपली संपूर्ण ताकद पणाला लावणार हे निश्चित आहे. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथील दंगलीत तेथील हिंदूंना ज्या प्रकारे टार्गेट करण्यात आले, ते लक्षात घेता, भाजपाच्या निवडणूक प्रचारात, मुर्शिदाबाद दंगलीच्या मुद्द्यावर जोर देण्यात येईल, याबाबत शंका बाळगण्याचे कारण नाही.अपेक्षेप्रमाणे अमित शहा यांनी आपल्या भाषणात, मुर्शिदाबाद येथील दंगलीचा उल्लेख करून, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर सडकून टीका केली. शहा यांनी आरोप केला की, बांगलादेशमधून भारतात होणाऱ्या घुसखोरीला ममता बॅनर्जी या प्रोत्साहन देत असून, त्यांनी या घुसखोरांना आपली व्होट बँक बनवली आहे. बांगलादेशमधून होणारी घुसखोरी थांबवण्यासाठी केंद्र सरकारने सीमेवर कुंपण घालण्यासाठी ममता बॅनर्जी यांच्याकडे जमीन मागितली असता त्यांनी ती दिली नाही, असा गंभीर आरोप शहा यांनी ममतांवर केला.

वक्फ कायद्याच्या विरोधात पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे जे आंदोलन करण्यात आले, त्या आंदोलनाला हिंसक वळण लागले आणि खासगी व सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आले. या दंगलीत तृणमूल काँग्रेसच्या काही नेत्यांचा सहभाग होता, असा आरोप भाजपाकडून करण्यात आला आहे. दंगलीमध्ये एका हिंदू कुटुंबातील दोघांची हत्या करण्यात आली. यावेळी पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली, असा आरोप भाजपाकडून करण्यात आला आहे.हल्लेखोरांनी इतकी दहशत निर्माण केली की बऱ्याच हिंदूंना आपले घरदार सोडून, दुसरीकडे आश्रय घ्यावा लागला. पोलीस निष्क्रिय झाल्याने दंगल आटोक्यात आणण्यासाठी केंद्र सरकारकडून सीमा सुरक्षा दल तैनात करण्याबाबत पश्चिम बंगाल सरकारकडे विचारणा करण्यात आली, परंतु पश्चिम बंगाल सरकारने त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला नाही.



**पंतप्रधान नरेंद्र मोदीं पाठोपाठ, गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम बंगालचा दौरा करून २०२६ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजवले आहे. पश्चिम बंगालमधील भाजपा नेत्यांनी त्याला ऑपरेशन बंगाल असे नाव दिले आहे.**

अखेर हिंदूंचे संरक्षण करण्यासाठी काही भाजपा नेत्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली. नंतर न्यायालयाने आदेश दिल्यामुळे, पश्चिम बंगाल सरकारने सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना मुर्शिदाबाद येथे तैनात करण्यास परवानगी दिली. सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना तेथे तैनात केल्यानंतर, त्यांनी लगेचच दंगल आटोक्यात आणली.मुर्शिदाबाद येथील दंगलीत बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग होता ही गोष्ट पुरेशी सिद्ध झाली आहे. या घुसखोरांना ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची फूस असल्याने ते असे धाडस करू शकतात. या घुसखोरांची व्होट बँक ममता बॅनर्जी यांच्या मदतीला असल्यानेच २०११ पासून आजतागायत त्या पश्चिम बंगालमधील विधानसभेच्या निवडणुका मोठ्या मताधिक्याने जिंकत आहेत.

पश्चिम बंगालमध्ये मुस्लीम मतदारांची संख्या साधारणपणे ३० टक्क्यांच्या आसपास आहे. बांगलादेशातून सतत होणाऱ्या घुसखोरीमुळे मुस्लीम मतदारांची संख्या कमालीची वाढली आहे. १९७७ ते २०११ पर्यंत प्रदीर्घ काळ पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची वाताहत झाल्यानंतर, मुस्लीम समाजाने आपली सर्व ताकद ममता बॅनर्जी यांच्या पाठीशी लावली आहे. काँग्रेसची ताकद एक-दोन जिल्ह्यांपुरती मर्यादित आहे.पश्चिम बंगालमध्ये भाजपाला सत्तेपासून दूर ठेवायचे असेल तर ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला मत देण्याशिवाय दुसरा पर्याय नाही ही गोष्ट तेथील मुस्लीम समाजाने बरोबर ओळखली आहे.त्यामुळेच तेथील मुस्लीम समाज ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला एकगठ्ठा मतदान करतो.

भाजपाने आजवर ममतांना पराभूत करण्यासाठी भरपूर जोर लावला; परंतु जोपर्यंत राज्यातील मुस्लीम समाज ममतांच्या पाठीमागे ठामपणे उभा आहे तोपर्यंत ममतांना पराभूत करणे अतिशय अवघड आहे, याची जाणीव भाजपाला असणारच.ममता बॅनर्जी या खूप हुशार आहेत.

आपली मुस्लीम व्होट बँक सांभाळण्यासाठी त्या कोणत्याही थराला जातील. त्यामुळे मुर्शिदाबाद येथील दंगल आटोक्यात आणण्याच्या बाबतीत ममता बॅनर्जी यांनी बोटचेपी भूमिका घेतली असेल तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. ममतांना पराभूत करावयाचे असेल तर भाजपाला आपले डावपेच बदलावे लागतील.

**अभय गोखले**

### थरूर यांचे मत कौतुकास्पद

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर हे आपली भूमिका स्पष्टपणे मांडण्यासाठी ओळखले जातात. पहलगाम मधील अलीकडील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने पाठवलेल्या सर्वपक्षीय शिष्टमंडळात थरूर यांचा सहभाग लक्षणीय ठरतो. त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाचे परदेशात प्रभावी वर्णन करून भारतीय लष्कराच्या कारवाईची भूमिका ठामपणे मांडली आहे.विशेष म्हणजे, थरूर यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला (आयएमएफ) स्पष्टपणे सांगितले की पाकिस्तान त्यांच्या निधीचा वापर दहशतवाद्यांना पोसण्यासाठी करतो आहे.पहलगाम हल्ला हे त्याचेच उदाहरण. म्हणूनच त्यांनी आयएमएफ ला पाकिस्तानकडून निधीच्या वापराचा हिशोब मागण्याची मागणी केली असून, समाधानकारक उत्तर न मिळाल्यास पुढील निधी रोखण्याचे आवाहन केले आहे.अशा स्पष्ट, राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणाऱ्या भूमिकांमुळे थरूर यांचे मत सर्वपक्षीय दृष्टिकोनातूनही कौतुकास्पद वाटते.

**प्रा. विजय कोष्टी**

### सनातन हिंदुधर्माला गौरवांन्वित करणारी आदर्श कृती

६ जून या दिवशी काश्मीर मधील चिनाब पुलाचे उद्घाटन करताना मा. पंतप्रधानांनी पाश्चात्त्य पद्धतीप्रमाणे फित न कापता तीची गाठ सोडून ती विलग केली. कापणे ही कृती हिंदु धर्मात निषिद्ध मानली जाते.त्यांनी तसे न करता ती विलग केली. कितीही अडथळे, संकटे आली तरी हताश न होता आम्ही यश पादाक्रांत करतो हेच या आदर्श कृतीने त्यांनी दर्शवले. अनेक वर्षे रखडलेला पूल पूर्ण झाला.त्याचे श्रेय स्वतःकडे न घेता माता वैष्णोदेवीच्या कृपाशीर्वादाने पुलाचे काम पूर्णत्वास गेले असे त्यांनी सांगितले. चिनाब पुलाने भारतीयांचे कौशल्य, जिद्द ,अतिशय धोकादायक परिस्थितीवर मात करण्याचे मनोधैर्य, आणि राष्ट्रभक्ती यांचे दर्शन जगाला घडवले आहे. देशभक्त पंतप्रधानांचे आव्हाने स्वीकारून त्यावर मात करण्याचे कसब आणि दुर्दम्य इच्छाशक्ती यांचे हा पूल प्रतीक आहे.

**संध्या काटदरे**

जनमाध्यम सवाद

### न्यायालयाने या बाबतीतही लक्ष घालावे

सुधारित नियमावलीनुसार छोट्या आकाराच्या प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्ती बनवण्यावर, तसेच त्यांची व्यावसायिक विक्री करण्यावर कोणतीही बंदी नसून त्यांचे विसर्जन मात्र केवळ कृत्रिम तलावातच करावे लागेल, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे पीओपी मुर्त्या बनवणाऱ्या व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने यंदाच्या माघी गणेशोत्सवापासून 'पीओपी'वरील बंदीचा निर्णय लागू केला होता. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकांनी या वर्षी 'पीओपी'वर बंदी असल्याचे आदेश काढले होते. त्याविरोधात मूर्तीकार संघटनेने मुंबईत बैठक घेऊन न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला होता. 'पीओपी'वरील बंदी उठवतांना न्यायालयाने 'पीओपी'च्या प्रत्येक मूर्तीच्या मागच्या बाजूला लाल रंगाची खूण असणे अनिवार्य आहे, अशी अट घातली आहे. मुळात गणेश चतुर्थी हा पूर्वापार चालत आलेला धार्मिक सण आहे. या सणाशी अनेकांच्या आस्था जोडल्या गेल्या आहेत. धर्मशास्त्रानुसार प्राणप्रतिष्ठा करून मनोभावे पूजन केलेल्या गणेशमूर्तीमध्ये श्री गणेशाची पवित्रके सामावलेली असतात त्यामुळे तिचे विसर्जन वाहत्या पाण्यात करावे जेणेकरून ही पवित्रके सर्वदूर पसरतील मात्र न्यायालयाने पीओपी गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांत करणे सक्तीचे केले आहे. शहरांसारख्या ठिकाणी मागील काही वर्षांपासून श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव बांधले जातात. या उपक्रमासाठी महापालिका साहाय्य करते.कृत्रिम हौदात विसर्जित केलेल्या मुर्त्यांचा वापर खाणी बुजवण्यासाठी आणि विटा तयार करण्यासाठी केला जात असल्याचेही लक्षात आले आहे. श्रद्धेने घरी आणलेल्या आणि मनोभावे पुजलेल्या श्री गणेश मूर्तींची अशा प्रकारे केली जाणारी विटंबना योग्य नाही. न्यायालयाने या बाबींकडेही लक्ष घालावे.

**जगन घाणेकर**

# साखरा परिसरात बेधुंद वाऱ्यासह गारपीटीने झोडपले !

## शेतातून जाणाऱ्या वीजकंपनीचे टॉवर कोसळल्याने शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान





जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - तालुक्यातील साखरा परिसरात काल दुपारी अचानक बेधुंद वाऱ्यासह पाण्याने हजेरी लावली. त्यात बेधुंद वाऱ्यासह गारही पडल्या असून त्यात गावालगत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतातून जाणाऱ्या वीज कंपनीचे दोन टॉवर बेधुंद वाऱ्यात कोसळून पडल्याने शेतकऱ्यांचे शेतातील विजेची खांब तुटून पडल्याने अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांच्या शेतीचा खरीप हंगामाला सुरुवात होण्याआगोदर काल झालेल्या अवकाळी पावसाने वीज कंपनीचे दोन टॉवर कोसळून शेतातील विजेची खांबे तुटून पडल्याने शेती निसर्गाच्या भरोशावर कशी करावी आणि पाणी वेळेवर न आल्यास चालू झालेल्या खरीप हंगामात पिकांची पेरणी करून उगवलेली पिके कशी जगवावी ? असा प्रश्न साखरा येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पडला आहे.निसर्गाच्या लहरीपणामुळे जरी वीज कंपनीचे टॉवर पडले असेल तरी पण वीज कंपनीच्या कामाविषयी शंका निर्माण होत आहे त्यामुळे कंपनीच्या बोगस कामामुळे आज शेतकऱ्यांचे शेतातील जे नुकसान झाले आहे त्याच्या नुकसान भरपाईकरिता जबाबदार कोण टॉवरची बांधकाम करणारी कंपनी कि प्रशासन ? असा प्रश्न नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पडला आहे.

**साखरा गावात महिलांच्या घरावर झाड कोसळल्याने घरांची पडझड**

तसेच काल वाऱ्यासह गारपीटीने जवळपास तासभर झोडपले असून बेधुंद वाऱ्याने रस्त्यावर आणि गावातील झाडे घरांवर कोसळून घरांची पडझड झाली आहे. एका लक्ष्मीबाई लचमा कंदलवार ही म्हातारी महिला एकटी घरामध्ये असताना तिच्या घरावर शाळेच्या आवारातील झाड कोसळून पडल्याने ती राहत असलेल्या मातीच्या घराचे मोठे नुकसान झाले आहे आणि सुदैवाने ती महिला त्या वेळेस घरात असूनही सुखरूप बाहेर निघाली आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. अशा निसर्गाच्या लहरीपणा पासून आपल्याला संरक्षण मिळावं याकरिता नुकसान ग्रस्त महिला घरकुलाची मागणी करीत आहे शासनाचे प्रत्येक गरिबांना पक्क घर देण्याचे धोरण असत असताना काल झालेल्या नुकसानग्रस्त महिला ही विधवा असून तिला प्राधान्याने घरकुल देण्यात यावे अशी मागणी नुकसानग्रस्त महिलांनी केली आहे.

तसेच कालच्या पावसाने घाटंजी ते पारवा, पांढरकवडा रोडवर अनेक झाडे कोसळून पडल्याने वाहतूक व्यवस्था विष्कळीत झाली होती.

# घरगुती कारणावरून एकास बेदम मारहाण

उमरखेड : घरगुती कारणावरून वाद उपस्थित करीत एकाला बेदम मारण करण्यात आली. ही घटना ७ जून रोजी सकाळी हिवळणी येथे घडली. सतीश अजय राठोड (२५) रा. चिल्ली असे फिर्यादीचे नाव आहे. तर लखन शंकर जाधव (35), चंदन हिरासिंग जाधव (२१) हिरासिंग थावरा जाधव (४०), विकास नामदेव जाधव (२५) सर्व रा. चिल्ली नाईक उमरखेड असे आरोपींची नाव आहे. आरोपी आणि फिर्यादी हे नातेवाईक असून आरोपींना संगणमत करून फिर्यादी सोबत घरगुती कारणावरून वाद उपस्थित केला. एवढेच नव्हेतर शिवीगाळ करून थापडाबुक्यांनी व दगडाने मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. घटनेनंतर फिर्यादीने उमरखेड पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी संबंधित आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला.

# ताडपत्री झाकून ट्रकमध्ये अवैध रेती वाहतूक

## शिरपूर पोलिसांनी दोन ट्रक पकडले



जनमाध्यम प्रतिनिधी

वणी - परिसरात अवैध वाळूची तस्करी सुरूच असून शिरपूर पोलिसांनी चारगाव ते पुनवट रोडवर ताडपत्री झाकून अवैध वाळू वाहतूक करणारे दोन ट्रक पकडले. हे दोन्ही ट्रक शिरपूर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले असून कारवाईबाबत पत्र वणी तहसील कार्यालयात देण्यात आले.

शुक्रवारी 6 जुन रोजी शिरपुर चे ठाणेदार माधव शिंदे हे आपले अधिनस्त पो. स्टॉप सह परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गोपनिय माहिती मिळाली की,चारगांव ते पुनवट रोडने अवैध्यरित्या रेती वाहतुक होत आहे. अशी माहिती मिळताच ठाणेदार माधव शिंदे यांनी कोणताही वेळ न घालवता त्वरीत आपल्या पोलिस स्टाफ सह शेलु(बु) येथे नाकाबंदी केली काही वेळाने चारगांव ते पुनवट रोडने दोन ट्रक येताना दिसताच येणा-या संशयित तपकिरी रंगाच्या अशोक लेलैन्ड कंपनीच्या दोन्ही ट्रकांना थांबवुन सदर दोन्ही ट्रकची तपासणी केली तेव्हा त्यांना सदर ट्रकमध्ये लाल रंगाची रेती दिसली, सदर रेती बाबत रॉयल्टीची विचारणा केली असता कुठल्याही प्रकारचे (रॉयल्टी) कागदपत्रे व समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने सदर दोन्ही ट्रकमध्ये अवैधरित्या लाल रेती वाहतुक करीत आहेत अशी खात्री झाल्याने त्यांना ताब्यात घेउन नमुद वाहनातील इसमांना त्यांचे नाव व गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सैय्यद शहाबुद्दीन सैय्यद अफसार वय 33 वर्ष धंदा ड्रायव्हर रा.पुसद (खादी वॉर्ड) ता.पुसद जि. यवतमाळ शेख हसन इमाम शेख उवेदुर रहमान वय 51 वर्ष धंदा ड्रायव्हर ता. पुसद जि. यवतमाळ असे सांगितले व सदर अवैध्य रेती ही ट्रक मालक उमर फारुख वय अं.45 वर्ष रा. पुसद ता.पुसद जि.यवतमाळ यांचे सांगणेवरून वाहतुक करीत असल्याचे सांगितल्याने वरुन वरील इसमाविरुध्द दोन्ही ट्रक क्रमांक MH 29, BE-6296 व MH -29, BE- 6296 अंदाजे किंमत 50 लाख व त्यामध्ये एकुण 24 ब्रास रेती 1 लाख 92 हजार रुपये ची लाल रेती असा एकुण 51 लाख 92 हजार रुपये चा मुद्देमाल सहीत दोन्ही ट्रक ताब्यात घेउन पुढील कारवाईसाठी शिरपूर पोस्टे च्या आवारात लावण्यात आले असून दोन्ही ट्रक वाहनचालकांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच अवैध्यरित्या रेती बाबत पुढील कारवाईसाठी अहवाल तहसिल कार्यालय वणी येथे पाठविण्यात येणार आहे.

सदरची कारवाई यवतमाळ, पोलीस अधीक्षक, कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, वणीचे उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश किन्द्रे, पोलीस निरीक्षक सतीश चवरे स्था.स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पो स्टे शिरपुर येथील सपोनि माधव शिंदे ठाणेदार शिरपुर, पोउपनि/रावसाहेब बुधवंत, पोहवा. प्रशांत झोड, पोकॉ.पंकज कुळमेथे यांनी पार पाडली.

# पर्यावरण रक्षणाची जबाबदारी खेळाडूंनी उचलावी ! : खोखो कोच फारुक चव्हाण

जनमाध्यम प्रतिनिधी



दिग्रस - जागतिक पर्यावरण दिनानिमित्त समर बॅडमिंटन कॅम्पमध्ये सहभागी खेळाडूंनी परिसरात वृक्षारोपण करूनपर्यावरण रक्षणाचामहत्त्वपूर्ण संदेश दिला. या उपक्रमात खेळाडूंनी स्वतः झाडे लावून 'हरित भविष्याची' शपथ घेतली. खोखो प्रशिक्षक फारुक चव्हाण यांनी बॅडमिंटन खेळाडूंना ही शपथ दिली. खेळातील चपळतेसोबतच सामाजिक भान जपणाऱ्या खेळाडूंनी "एक खेळाडू – एक झाड" ही संकल्पना साकारत प्रत्येकाने एक झाड लावले.

पुढे ते म्हणाले की "खेळाडूंनी केवळ मैदानी खेळातच समाधान न मानता सामाजिक कार्यातही पुढाकार घ्यावा. झाडे लावणे आणि ती जगवणे ही काळाची गरज आहे. वृक्षसंवर्धनाचे कार्य हाती घेऊन पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्याची जबाबदारी युवा पिढीने विशेषतः खेळाडूंनी आपल्या खांद्यावर घ्यायला हवी." समर बॅडमिंटन कॅम्पमध्ये सहभागी मुलांनी मोठ्या उत्साहाने शिसम, नीम या देशी झाडांचे मोहनाबाई आणि दीनाबाई शाळा परिसरात वृक्षारोपण केले. क्रीडा शिक्षक फैजान शेख, फारुख चव्हाण, आसिफोद्दिन काजी, अजीम शेख, साविक गावंडे, भाऊराव राठोड, साक्षी जाधव, आशीष आलदरे मनोज कढाकर उपस्थित होते. त्यांच्या या उपक्रमाचे उपस्थित पालक, मार्गदर्शक आणि स्थानिक नागरिकांनी भरभरून कौतुक केले. या निमित्ताने पर्यावरण रक्षणाची भावना तरुण पिढीत आणि खेळाडूंमध्ये रुजवी हा उद्देश होता. सदर वृक्षारोपण कार्यक्रमामुळे केवळ हरित वातावरणाची पायाभरणीच झाली नाही तर खेळाडूंमध्ये सामाजिक जाणिवही निर्माण झाली. आयोजक क्रीडा शिक्षकांनी यापुढेही असे उपक्रम नियमित राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

समाजात पर्यावरण दिनाच्या आणि इतरही निमित्ताने झाडे लावली जातात. मात्र या लावलेल्या झाडांचे संवर्धन करण्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. झाडे लावण्यापेक्षाही त्यांचे संवर्धन महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपल्या परिसरातील लावलेल्या झाडांच्या संवर्धनाची जबाबदारी उचलण्याचा संकल्प सहभागी क्रीडा शिक्षक आणि खेळाडूंनी केला.

# विकसित कृषी संकल्प अभियानातंर्गत शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या बांधावर

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - कृषी तंत्रज्ञानाची जनजागृती गावोगावी करण्यासाठी विकसित कृषी संकल्प अभियान डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग, आत्मा, अक्शन फॉर फूड प्रोडक्शन, केंद्रीय कापूस संशोधन केंद्र व ईफकोच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. अभियानादरम्यान कृषी विभागाचे शास्त्रज्ञ शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती त्यांच्या गावातच उपलब्ध करून देत आहे.

कृषी तंत्रज्ञानाची जनजागृती तसेच नवीन पिक प्रकार आणि शासकिय योजनांची माहिती तसेच मार्गदर्शन कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या यवतमाळ, कळंब, बाभुळगाव, राळेगाव, घाटंजी, मारेगाव, वणी, केळापूर, झरी-जामनी या तालुक्यातील प्रत्येक दिवशी तीन गावांमध्ये विकसित कृषी संकल्प अभियान राबवित येत आहे. या अभियाना दरम्यान शास्त्रज्ञ शेतकऱ्यांसोबत थेट संवाद साधत असून, या अभियानाला जिल्ह्यातील शेतकरी बांधवांचा चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. या अभियानादरम्यान दररोज दोन फिरत्या कृषी रथांच्या माध्यमातून ११०० ते १२०० शेतकरी बांधवांशी थेट संपर्क साधून कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात येत आहे. या अभियाना प्रसंगी कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग, आत्मा, केंद्रीय कापूस संशोधन केंद्र, ॲक्शन फॉर फूड प्रोडक्शन, व ईफकोचे शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून प्रत्येक दिवशी प्रत्येक तालुक्यातील तीन गावांमध्ये जावून शेतकरी बांधवांना येणाऱ्या खरीप हंगामात पिक लागवड, रुंद वरंबा सरी पद्धत, कापूस पिकामध्ये अति सघन लागवड पद्धत, बीज प्रक्रिया, तण व्यवस्थापन, फवारणी दरम्यान घ्यावयाची काळजी, रोग व कीड व्यवस्थापन व कृषी विभागाच्या सर्व शासकीय योजना या विषयांवर मार्गदर्शन व माहिती देत आहेत.

ऐन खरीप हंगामाच्या मुहूर्तावर या अभियानामुळे शेतकरी बांधवांना चांगले मार्गदर्शन लाभत आहे. यामुळे शेतकरी बांधव प्रोत्साहित होवून या अभियानास प्रतिसाद देत असल्याचे दिसून येत आहे, असे कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ यांनी सांगितले आहे.

# वेचक

## नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा, १० जुन डॉ. भालचंद्र स्मृती दृष्टीदिन

यवतमाळ : राष्ट्रीय अंधत्व व दृष्टीक्षीणता नियंत्रण कार्यक्रमांतर्गत प्रतिवर्षी 10 जुन हा दिवस डॉ.भालचंद्र स्मृती दृष्टीदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसानिमित्त नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दृष्टीदिन दिवशी नेत्र तपासणी शिबिरे आयोजित करून त्याद्वारे सामान्य जनतेमध्ये नेत्रदानाबाबत जनजागृती केली जाते. डॉ.भालचंद्र यांचे संपूर्ण नाव डॉ. रामचंद्र लक्ष्मणराव भालचंद्र असे होते. त्यांचा जन्म दि.10 जुन 1926 ला झाला आणि त्यांचा मृत्यु दि. 10 जुन 1971 रोजी झाला. योगायोगाने त्यांचा जन्म आणि मृत्युदिन एकच आहे. भालचंद्र हे प्रख्यात नेत्रशल्य चिकित्सक होते, त्यांच्या जीवन काळामध्ये कुठलीही आधुनिक सोयीसुविधा नसतांना अंधत्व निर्मुलन कार्य करून हजारो यशस्वी मोतिबिंदु शस्त्रक्रिया केल्या. त्यांनी केलेल्या कार्याचा सन्मान म्हणून राष्ट्रीय अंधत्व व दृष्टीक्षीणता नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दि. 10 जून ते 24 जुन हा डॉ. भालचंद्र स्मृती दृष्टीदिन पंधरवडा सप्ताह साजरा केला जातो. शासकीय सेवेतील नेत्र शल्यचिकित्सक डॉ.रामचंद्र लक्ष्मणराव भालचंद्र यांनी अहोरात्र काम केले, खडतर परिस्थितीवर मात करून त्यांनी जिद्द व चिकाटीच्या जोरावर 60 हजाराहून अधिक नेत्र शस्त्रक्रिया पूर्ण करून नेत्रहीनांचे जीवन प्रकाशमय केले. नेत्रदानासारख्या महान कार्याचे महत्त्व देखिल त्यांनी जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले. नेत्रदान हे अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणतो. नेत्रदान करून अंधांना जीवन जगण्यासाठी नेत्र फार उपयोगी ठरते. त्यामुळे प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करणे आवश्यक आहे. मरणोत्तर नेत्रदान केल्यास दोन अंध व्यक्तींना हे सुंदर जग पाहण्याची संधी मिळते.

## सहाय्यकारी परिचारीका प्रसविका प्रशिक्षणासाठी अर्ज आमंत्रित

यवतमाळ : जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय कार्यालयांतर्गत परिचर्या प्रशिक्षण विद्यालय यवतमाळ येथे या शैक्षणिक वर्षासाठी स्त्री सहाय्यकारी परिचारीका प्रसविका प्रशिक्षण करिता महिला उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात आलेले आहे. उमेदवारांना दिनांक 2 जून ते 10 जून या कालावधीमध्ये परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय परिसर यवतमाळ येथे अर्ज वाटप करणे सुरु आहे. जे उमेदवार सन २०२५-२६ मध्ये परिचर्या प्रशिक्षणाकरिता प्रवेश घेण्यास इच्छुक असेल त्या उमेदवारांनी संधीचा जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांनी कळविले आहे.

## क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

यवतमाळ : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे जिल्हास्तरीय सुब्रतो फुटबॉल कप, सब-ज्युनियर मुले, ज्युनियर मुले व मुली क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा क्रीडा परिषद्तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्ली यांच्यामार्फत स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूसांठी सबज्युनियर १५ वर्षातील मुले क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडू १ जानेवारी २०११ किंवा त्यानंतर तसेच ज्युनियर १७ वर्षाखालील मुले व मुली १ जानेवारी २००९ किंवा त्यानंतर जन्मलेला असावा.

# बिरसा मुंडा यांच्या स्मृतीदिनानिमित्त साहित्यरत्न फाउंडेशनतर्फे अभिवादन कार्यक्रम संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - महान आदिवासी क्रांतिकारक व स्वातंत्र्यवीर बिरसा मुंडा यांच्या शहीद दिनानिमित्त साहित्यरत्न कला व सांस्कृतिक विकास फाउंडेशनतर्फे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी, मान्यवर वक्ते आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि अभिवादन करून करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या जीवनकार्यावर आधारित मनोगते व्यक्त केली. प्रा. डॉ. बाळकृष्ण सरकटे सर यांनी बिरसा मुंडा यांच्या ऐतिहासिकयोगदानावर प्रकाश टाकला, तर सामाजिक कार्यकर्ते अरविंद वानखडे आणि सामाजिक विचारवंत विनायक वानखडे यांनी त्यांच्या प्रेरणादायी संघर्षाची सखोल मांडणी केली.

कार्यक्रमात प्राध्यापक यशवंत खंडारे, ज्ञानेश्वर वानखडे, नरेश बायणे, फाउंडेशनचे अध्यक्ष देविदास महाले, व सचिव विवेक वानखडे यांचीही उपस्थिती लाभली. या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला. हा अभिवादन सोहळा दिनांक ९ जून २०२५ रोजी अत्यंत भावनिक व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या माध्यमातून बिरसा मुंडा यांच्या कार्याचा गौरव करताना, युवकांनी त्यांच्या विचारांवर चालण्याची प्रतिज्ञा घेतली.

# केळापूर येथे मोफत रोगनिदान व तपासणी शिबिर

## मोफत शिबिरे ही काळाची गरज, रुग्ण सेवा हिच ईश्वर सेवा : प्रदिप ना. भनारकर

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा - मोदी सरकारचे ११ वर्षे पूर्ती संकल्प ते सिद्धि अभियान अंतर्गत,दि.०८ जुन रविवार रोजी केळापूर येथे मोफत रोगनिदान,हाडातील कॅल्शियमची तपासणी, अस्थिरोग निदान शिबिर व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात अस्थिरोग तज्ञ डॉ.निलेश येलणारे व माजी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निलेश परचाके, चिंतामणी हॉस्पिटलचे रुग्ण सेवक अनिल अकुलवार तसेच सहकारी डॉ.यांनी रुग्णांची तपासणी करून नागरिकांचे समाधान करण्यात आले,या मोफत शिबिरात अनेक गरजु नागरिक सह वृध्द नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन मोफत शिबिराचा लाभ घेतला.

शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असुन शिबिरासाठी महत्वाच सहकार्य अस्थिरोग तज्ञ,डॉ.निलेश येलनारे व माजी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.निलेश परचाके,चिंतामणी हॉस्पिटलचे रुग्ण सेवक अनिल अकुलवार तसेच सहकारी डॉक्टरांनी २२५ रुग्णांची तपासणी केली,या शिबिरात अनेक नागरिक सह वयोवृद्ध नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते,आरोग्य संपन्न ठेवले तरच कुटुंब संपन्न राहील,त्यामुळे नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी याविषयी डॉ.निलेश परचाके यांनी मार्गदर्शन केले व सर्व नागरिकांचे समाधान करण्यात आले,समाजाला आपण काही मागण्यापेक्षा समाजाला आपण काय देऊ शकतो हा विचार घेऊन समाजातील दिनदुबळ्यासाठी झटणारा,भोई समाज क्रांती दल यवतमाळ जिल्हा अध्यक्ष,प्रदिप ना.भनारकर यांचा विचारातून गरिब गरजू रुग्णांना मोफत तपासणी करून उपचार करण्यात आले. त्यावेळी उपस्थित केळापूर येथील बूथ प्रमुख राजू देशट्टीवार, रमेश भोयर, विलास उहाके, रोशन मेश्राम, शेखर वहिले, स्वप्नील पेटकर, आकाश वहिले, नितिन मडावी, विनय उरकेवार,आशु लक्षटीवार, गौरव पाबडे,रोनक भंडारवार, सुरज वहिले, रामदास शिंदे, सुनिल चव्हाण, उमेश झरेकर, संदीप इंगोले, संजू गेडाम, वसंता गोडे यांचे सहकार्य लाभले, आभार प्रदर्शन प्रदिप ना.भनारकर यानी केले.

# ४ दिवसीय कोया पुनेम संगीत गाथा कार्यक्रमाचा शानदार समारोप

## कलश शोभायात्रा उद्घाटन बाळासाहेब मांगुळकर यांचेहस्ते प्रा. वसंतराव पुरके प्रा. राजु तोडसाम यांची उपस्थिती

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - निसर्गावर प्रेम करायला शिकवणारे गोंडी धर्माचे धर्म गुरु पहांदि पारी कुपार लिंगो यांचे तत्वज्ञान प्रसार करणारी कोया पुनेम गोटुल समितीच्या ७ वर्धापनदिनानिमित्त दि.६,७,८ व ९ जुन रोजी कोया पुनेम संगीत गाथा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

६ जुन ला भिमालपेनपेनठाना वाघापूर येथुन कलश शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेचे उद्घाटन आ.बाळासाहेब मांगुळकर यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी कलश यात्रेत महात्मा राजा रावण,जंगो रायताड, राणी दुर्गावती, बाबुराव शेडमाके यांचे वेषभुषेत डोक्यावर पाणी घेऊन...फेडले.कलश शोभायात्रेत परिवारासह समाजबांधव उपस्थित होते. भिमाची वढी यांचे वतीने शोभा यात्रेत शरबत वाटप करण्यात आले. ७ जून ते ९ जुन पुनेमाचार्य शंकरशहा ईरपाचे यांचा कोया पुनेम संगीत गाथा कार्यक्रम गुरुदेव मंगल कार्यालय दारव्हा रोड झाला. त्यांनी कोयामुरा उत्पत्ती, पहांदि पारी कुपार लिंगो जन्म,८८ शंभु सेक,रायताड जंगोदाई,महात्मा राजा रावण, कचारगड येथील काली कंकाली व हिरा सुका सुकाचार्य यांची माहिती संगीत गाथेत सांगितली. ३ दिवस आदिवासी समाज बहुसंख्येने उपस्थित होते यामध्ये यवतमाळ, पांढरकवडा, घाटंजी, नेर, वणी, राळेगाव,मारेगाव समावेश होतो. यामध्ये दशरथजी मडावी,सुरेश कन्नाके, गुलाबराव कुळमेथे,राजु चांदेकर,प्रा.निनाद सुरपाम, भाऊराव मरस्के, पि.एल.कुमरे, नरसिंह कुमरे, सुवर्णा वरखडे, माया मसराम, प्रविण मडावी, सेवा दाते गजानन पोयाम, पुंडलिक मसराम, अविनाशजी सुरपाम उपस्थित होते. ९ जुन ला कोया पुनेम संगीत गाथा कार्यक्रम चा समारोप करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रा.वसंतराव पुरके होते तर प्रमुख पाहुणे राजु भाऊ तोडसाम आमदार केळापूर,नारायणराव मसराम, तपस्वी दशरथजी ताडाम, भुमक महलसचे प्रल्हादराव सिडाम, मुरलीधर टेकाम होते.यावेळी राष्ट्रीय पुनेमाचार्य शंकरशहा ईरपाचे,भुमक विमलशहा ककोडिया, ढोलक मास्टर पंचलाल धुर्वे, पेड मास्टर मनोहर इवनाती,बेंजोमास्टर ज्ञानचलाल धुर्वे यांचा पहांदि पारी कुपार लिंगो प्रदान करून सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा.वसंतराव पुरके यांनी निसर्ग संवर्धन पुर्वजनाची शिकवण आहे आपल्या संस्कृतीत कर्माला धर्म मानले जाते. दारु सोडा समाज जोडा आहे. आवाहन करून कोया पुनेम गोटुल समिती ने समाजाचे परिवर्तन घडवुन आणले असे म्हणाले. यावेळी कोया पुनेम गोटुल समिती राज्य अध्यक्ष प्रल्हादराव सिडाम राज्य सचिव किशोर उइके जिल्हा अध्यक्ष गुलाबराव मेश्राम सचिव लक्ष्मणराव कुळसंगे पदाधिकारी प्रशांत सोयाम, गजानन कोटनाके, दिलीप मसराम, माणिकराव तोडसाम, पवनकुमार आत्राम, स्वाती मडावी सदस्य अनिता मसराम, ज्ञानेश्वर उइके, दामोदर उइके, राजेंद्र मडावी, आदिवासी समाज संघटनेचे दिलीप शेडमाके, भिमराव मसराम, प्रफुल कोवे, शंकर कोटनाके, शरद उइके, तथा आदिवासी समाजाच्या संघटना पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# महावितरण अधिकारी व कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे विद्युत ग्राहक अंधारात

जनमाध्यम प्रतिनिधी



द्राणकी : पावसाळा लागताच महावितरण विभागाचा भोंगळा कारभार चव्हाट्यावर आले आहे. काल पासून पावसाने हजरी लावताच महावितरण वीज वीस घंटे गायब झाल्याने विद्युत ग्राहकांना अंधारात झोपावे लागले सुदैवाने रात्री चा फायदा घेऊन चोरट्यांनी चोरी केली नाही ना पावसाळ्यात साप,विंचू व विषारी साप डसण्याची घटना घडली नाही. पण महावितरण कंपनीचा असाच भोंगळा कारभार राहिला तर हे घटना घडली तर याचा सर्वस्व जबाबदार महावितरण विभागाला धरावे असे नागरिक म्हणत आहे.

महावितरण विभागाने पावसाळा लागण्याआधी जर का दर महिन्याला मेन्टनन्स करून ट्री कटिंग, विद्युत तारा भवती कुजलेले वाळलेले झाडे तोडणे, आलेला विद्युत एम्पर व जंपर चेक करून ओवर लोड कनेक्शन चे विभाजन केले असते तर आज विद्युत पुरवठा वीस घंटे खंडित होत नव्हता.

आज महावितरण च्या अधिकारी व कर्मचारी यांच्या आळशी कामामुळे वीस वीस तास विद्युत पुरवठा बंद राहत असल्यामुळे कंपनी ला लाखोंचा चुना लागत असून विद्युत ग्राहक परेशान आहे. महावितरण विभागाचा भोंगळा कारभार बघुन सुद्धा कार्यकारी अभियंता कोणतीच कार्यवाही करताना दिसत नाही.

या विभागाचे लोकप्रतिनिधी खासदार नागेश पाटील आष्टीकर व आमदार कितानराव वानखेडे नुसती बघ्याची भूमिका करत असल्याचे संताप नागरिक व्यक्त करत आहे.

# दिग्रस येथे शासकिय वसतीगृहात मोफ़त प्रवेश

दिग्रस : सामाजिक न्याय विभागाच्यावतीने चालविण्यात येणा-या मागासवर्गीय मुलांचे शासकिय वसतीगृह दिग्रस येथे रिक्त जागेवर ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणीक स्तर वाढवण्यासाठी सन 2025-26 या शैक्षणीक सत्रासाठी प्रवेश देणे सुरु आहे.

या वसतिगृहात मोफत निवास, भोजनाची व्यवस्था, ग्रंथालय, संगणक कक्ष, मोफत शैक्षणीक साहित्य, गणवेश, खेळाचे साहित्य, निर्वाह भत्ता इत्यादी सुविधा मोफत उपलब्ध आहे. 80 टक्के अनुसुचित जातीसाठी, अनुसुचित जमातीसाठी 3 टक्के, विमुक्त जाती, भटक्या जमातीसाठी 5 टक्के, इतर मागासवर्गासाठी 5 टक्के, विशेष मागासप्रवर्गासाठी 2 टक्के, अनाथ 2 टक्के, व अपंगांसाठी 3 टक्के जागा राखीव आहे.

या करीता इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अधिक महितीसाठी वसतीगृह अधिक्षक के. ए. अलोणे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# वेळापत्रकाविना शिक्षक बदली पोर्टल सुरू

## रिक्त जागांची घोषणाही नाही; शिक्षकांत संभ्रमावस्था

**अमरावती/का.प्र.**

ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांच्या बदलीचे वेळापत्रक जाहीर केलेले नाही. जिल्हा परिषदेतर्फे कोणत्याही सूचना नाहीत. बदलीसाठी रिक्त जागांची घोषणाही केलेली नाही अन् थेट बदली पोर्टल सुरू केले आहे.

संवर्ग एक व दोनमध्ये असणाऱ्या शिक्षकांनी बदलीतून सूट हवी आहे का, याबाबतचे होकार व नकार भरण्याच्या सूचना बदली पोर्टलवर शनिवारी सायंकाळी जाहीर केल्या आहेत. रविवार अखेर ही मुदत देण्यात आली आहे. प्रशासनाचे स्पष्ट आदेश व बदली वेळापत्रक अधिकृत जाहीर न झाल्याने शिक्षक वर्ग कमालीचा गोंधळला आहे. शनिवार व रविवार हे दोन्ही दिवस शासकीय सुटीचे आहेत. त्यामुळे विचारणा कोणाला करावयाची, हा प्रश्न सर्वांना पडला आहे.पुन्हा आज एक दिवस मुदत वाढ दिली आहे.



संवर्ग एक व दोन चे फार्म भरतांना ओटीपी व ई-मेलवर पिंट न येणे हया अडचणी आल्यात त्या दुर होणे आवश्यक आहे.जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांसाठी शासनाने शिक्षकांचे चार संवर्ग तयार केले आहेत. या चार संवर्गांनुसार व बदलीच्या सात टप्प्यांचे २८ एप्रिल ते ३१ मे पर्यंतचे वेळापत्रक यापूर्वी जाहीर केले होते. मात्र, आंतरजिल्हा आपसी बदली झालेल्या काही शिक्षकांनी ऑनलाइन बदलीसाठी सेवाज्येष्ठता धरावी, यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याशिवाय १५ मार्च २०२४ च्या नवीन संचमान्यता आदेशाविरोधात अनेक जिल्ह्यांतील शिक्षकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. १६ जूनपर्यंत संचमान्यतेबाबत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या सर्व कारणांमुळे वेळापत्रकानुसार ३१ मे पूर्वी होणारी बदली प्रक्रिया जून सुरू झाला तरी प्रत्यक्षात सुरू झाली नाही.

> शासनाने बदलीचे वेळापत्रक जाहीर केलेले नाही. रिक्त पदांची व समानिकरणाची यादी घोषित केलेली नाही आणि थेट बदली पोर्टल सुरू केल्याने शिक्षक पुरता गोंधळला आहे. शासनाने बदलीचे वेळापत्रक जाहीर करणे आवश्यक आहे.
>
> **राजेश सावरकर,** राज्य प्रसिध्दी प्रमुख
> महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

ऑनलाइन बदली प्रक्रियेनुसार बदलीपात्र, बदली अधिकारपात्र व सेवाज्येष्ठ शिक्षकांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यानंतर समानीकरणासाठी रिक्त पदे ठेवून बदलीसाठी निव्वळ रिक्त जागा घोषित कराव्या लागतात. ही यादी घोषित करण्यापूर्वीच संवर्ग एक व दोनमधील शिक्षकांना बदलीसाठी होकार व नकार देणे बदली पोर्टलवर अचानक घोषित केल्याने शिक्षक वर्ग पुरता गोंधळला आहे. संवर्ग एक व दोनमधील बदलीइच्छुक शिक्षकांची यादी जाहीर करण्यासाठी व यादीतील शिक्षकांवर काही आक्षेप असतील तर ती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी हे अर्ज भरून घेतले जात असावेत, असे शिक्षक शैलेन्द्र दहातोंडे यांनी सांगितले.

# संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष अभियान

**अमरावती/का.प्र.**

संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आले आहे. ज्या लाभार्थ्यांना अद्यापही या योजनांचे अनुदान मिळालेले नाही, त्यांच्यासाठी जिल्ह्यात विशेष अभियान राबविले जात आहे.९ते १५ जून २०२५ या कालावधीत तालुकास्तरावर हे अभियान आयोजित करण्यात आले आहे.

जिल्ह्यात २०१८ पासून डी.बी.टी. (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) द्वारे लाभार्थ्यांना अनुदानाचे वितरण सुरु झाले आहे. त्यानंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्णय घेतला आहे की, ५ मार्च २०२५ पासून डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणीकृत आणि आधार व्हॅलिडेट झालेल्या लाभार्थ्यांनाच अनुदान दिले जाईल. पारंपारिक बीम्स पद्धतीने अर्थसहाय्य वितरण सध्या थांबविण्यात आले आहे.आतापर्यंत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत डी.बी.टी. द्वारे २ लाख १४ हजार ९१३ लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आले आहे.डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणीमध्ये अमरावती जिल्हा प्रथम क्रमांकावर असून अनुदान वितरणातही जिल्हा अग्रेसर आहे.

लाभार्थ्यांचे आधार लिंक खाते अधिक असल्याने त्यांना अनुदान लवकर मिळत आहे. तरी ज्या लाभार्थ्यांचे आधार लिंक झालेले खाते अद्यापही नाहीत, किंवा ज्यांचे ९५-इनक्टिव्ह आधार (आधार कार्ड बँक खाते क्रमांक किंवा NPCI बँक लिंक नसल्यामुळे) आणि ९६-आधार मॅपिंग डझ नॉट एक्झिस्ट (आधार नंबर IIN ला लिंक नाही) अशा लाभार्थ्यांनी तातडीने आपले आधार कार्ड बँक खात्याशी लिंक करून घ्यावे.ज्यांना अद्याप अनुदान मिळालेले नाही आणि ज्यांचे आधार व्हॅलिडेट झालेले नाहीत, अशा लाभार्थ्यांनी या विशेष अभियानात आपले अपडेटेड आधार कार्ड आणि बँक पासबुकची प्रत घेऊन संजय गांधी योजना विभाग, तहसील कार्यालय येथे उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

## काव्यमित्र संस्थेच्या वतीने

# मंजू ठाकरे यांचा राष्ट्रीय महिला समाज भूषण पुरस्काराने सन्मान

**अमरावती/का.प्र.**

'२०२५ जिजाऊची लेक' सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्रातील लावणी स्पर्धा अनेक वर्षापासून आयोजन करणारे अमरावती येथील धनश्री व सामाजिक प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा मंजू ठाकरे जिजाऊ ची लेक यांना राष्ट्रीय महिला समाज भूषण पुरस्काराने काव्य मित्र संस्था पुणे यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रमाता जिजाऊ स्मृती दिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.मागील पंचवीस वर्षापासून काव्य मित्र संस्था पुणे यांच्या वतीने विविध क्षेत्रातसामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक,क्रीडा, आरोग्य, सेवा देणाऱ्या समाज बांधवांचा सन्मान करण्यात येतो.'२०२५ जिजाऊची लेक' सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्रातील लावणी स्पर्धा अनेक वर्षापासून आयोजन करणारे अमरावती येथील धनश्री व सामाजिक प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा मंजू ठाकरे जिजाऊ ची लेक यांना राष्ट्रीय महिला समाज भूषण पुरस्काराने काव्य मित्र संस्था पुणे यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले



राष्ट्रमाता जिजाऊ स्मृती दिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.रविवार ८ जून रोजी तारांगण, सायन्स पार्क पिंपरी चिंचवड येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध लेखिका सविता जंगम जुन्नर, तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ.प्रमोद लाड, मासिक अपेक्षाचे संपादक दत्ता उभे, नवी दिल्ली येथील लेफ्टनंट कमांडो राम शिंदे, लोकप्रिय आदर्श शिक्षक रोहन पंडित मावळ यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला कार्यक्रमाचे मुख्य आयोजन काव्यमित्र संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र सगर यांनी केले .तर सूत्रसंचालन शारदा पवार यांनी केले या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील उल्लेखनीय कामगिरी करणारे अनेक मान्यवर उपस्थित होते.

# दादासाहेब गवई स्मारक उभारण्यासाठी गती द्यावी - जिल्हाधिकारी

**अमरावती/का.प्र.**

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अमूल्य योगदान येणारे रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे स्मारक ही जनतेसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या कार्याला समर्पित अशा स्मारकाच्या कामाला विविध यंत्रणांनी गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात रा. सू. गवई स्मारकाबाबत विविध यंत्रणांची आढावा बैठक घेतली. यावेळी कमलताई गवई यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.श्री. येरेकर म्हणाले, दादासाहेबांचे स्मारक प्रामुख्याने तीन भागात विभागाले आहे. यात दादासाहेबांचा पुतळा, चित्रप्रदर्शनी आणि श्रोतृगृह असणार आहे. पुतळा उभारण्यासाठी जे. जे. स्कूलशी पाठपुरावा करून पुतळ्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रक्रिया जलद गतीने करण्यात याव्यात. यात आवश्यक असलेला कालावधी कमी करणे शक्य असल्यास तपासून पहावे. यासोबतच गरजेनुसार असलेल्या परवानगी आणि ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

चित्र प्रदर्शनीमध्ये लावण्यात येणाऱ्या छायाचित्रांची संख्या आणि त्यानुसार छायाचित्रांची निवड करण्यात यावी. याठिकाणी येणाऱ्या नागरिकाला सुस्पष्ट दिसतील, अशा पद्धतीने छायाचित्रे लावण्यात यावी. तसेच याठिकाणी दादासाहेबांचा जीवनपट दाखवणारी भिंत तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी आवश्यक प्रसंगांची निवड समितीच्या मान्यतेने घ्यावी. किऑस्क, व्हीडीओ, दादासाहेबांचे कृत्रिम बुद्धीमत्तेने केलेली भाषणे याबाबत कार्य करताना समितीचा सल्ला घ्यावा.स्मारकामध्ये श्रोतृगृह बांधण्यात येणार आहे. सदर श्रोतृगृह विद्यापीठाला हस्तांतरीत करण्यात येणार आहे. यासाठी विद्यापीठाने अनुषंगीक कार्यवाही करावी. प्रामुख्याने वीज जोडणी, कर यासारख्या बाबींवर प्रक्रिया सुरू करावी. न्यास नोंदणी झाल्यानंतर विद्यापीठाशी हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येणार आहे. स्मारकासाठी न्यास नोंदणी करण्याचे शासन निर्णयात नमूद आहे.

त्यानुसार तातडीने कार्यवाही करण्यात यावी. स्मारक पूर्णत्वास जाण्यासाठी प्रत्येक आठवड्यात याबाबत बैठक घेतली जाणार आहे. त्यामुळे स्मारकाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रत्येक यंत्रणेने वेळापत्रक तयार करावे, यातून अप्रतिम स्मारक उभे राहावे, यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

# जिल्हास्तरावरील युवा पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**अमरावती/का.प्र.**

राज्यस्तरीय, विभागीय आणि जिल्हास्तरीय पातळीवर विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या युवा पिढीला प्रोत्साहन देण्यासाठी 'जिल्हा युवा पुरस्कार '२०२४-२५ अंतर्गत अर्ज मागविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

जिल्हा युवा पुरस्कारासाठी जिल्ह्यातील एक युवक, एक युवती तसेच एक नोंदणीकृत संस्था यांना १० हजार रुपये रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.युवक युवतींसाठी पात्रता निकष व अटी पुढील प्रमाणे आहेत. अर्जदाराचे वय १ एप्रिल रोजी पंधरा वर्षे पूर्ण व ३१ मार्च रोजी २९ वर्ष पर्यंत असावे. जिल्हास्तर पुरस्कारासाठी जिल्ह्यात सलग पाच वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे .केलेल्या कार्याचे पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. पुरस्कार व्यक्ती अथवा संस्थेत विभागून दिला जाणार नाही. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी , कर्मचारी तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक , कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत.संस्थांसाठी पात्रता निकष व अटी पुढील प्रमाणे आहेत. पुरस्कार संस्थेत विभागून दिला जाणार नाही.संस्थांनी केलेल्या कार्याची पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जदार संस्था पंजीबद्ध असावी. अर्जदार संस्थेच्या सदस्यांचा पोलिस विभागाने प्रामाणिक केलेला चारित्र दाखला देणे आवश्यक राहील. युवा व युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांच्या गेल्या तीन वर्षातील कामगिरीचा यावेळी विचार करण्यात येईल.

इच्छुक व पात्र युवक-युवती तसेच संस्थांना करावयाचे नमुना अर्ज अर्जदारांनी १६ जून २०२५ पूर्वी कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती, जिल्हा क्रीडा संकुल, अमरावती मार्डी रोड, तपोवन गेट जवळ, अमरावती येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांच्याशी संपर्क साधावा.

## शासकीय वसतिगृहातील प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू

**अमरावती-** मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहात सन २०२५-२६ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, युनिट क्र. ४, जेल रोड, अमरावती , मागासवर्गीय गुणवंत मुलींचे शासकीय वसतिगृह, जेल रोड, अमरावती, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, कॅम्प, अमरावती तसेच १२५ जयंती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, विलास नगर, अमरावती येथील वसतिगृहांमध्ये शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यासाठी कनिष्ठ महाविद्यालय, व्यावसायिक, अव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी व वसतिगृहात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या प्रवेशासाठी नोंदणी समाज कल्याण वसतिगृह येथे सुरू आहे.सन २०२५-२६ मधील प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होणार असून, ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण झाल्यावर दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. यासाठी विद्यार्थिनींनी वसतिगृहात नोंदणी करणे आवश्यक असल्याचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहाचे गृहप्रमुखांनी कळविले आहे.

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाच्या स्थापनेला मंजुरी



## आ.काळे आणि कार्यकर्त्यांकडून जल्लोष...

**अचलपूर/वार्ताहर**

राज्यातील लाखो आदिवासी बांधवांसाठी एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला असून, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाच्या स्थापनेला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. ही वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली मागणी अखेर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या प्रयत्नांमुळे प्रत्यक्षात उतरली आहे. या निर्णयामुळे आदिवासी समाजात आनंदाचे वातावरण असून परतवाडा रेस्ट हाऊस येथे संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत मेळघाट मतदार संघाचे आमदार केवलराम काळे आणि कार्यकर्त्यांनी जल्लोष व्यक्त केला.

परतवाडा येथे रेस्ट हाऊस मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत मेळघाट मतदार संघाचे आमदार केवलराम काळे,अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अतुल वाठ,भाजपा पक्षाचे माजी जिल्हा परिषद सदस्य सुखदेव पवार,आलोक अलोकर,दिनेश चव्हाण, साबुलाल बेठे ,विलास चौधरी ,शुभम खेरसुंजीत भास्कर ,वङ्कोश्वर मरसकोल्हे ,प्रसन्न काठोले, अविनाश यावले,विवेक नवलाखे , बंसी शेलेकर तसेच मेळघाट तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.पत्रकार परिषदेत आमदार केवलराम काळे यांनी सांगितले की,आयोगाला वैधानिक दर्जा देण्यात येणार असून, त्यामध्ये एक अध्यक्ष आणि चार अशासकीय सदस्यांचा समावेश असेल. आयोगाच्या कार्यासाठी २६ नवीन पदांची निर्मिती केली जाणार असून कार्यालय, कर्मचारी व आवश्यक सुविधांसाठी अंदाजे ४.२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आमदार केवलराम काळे यांनी सांगितले की,'हा निर्णय म्हणजे 'सबका साथ, सबका विकास' या धोरणाची आदिवासी समाजासाठी झालेली प्रत्यक्ष पूर्तता आहे. सरकारने हा आयोग स्थापन करून आदिवासी समाजाच्या न्याय्य हक्कांना बळ दिले आहे.

## केंद्रीय यूपीएससी नागरीसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी प्रवेशाबाबत परीक्षा

**अमरावती/का.प्र.**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२६ च्या पूर्व प्रशिक्षणाकरीता विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रातील प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा ऑफलाईन पद्धतीने राज्यस्तरावरून घेण्यात येणार आहे. या परीक्षेकरिता जाहिरातीत नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणाऱ्या उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.परीक्षेचा ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरण्याचा कालावधी दि. ३ ते २७ जून असून अर्ज भरण्याचा अंतिम तारीख २७ जूनपर्यंत आहे. परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम ३० जून पर्यंत आहे. प्रवेश परीक्षा २७ जुलै ऑफलाईन पद्धतीने होणार असून परीक्षेची वेळ सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत राहील.सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम, ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतची माहिती व परीक्षेसंबंधी इतर सर्व सूचना www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती च्या संचालक डॉ. संगीता व्ही. पकडे (यावले) यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## संक्षिप्त

### संत सद्गुरू सदाराम महाराज समाधी सोहळा

**कुऱ्हा/वार्ताहर**

श्री विठ्ठल रुख्मिणी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर विदर्भ येथे श्री संत सदगुरू सदाराम महाराज समाधी सोहळा साजरा करण्यात आला.श्री संत सदगुरू महाराज महाराज यांनी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला समाधी घेतली तेव्हापासून हा उत्सव साजरा करण्यात येतो.तीर्थ स्थापन करण्यात आले व हभप तिडके महाराज यांनी श्री सदाराम महाराज यांच्या पोथीचे पारायण केले नंतर अध्यक्ष नामदेव अमाळकर,सचिव सदानंद साधू,विश्वस्त श्री अतुल ठाकरे यांनी समाधीचा अभिषेक केला.नंतर स्थानिक वारकरी यांचे भजन झाले.हभप तिडके महाराज व स्थानिक वारकरी यांचा अध्यक्ष,सचिव,विश्वस्त यांनी शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. अतुल ठाकरे यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते.आरती नंतर महाप्रसादाने उत्सवाची सांगता झाली. ह्या प्रसंगी संस्थानचे अध्यक्ष श्री नामदेवराव माळकर सचिव सदानंद साधू विश्वस्त अतुल ठाकरे, व्यवस्थापक कपिल गावंडे, हभप तिडके महाराज व असंख्य वारकरी उपस्थित होते



### शिवराज्यभिषेक दिन साजरा



**तिवसा-** येथील श्री राजर्षी शाहु महाराज सर्वजनिक वाचनालय येथे शिवराज्यभिषेक दिन साजरा करण्यात आला. स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा घेऊन आजच्याच तिथी नुसार रयतेचा राजा श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक सोहळा पार पडला होता. ३५२ वा राज्यभिषेक सोहळा वाचनालयात उत्साहत पार पडला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी आरती राजेश वानखडे यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन प्रवासावर आरती वानखडे आणि वाचनालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यावेळी राजाभाऊ देशमुख, विलासराव देशमुख (अकोला), ज्ञानेश्वरराव कुऱ्हाडे, अंकुश देशमुख, सुमित अनासाने, दिपक धानोरकर, मोहित मोटघरे, आकाश कुऱ्हाडे, सुरज गौरखेडे, प्रथमेश गौरखेडे, डहाके, शुभम वानखडे, सौरभ डहाके, मनिष थोरात, अक्षय देशमुख, अंकुश केवदे, वैष्णवी गोहत्रे, प्रिया डहाके, पूजा गडलिंग तसेच वाचणालयाचे वाचनालयाचे वाचक उपस्थित होते.

### माता - पिता पूजा करून महेश नवमी साजरी



**चांदूर रेल्वे-** चांदूर रेल्वे माहेश्वरी समाजाने श्रद्धा आणि भक्तीच्या वातावरणात दोन दिवसीय महेश नवमी उत्सव साजरा केला. या शुभ प्रसंगी राम मंदिर नगर येथे एक भव्य मिरवणूक काढण्यात आली, ज्यामध्ये मोठ्या संख्येने तरुण, तरुणी आणि महिलांनी समाजातील सदस्यांसह सहभाग घेतला. त्यानंतर अग्रवाल समिती धर्मशाळेत सकाळी ११ वाजता दिप प्रज्वलन, महेश वंदना आणि आरती करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. रोशन चांडक आणि ज्योती मुंदडा यांनी महेश वंदना सादर केली आणि ममता गंगन, प्रगती गंगन यांनी स्वागत गीत सादर केले. यावेळी बालसंस्कार पूर्व, संस्कृती संवर्धन (अखिल भारतीय महासभा) चे समन्वयक अनिल जुगलकिशोर राठी आणि माहेश्वरी समाजाचे तरुण उद्योजक गोपाल नारायणदास पनपालिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.माहेश्वरी समाजातील १२ वी आणि १० वी उत्तीर्ण विद्यार्थी आणि डॉक्टर, अभियंते, सीए, एमबीए विद्यार्थ्यांचा सत्कार आणि सन्मान करण्यात आला.३ तारखेला माहेश्वरी नवयुवक संघटनेतर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष किशोर गंगण आणि सदस्य राजेश मुंदडा, विजय कलंत्री, गोपाळ पनपालिया, डॉ. राजेश जाजू, राधेश्याम गांधी, घनश्याम गंगण, जयेंद्र तावरी, बंडू मुंदडा, दिलीप चांडक, कमल किशोर पनपालिया, उमेश मुंदडा, चेतन लड्डा, नंदू पनपालिया, मुरलीधर मुंदडा, युवा अध्यक्ष अतुल चांडक, ज्योती मुंदडा, अर्चना जाजू महेश नवमीनिमित्त माहेश्वरी समाजाने काढलेल्या मिरवणुकीचे विविध ठिकाणी स्वागत करण्यात आले.ज्यामध्ये संजय पनपालिया, सचिन वर्मा, राजू कलावटे यांनी मिरवणुकीत उपस्थित असलेल्या लोकांना शितपेय वितरीत केले.आणि इतर सदस्यांनी आर्थिक परिश्रम घेतले.


### राष्ट्रीय स्पर्धेसाठी प्रशिक्षक म्हणून रुपाली जहागिरदार यांची निवड

**परतवाडा-** भारत सरकार खेल मंत्रालय च्या 'खेलो इंडिया' युथ गेम्सच्या सातव्या पर्वाला सुरुवात झालेली आहे.यात देशातील विविध खेळांचे हजारो खेळाडू सहभागी होणार आहेत. या वर्षी स्पर्धा ही बिहार येथे रंगणार आहेत. या स्पर्धे मध्ये महाराष्ट्रातून ४३७ खेळाडूसह १२८ प्रशिक्षक तसेच व्यवस्थापक असे एकूण ५६५ जणांचे पथक सहभागी होणार आहे.क्रीडा व युवक सेवा संचालनाने बालेवाडी पुणे येथे, सातव्या राष्ट्रीय.



'खेलो इंडिया' करिता स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबीर आयोजित केले आहे. या शिबीरा करिता क्रीडा मार्गदर्शक म्हणून अमरावती जिल्हयातील परतवाडा येथील प्रशिक्षीका रुपाली मनिष जहागिरदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.अचलपूर तालुक्यातील परतवाडा या शहरातून रुपाली जहागिरदार यांची निवड झाल्याबद्दल क्रीडा उपसंचालक, जिल्हा क्रीडा अधिकारी अमरावती तसेच एचव्हीपीएमचे प्रभाकरराव वैद्य, सचिव माधुरी चेंडके,महाराष्ट्र थांग-ता चे असो.चे अध्यक्ष मुकुंद धुळधर,सचिव महाविर धुळधर, आ. प्रविण तायडे , बच्चू कडू, उपविभागीय अधिकारी अचलपूर, तहसीलदार, नप मुख्याधिकारी व क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# लोकल अपघात आणि मुंबई महापालिका निवडणूक....



मुंबई रेल्वे लोकलकडे मुंबईची जीवन वहिनी म्हणून पाहिले जाते. काल उपनगरीय कसारा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कडे येणाऱ्या लोकलमधून आठ जण खाली पडून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेवर राज्यात राजकारण सुरू झाले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी मुंबईतील गर्दी नवी नाही, 'बाहेरून येणाऱ्या लोंढ्यांमुळे राज्यात बोजवारा उडाला आहे. कोण कुठून येतेय, काय करतेय हे पाहावे लागेल' असे म्हटले आहे. राष्ट्रवादी शरदचे अध्यक्ष शरद पवारांनी प्रवाशांना दोष देऊ नका असे रेल्वे प्रशासनाला म्हटले आहे. केंद्र सरकारने लोकलला बंद होणारे दरवाजे लावण्याची प्रक्रिया लवकरात पूर्ण करावी असे म्हटले आहे. तिकडे शिवसेना उबठा नेते आदित्य ठाकरेंनी यांनी रेल मंत्री की रीळ मंत्री आहे असे म्हटले आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरेंना राज्यात येणाऱ्या लोंढ्या मुळे निर्माण होणाऱ्या समस्या, मराठी माणसाबद्दल एवढा कळवळा असेल तर सर्वप्रथम त्यांनी मुंबईतील प्रमुख आर्थिक उद्योग,रेल्वेचे काही कार्यालये गुजराथ येथील अहमदाबाद किंवा इतरत्र सरकार द्वारा स्थलांतरित केल्या जात असतील तर त्याचे त्यांनी स्वागत करावे मगच त्यांना मराठी माणसाची काळजी आहे असे म्हणता येईल.

शिवसेना उबठा प्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांचे चिरंजीव आदित्य ठाकरेंनी वेदांता फॉक्सकॉन प्रकल्प गुजराथ राज्यात गेल्या वरून नुसता हल्लकल्लोळ माजवला होता. उद्योगपती तसेच गुंतवणूकदारांचा सरकारवर विश्वास राहिला नाही. गुजराथ सरकार उद्योग पळवत आहे असले बेछूट आरोप लावण्यास त्यावेळी दोघांनी मागे पुढे पाहिले नव्हते. एकीकडे उद्योग परप्रांतात जातात म्हणून ओरड करावयाची आणि उद्योग आले की त्यासोबत लोंढे आले म्हणून विरोध करावयाचा असे धोरण फार पूर्वीपासून या दोन्हीं पक्षाचे आहे.

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर एमआयडीसी आहे आणि औद्योगिक संस्था आहेत तेथे आपल्यालाच कंत्राटे मिळावी म्हणून कंपन्यांवर कोण दबाव टाकते? तसेच महाराष्ट्रातील किती मराठी तरुण कंपन्यांमध्ये काम करत असताना कष्टाची कामे करण्यास तयार असतात? याची माहिती घेऊन बाहेरचे श्रमिक महाराष्ट्रात का येतात किंवा त्यांना काम का मिळते याची चौकशी करून मगच लोंढ्याबद्दल शिवसेना उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षांनी खर तर बोलले पाहिजे.

शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष प्रमुख राज्याचे मुख्यमंत्री झाल्या बरोबर त्यांनी सर्वप्रथम मुंबईतील आर ए मेट्रो शेड प्रोजेक्ट बंद केला. या प्रकल्पाचे जवळपास ८० टक्के काम जेंव्हा की पूर्ण झाले होते. खरे तर शिवसेनेचा जन्म मुंबईतला येथील वाहतूक व्यवस्था बाबत सर्व गोष्टी माहिती असताना. मुंबईतील सर्व सामान्यांना वाहतुकीच्या रोजच्या त्रासाला सामोरे जावे लागते हे दिसत असताना सुद्धा त्यांनी सरकार स्थापन झाल्या झाल्या पर्यावरणाच्या नावाखाली हा प्रकल्प बंद केला होता. मेट्रो प्रकल्पाची खरी सुरवात २०१४ भाजप सेना सरकार आल्यानंतरच झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कडे व्यक्तिशः लक्ष दिल्याने या मेट्रो प्रकल्पाला गती प्राप्त झाली. खरे तर २५० किलोमीटर मेट्रो लाईन चे काम २०२५ पर्यंत पूर्ण करावयाचे होते मुख्यमंत्री पदावर उद्धव ठाकरे बसल्यावर त्यांनी याला प्रथम खीळ घालण्याचे काम केले होते.

राष्ट्रवादी शरद चे अध्यक्ष शरद पवारांनी प्रवाशांना दोष देऊ नका असे म्हटले आहे. महाविकास आघाडी सरकार असताना मेट्रो लाईन चे काम उद्धव ठाकरेंनी बंद पडल्यानंतर त्यावेळी त्यांनीं त्या विरुद्ध ब्र काढला नाही. आज म्हणतात की प्रवाशांना दोष देऊ नका सरकारने उत्तर दिले पाहिजे. शिवसेना उबाठा,महाराष्ट्र नवनिर्माण सेना मराठी माणसाचे कैवारी असल्याचे भासवतात. राज्यात शिवसेना उबाठा काँग्रेस सोबत सरकार स्थापन करते. तिकडे कर्नाटकात काँग्रेस सरकार महाराष्ट्र एकीकरण समिती आणि त्याच्या कार्यकर्त्यांवर अत्याचार करते. आज मुंबई महापालिकेत गेल्या तीस पस्तीस वर्षापासून सत्ता आहे.राज्यात शिवसेना सरकार मध्ये असुन मराठी माणसाला उद्योगधंद्यात सक्षम बनवण्यासाठी,स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी काही पाऊल उचलल्याचे ऐकिवात नाही.

विधानसभा निवडणुकीतील झालेल्या पराभवानंतर मुंबई महापालिकेची निवडणूक हा शिवसेना उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दृष्टीने अस्तित्वाचा प्रश्न आहे. मराठी अस्मिता, मुंबईतील मराठी माणूस त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आता आठवतील पण ह्यावर उपाययोजना कशा करता येतील ह्याचा विचार करण्याऐवजी राजकारण करण्यात धन्यता मानतील. लोकलला झालेला अपघात अत्यंत दुर्दैवी आहे पण या निमित्याने येणाऱ्या काळात त्यावरून राजकारण खेळले जाईल त्यात मराठी माणूस,आमची मुंबई, परप्रांतीय मुद्दे हे आणले जातील पण एकदा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्या की हे सर्व मुद्दे यांच्या राजकारणातून गायब होतील.

**● अविनाश देशपांडे**

# मॉडेल सोलर व्हिलेज योजना



**प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' ही गावांना प्रोत्साहन देणारी योजना राबवित आहे. या योजनेविषयी ही माहिती...**

आपला भारत देश पर्यायाने महाराष्ट्र राज्य आणि राज्यातील गावे-घरे मोफत सोलर वीजेने ऊर्जावान करण्याचा संकल्प केंद्र व राज्य शासनाने केला आहे.अनेक नागरिक आपल्या निवासस्थानी सोलर यंत्रणा स्थापित करून वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याची अनेक उदाहरणं आपल्या सभोवताली दिसत आहेत. याच दिशेने आणखी एक पाऊल टाकत शासन 'मॉडेल सोलर व्हिलेज' ही गावांना प्रोत्साहन देणारी योजना राबवित आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' या घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने ९ ऑगस्ट २०२४ रोजी ज्ञापन प्रसिध्द केले आहे. त्यानुसार राज्यात ही योजना राबविण्याकरीता महाऊर्जा व महावितरणमार्फत प्रत्येक जिल्ह्यात एक गाव याप्रमाणे राज्यात २४ गावे महावितरण व १२ गावे महाऊर्जामार्फत 'मॉडेल सोलर व्हिलेज' म्हणून विकसित करण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांपैकी अमरावती जिल्ह्यातील एक गाव महाऊर्जामार्फत विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी अमरावती जिल्ह्यातील पाच हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत, अशी माहिती महाऊर्जाचे अमरावती विभागीय व्यवस्थापक प्रफुल तायडे यांनी दिली आहे.

पी. एम. सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत मॉडेल सोलर व्हिलेज या योजनेच्या संर्वागीण व्यवस्थापनासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती नुकतीच गठीत करण्यात आली असून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे या समितीचे सदस्य असून विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

मॉडेल सोलर व्हिलेज योजनेसाठी गाव निवडीबाबत पुढीलप्रमाणे निकष केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय मंत्रालयाव्दारे निश्चित करण्यात आले आहेत. १) जिल्ह्यातील निवड केलेले गाव हे महसूल गाव असावे व त्याची लोकसंख्या जनगणनेनुसार किमान ५ हजारापेक्षा जास्त असावी. २) स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या गावांमध्ये स्पर्धेच्या कालावधी दरम्यान जास्तीत जास्त विविध अपारंपारिक ऊर्जा साधने/सौर उपकरणे आस्थापित करणे गरजेचे आहे. सौर उपकरणांमध्ये पी.एम. सुर्यघर योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांवर सोलर रुफ टॉप प्रकल्प उभारणी करणे तसेच पी.एम. कुसुम योजनेंतर्गत जास्तीत जास्त सौरपंप अथवा इतर विकेंद्रीत अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प स्थापित करणे गरजेचे आहे. व या अनुषंगाने या सर्व अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता १० मेगा वॅट पर्यंत असणे अपेक्षित आहे. ३) याकरीता सी.एस.आर.निधी, विभागाचा निधी किंवा जिल्हास्तरीय निधी व इतर उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करता येईल. ४) अग्रणी बॅंकेमार्फत वैयक्तिक लाभार्थ्याला सौर प्रकल्प उभारणीकरीता बॅंकेच्या पात्रता निकषानुसार कर्ज उपलब्ध होऊ शकेल. ५) स्पर्धेतील विजेत्या गावाचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाऊर्जातर्फे तयार करण्यात येईल व प्राप्त होणाऱ्या एक कोटी एवढ्या केंद्रीय वित्तीय सहाय्यामधून गावाला पुढीलप्रमाणे गावातील कामे करता येतील.

गावासाठी सामुदायिक सौर प्रकल्प (बी.ई.एस.एस.) किंवा इतर प्रकल्प, एन आर एल एम बचत गटांसाठी विविध सौर प्रकल्प, गावातील शासकीय ईमारतींचे सौर विद्युतीकरण, सौर आधारित व इतर प्रकल्प, सौर कृषी पंप, इतर सौर अधारित तंत्रज्ञानावर असलेले अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प, बचत गट/प्राथमिक स्तरावरील सहकारी संस्था/ डेअरी/मत्स्योद्योग प्रकल्प इत्यादी प्रकल्पासाठी ९० टक्के अर्थसहाय्य दिल्या जाणार आहे. या अनुषगांने निकषानुसार अमरावती जिल्ह्यातील पात्र असेलल्या गावांकडून १६ जून २०२५ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. अधिकाधिक गावांनी पुढाकार घेऊन आपले गाव आदर्श आणि ऊर्जावान? करावे. याबाबत अधिक माहितीसाठी महाऊर्जा विभागीय कार्यालय,अमरावती यांचा दुरध्वनी/ भ्रमणध्वनी क्र. ०७२१ २६६१६१०/ ८६६९९११०११ किंवा domedaamravati@mahaurja.com या ईमेलवर संपर्क साधावा किंवा कार्यालयास प्रत्यक्ष भेट देण्यात यावी.

**संकलन**
**विभागीय माहिती कार्यालय अमरावती**

# कबीरांच्या दोह्यातील अंतरंग

विविध धर्म, संस्कृती, परंपरेने नटलेल्या देवभूमीत अनेक संतांनी लोककल्याणार्थ आणि विश्वाच्या हितार्थासाठी आपला देह झिजवला. त्यांच्या कर्मधर्म संयोगानेच ते अमरत्वपदाला पोचले. नव्हे नव्हे तर आजही ते आपल्या शब्द सामर्थ्याने, त्यांच्या बहुमोल वचनाने सुप्तशक्ती व्दारे समाजात वावरत असतात. अशाच संतरत्नांपैकी एक संत कबीरदास होय.

त्यांनी रचलेल्या हिंदी पद्यरचना, दोहे आजही असंख्य मानवाच्या मुखोद्गोत आहे. ते आपल्या लेखणीच्या रूपाने मानवी जीवनाचे मम..' मानवतावादी विचार.. जाती धर्मावर अत्यंत पोटतिडकेने दोह्यातून मांडतात.

'कल करे सो आज कर।
आज करो सो अभी।।
पल मे प्रलय होगा ६ बहुरी
करोंगे कब ।।'

उपरोक्त दोह्यातून कबीरदासजी मानवाला सतर्क करतात की,सत्य संकल्पाची कामे त्वरित करावी. नाहीतर जीवन हे काळाच्या अधिन आहे. मानवी देहाबद्दल कबीरदास म्हणतात.

जीवनात कर्तेपणाचा अहंकार असू नये. शुद्ध अंत:करणाने एखाद्या कर्मयोग्या प्रमाणे व्रतस्थ जीवन जगावे. यातच माणसाचे खरे सुख, समाधान व ऐश्वर्य आहे . दिलेले वचन शब्द प्राणाहून प्रिय मानणारे आपल्या भूमीत असंख्य जन्माला आलेत. शब्दासाठी वनवास पत्कारणारे, अख्या आयुष्याचा होमकुंड करणारे, शब्दालाचं संपत्ती मानणारे संत या भूमित घडले आहेत . शब्द हे दुधारी शस्त्र मानल्या जाते. शब्दबाणाने मनावर आघात होतो. तर शब्दानेच दुरावलेली मने जोडण्याचं कार्य होत असते.

'शब्द शब्द सब कोई करे ।
शब्द के हाथ ना पाव ।।
एक शब्द औषधी करे।
एक शब्द करे घाव ।। '

**शशिकांत तोटे दारव्हा, जि. यवतमाळ**
मो :९१३०८३५४५८

# स्टार्टअप्स ते बहुराष्ट्रीय कंपन्यांपर्यंतः औद्योगिक रसायनशास्त्र जागतिक करिअरचे प्रवेशद्वार

'उत्पादन कला' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या औद्योगिक रसायनशास्त्राची अलिकडच्या काळात लोकप्रियता वाढली आहे. या क्षेत्रात येण्यासाठी तुम्ही बी.एससी किंवा एम.एससी इंडस्ट्रियल केमिस्ट्री करू शकता. बागकामापासून ते मेकअप पर्यंतच्या आपल्या दैनंदिन वापरात येणाऱ्या अर्ध्याहून अधिक वस्तू औद्योगिक रसायनशास्त्राच्या क्षेत्रातील अत्याधुनिक उत्पादन प्रगतीचा परिणाम आहेत. इतर रोजगार क्षेत्रांपेक्षा येथे रोजगाराच्या संधी जास्त उपलब्ध आहेत. मानवी संस्कृती बदलण्यात औद्योगिक रसायनशास्त्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

औद्योगिक रसायनशास्त्रामध्ये रासायनिक ज्ञानाचा वापर औद्योगिक प्रक्रियांमध्ये केला जातो, विशेषतः पेट्रोकेमिकल्स, फार्मास्युटिकल्स, पॉलिमर, कृषी रसायने, रंग, पेंट, डिटर्जंट्स इत्यादी क्षेत्रांमध्ये. औद्योगिक रसायनशास्त्र हे रसायनशास्त्र आणि रासायनिक अभियांत्रिकी यांना जोडणारा महत्वाचा अभ्यासक्रम आहे.औद्योगिक रसायनशास्त्र प्रामुख्याने व्यावहारिक (Practical), आर्थिक (Economic) आणि शाश्वत उत्पादनावर (Sustainable Manufacturin) लक्ष केंद्रित करते.औद्योगिक रसायनशास्त्रात बी.एस्सी. किंवा एम.एस्सी. नंतर नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

**रासायनिक उद्योगात नोकरीच्या संधी**

अ. औषधनिर्माण उद्योग:
उत्पादन रसायनशास्त्रज्ञ (Production Chemist)
गुणवत्ता नियंत्रण (QC) आणि गुणवत्ता हमी (QA) (Quality Control & Quality Assurance)
संशोधन आणि विकास सहाय्यक (R & D Assistant)
API उत्पादन तंत्रज्ञ
ब. पेट्रोकेमिकल आणि तेल उद्योग:
प्रक्रिया विश्लेषक (Process Analyst)
केमिकल प्लांट इंजिनिअर
सुरक्षा आणि अनुपालन अधिकारी (Safety and Compliance Officer)
क. खते आणि कृषी रसायन उद्योग:
प्लांट इंजिनिअर
फॉर्म्युलेशन रसायनशास्त्रज्ञ (Formulation Chemist)
प्रयोगशाळा विश्लेषक (Lab Analyst)
ड. पॉलिमर आणि प्लास्टिक उद्योग:
पॉलिमर तंत्रज्ञ
क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर
इ. पेंट, रंग आणि रंगद्रव्ये (Paints, Dyes, and Pigments):
रंग रसायनशास्त्रज्ञ (Dye Chemist)
रंग फॉर्म्युलेटर (Paint Formulator)
रंग गुणवत्ता नियंत्रण तंत्रज्ञ (Color Quality Control Chemist)
ई. कृषीउद्योग:
गुणवत्ता नियंत्रण तंत्रज्ञ (Quality Control Engineer)
उत्पादनतंत्रज्ञ (Production Engineer)
संशोधन आणि विकास (Research and Development)
उ. फोरेन्सिक सायन्स:
फोरेन्सिक केमिस्ट
अनॅलिटीकल केमिस्ट
संशोधन आणि विकास (Research and Development)
Laboratory Technician)
२. सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्या
OPGC, HPCL, IOCL, GAIL, BPCL meejKUee Public Sector Undertakings:
गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळा (Quality Testing labs)
Control Boards)
भारतीय खते महामंडळ (Fertilizer Corporation of India)
भारतीय अन्न महामंडळ Food Corporation of India (FCI)
३. उच्चशिक्षणाच्या संधी:
अ. पदव्युत्तर अभ्यासक्रम
औद्योगिक रसायनशास्त्र, अनॅलिटीकल केमिस्ट्री, ऑरगॅनिक केमिस्ट्री, न्यूक्लीअर केमिस्ट्री, इनऑरगॅनिक केमिस्ट्री, फिजिकल केमिस्ट्री, फार्मास्युटिकल केमिस्ट्री इत्यादी विषयात एम.एससी.करता येते.
बी.एससी. नंतर IIT JAM सारख्या प्रवेश परीक्षा देऊन एम. टेक. रासायनिक अभियांत्रिकी (M.Tech. in Chemical Engineering) किंवा एम.टेक. प्रक्रिया अभियांत्रिकी (M.Tech. Process Engineering) हे अभ्यासक्रम करता येतात.

ब. पीएच.डी. आणि संशोधन:
CSIR, DRDO, BARC इत्यादी नामांकित संशोधन केंद्रांमध्ये फेलो म्हणून अनेक संधी उपलब्ध आहेत.
औद्योगिक संशोधन प्रयोगशाळांमध्ये रसायनशास्त्रज्ञ म्हणून काम करता येते.
४. अध्यापन आणि शैक्षणिक क्षेत्र:
एम.एससी. आणि नेट/सेट उत्तीर्ण झाल्यानंतर, तुम्ही महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम करता येते.
अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये (Engineering Colleges) प्राध्यापक म्हणून संधी असतात.
५. उद्योजकता:
औद्योगिक रसायनशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम आपल्याला स्वतःच्या उद्योगाची सुरवात करण्यासाठी व्यावहारिक तसेच व्यावसायिक ज्ञान देते ज्यात प्रामुख्याने रासायनिक फॉर्म्युलेशन युनिट्स(Chemical formulation units)
साबण, डिटर्जंट (Soap and Detergent)
सौंदर्य प्रसाधने व परफ्यूम उत्पादन (Cosmetics & Perfume Manufacturing)
लहान प्रमाणात कृषी रसायन युनिट्स (Small-Scale Agrochemical



Units)
पाणी प्रक्रिया रासायनिक उत्पादन (Water Treatment Chemical Production)
६. खाजगी क्षेत्र आणि बहुराष्ट्रीय जागतिक कंपन्यांमध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत जसे की:
BASF, बायर, डाऊ केमिकल्स, टाटा केमिकल्स, एशियन पेंट्स, ल'ओरियल (कॉस्मेटिक संशोधन आणि विकास) या कंपन्यामध्ये आपण विविध पदांवर काम करू शकतो.
उत्पादन कार्यकारीअधिकारी (Production Executive Officer)
प्रक्रिया विकास अधिकारी (Process Development Officer)
अनुपालन आणि नियमन अधिकारी (Compliance and Regulation Officer)
पर्यावरण आरोग्य आणि सुरक्षा अधिकारी (Environmental Health & Safety Officer)
७. गुणवत्ता नियंत्रण आणि हमी (Quality Control & Assurance):
अन्नापासून ते कापडांपर्यंत या विभागातील नोकरीच्या संधी जवळजवळ प्रत्येक उत्पादन व उद्योगक्षेत्रात आहेत:
नमुना चाचणाr(Sample Testing)
उत्पादन मानकीकरण (Product Standardization)
ISO/GMP अनुपालन (ISO/GMP compliance)
दस्तऐवजीकरण आणि ऑडिटिंग (Documentation and auditing)
८. संशोधन विश्लेषक (Research Analyst):
विविध औद्योगिक आणि खासगी प्रयोगशाळांमध्ये खालील प्रमाणे जागा असतात:
पाणी/माती गुणवत्ता चाचणी (Water/soil Quality Testing)
पर्यावरणीय देखरेख (Environmental Monitoring Chemist)
instrumentation) (GC, HPLC, UV-Vis, FTIR, GCMS etc.)
औद्योगिक रसायनशास्त्र अभ्रासक्रम शिकतांना व हा अभ्रासक्रम पूर्ण केल्यानंतर आपल्याला विविध कौशल्ये (एव्त्ते) आत्मसात होतात. ज्यात प्रामुख्याने-
प्रक्रिया रसायनशास्त्र समजणे (Understand the Process Chemistry)
औद्योगिक सुरक्षा आणि पर्यावरणीय नियम (Industrial safety & environmental regulations)
प्रयोगशाळेतील उपकरणे हाताळणे (Handling of Laboratory Instruments)
उत्पादन तयार करणे (Product Formulation)
☐ डेटा स्पष्टीकरण आणि अहवाल लेखन (Data interpretation and Report Writing)
आंतरराष्ट्रीय संधी (International Opportunities)
Work in Gulf Countries (Oil/Petrochemical Sector)
परदेशात रसायनशास्त्रात एम.एस. (MS in Chemical Sciences)
जीसीसी देशांमध्ये काम (Work in GCC countries (oil/petrochemical sector)
(तेल/पेट्रोकेमिकल क्षेत्र)
अन्न आणि औषध नियामक संस्था (एफडीए, ईएफएसए) (Food& Drug Regulatory Bodies)

जर तुम्हाला रसायन आधारित उद्योगांमध्ये उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण किंवा संशोधन आणि विकास क्षेत्रात काम करायचे असेल तर औद्योगिक रसायनशास्त्र हा एक अत्यंत व्यावहारिक आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम आहे.

शाश्वत आणि हरित तंत्रज्ञानाच्या वाढत्या मागणीसह, भारतात आणि जागतिक स्तरावर आगामी काळात जोपर्यन्त पृथ्वीतलावर मानवजीवन आहे तो पर्यन्त औद्योगिक रसायनशास्त्रज्ञांची गरज वाढतीच राहणार आहे.

**● डॉ. उमेश खांडेकर**
**प्रोफेसर व विभाग प्रमुख – औद्योगीक रसायनशास्त्र विभाग**
**श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती.**
**मो. ९४२२३८५४२१**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# संपर्क प्रमुख बाजोरियांकडून अवैध नियुक्त्यांच्या सपाटा

## मूर्तिजापूर उपजिल्हाप्रमुख ललित वानखडे यांची घणाघाती टीका

■ प्रतिनिधी | अकोला ■

मुर्तिजापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या (शिंदे गट) कार्यकर्त्यांनी जिल्हा संपर्कप्रमुख आणि माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांच्याकडून अवैध नियुक्त्यांचा सपाटा सुरू असून त्यांचे हे धोरण पक्षवाढीस अडथळा निर्माण करणारे असल्याचा आरोप मूर्तिजापूर उपजिल्हाप्रमुख ललित वानखडे यांनी केला आहे. याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे. यावेळी तालुकाप्रमुख दीपक दांदळे, शहरप्रमुख गौरव मोरे, बाळू घोरमोडे, मंगेश बाहेकर विकास पुरेकर, नकुल चव्हाण आदी उपस्थित होते.



पुढे बोलताना ललित वानखडे म्हणाले की, गेल्या तीन वर्षांपासून हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारसरणीवर आधारलेले कार्य विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गावात पोहोचवण्यासाठी शिवसैनिक कार्यरत आहेत. पक्षाची सर्कल ते बूथ स्तरापर्यंत बांधणी करण्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या कार्यकर्त्यांना मात्र जिल्हा संपर्कप्रमुख बाजोरिया यांचे सहकार्य न मिळाल्याचे आरोप करण्यात आले आहेत. कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्ह्यासाठी दिलेला विशेष विकास निधी पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यांना मिळवून न देता, विरोधकांना लाभ होईल अशा स्वरूपात व स्वतःच्या हितासाठी वापरल्याचा गंभीर आरोपही यावेळी वानखेडे यांनी केला. तसेच, लोकसभा व विधानसभा निवडणुकीदरम्यान बाजोरिया यांनी महायुतीच्या विरोधात काम करण्यासाठी दबाव टाकल्याचा दावा या कार्यकर्त्यांनी केला आहे. याविरोधात आवाज उठवल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. मुंबईत काही दिवसांपूर्वी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत या बाबींची माहिती देण्यात आली. या बैठकीत बाजोरिया यांच्याऐवजी नवीन संपर्कप्रमुख नियुक्त करण्याची मागणी करण्यात आली होती. त्याचमुळे रोषाने ३ जून रोजी नियमबाह्य पद्धतीने फेरनियुक्त्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरप्रमुख व तालुकाप्रमुख पदांच्या नियुक्त्या केवळ बाळासाहेब भवन, मुंबई येथूनच होतात, हे स्पष्ट करत वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी अशा नियुक्त्यांना वैध मानले नसल्याची माहिती देण्यात आली आहे.कार्यकर्त्यांनी असेही म्हटले की, बाजोरिया यांनी पक्षाचा उपयोग रामनगर येथील काळा मारुती मंदिराची जमीन बळकावण्यासाठी शिवसैनिकांना पुढे करून केला, अशी लेखी तक्रार नागरिकांनी केली आहे. यासह अशा अनेक तक्रारी कार्यकर्त्यांकडे प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच या सर्व घडामोडी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन ही संपूर्ण माहिती त्यांच्या निदर्शनास आणून देणार असून, गेली तीन वर्षे निष्ठेने काम करणाऱ्या शिवसैनिकांना योग्य न्याय मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न राहील, असेही वानखेडे यांनी यावेळी स्पष्ट केले. सदर प्रकरणी संपर्क प्रमुख गोपिकिशन बाजोरिया यांची बाजू जाणून घेण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

## पहिली मुस्लिम आयएएस अदिबा अनम यांचा १५ जुनला जाहीर सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■



**बेरार तालीम कारवां व स्वयंसेवी संस्थांचे आयोजन**

शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासाकरिता कार्यरत बेरार तालीम कारवां व अन्य स्वयंसेवी संस्थांच्या वतीने देशातील पहिली मुस्लिम आयएएस अदिबा अनम अशाक अहमद यांचा जाहीर सत्कार १५ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता प्रमिलाताई ओक हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

आमदार अमोल मिटकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सत्कार समारंभास महाबीज चे मॅनेजींग डायरेक्टर योगेश कुंभेजकर आयएएस, बेरार तालीम कारवांचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री अजहर हुसेन, आमदार साजिद खान पठाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. मुस्लिम समाजातील पहिली आयएएस अदिबा अनम ने अत्यंत कठीण परिस्थितीत शिक्षण घेवून आयएएस केले आहे.

अत्यंत गरीबीच्या परिस्थितीत चिकाटीने शिक्षण घेवून आयएएस झालेली अदिबा अनम ही आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांसाठी आयकॉन ठरली आहे. तीच्यापासून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने आयएएस अदिबा अनम यांचा १५ जूनला सकाळी ११ वाजता प्रमिलाताई ओक हॉलमध्ये जाहीर सत्कार करण्यात येणार असून सर्व विद्यार्थी, पालकांनी, नागरीकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन बेरार तालीमी कारवांचे अध्यक्ष व आयोजन समितीचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री अजहर हुसेन सर्व पदाधिकारी व आयोजन समितीने केले आहे.

**आदिबा अनम अशाक अहमद हिचा अल्प परिचय :** UPSC २०२४ मध्ये AIR १४२ गुण मिळवले. जि.प. उर्दू शाळा जफर नगर यवतमाळ येथे १० वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण.गोधनी रोड यवतमाळ येथील माजी सरकारी उर्दू शाळेत १२ वी पर्यंत. पुण्यातील आबेदा इनामदार सीनियर कॉलेजमध्ये बीएससीसाठी कै.पुण्यातील युनिक अकादमीमध्ये फाउंडेशन अप्से कोचिंग घेतले.नंतर जामिया मिलिया इस्लामिया दिल्लीत तयार केले. वडील ऑटो ड्रायव्हर आहे आणि आई गृहिणी आहे. गुलशन नगर यवतमाळमध्ये भाड्याच्या घरात राहते. आदिबाला उच्च शिक्षणासाठी डएथअ ने प्रायोजित केले होते. तिला यूपीएससीच्या तीन वर्षांच्या बॅचमध्ये आबेदा इनामदार सीनियर कॉलेजमध्ये बीएससीसाठी प्रथम प्रवेश मिळाला आणि त्याच वेळी युनिक अकादमीमध्ये प्रवेश मिळाला. तिने पुण्यात बीएससी आणि यूपीएससीचे शिक्षण पूर्ण केले.

शिक्षण, वसतिगृह आणि मेसचा सर्व खर्च ऍ द्वारे केला जात असे. नंतर पदवी प्राप्त केल्यानंतर ती हज हाऊस मुंबईला गेली. एक वर्ष ती हज हाऊस मुंबई येथे राहिली आणि हमदर्द विद्यापीठ दिल्लीतून प्रवेश घेतल्यानंतर, ती ऍ दिल्लीला गेली.नंतर तिने जामिया मिलिया इस्लामिया दिल्ली आरसीएमधून प्रवेश घेतला आणि तेथे दोन वर्षे तयारी केली. चौथ्या प्रयत्नात तिने यूपीएससी उत्तीर्ण केली. सर्व मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य सेवा द्वारे केले गेले.

## पोलीस प्रशिक्षणार्थ्यांचा दीक्षांत संचलन समारंभ

**अकोला :** पोलीस प्रशिक्षण केंद्र येथील सत्र क्रमांक ६६ मधील ५३१ पैकी ५२० प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांचे दि. १९/०९/२०२४ पासून सुरु झालेले पोलीस शिपाई पदाचे मुलभूत प्रशिक्षण पूर्ण झाले त्यांचा दीक्षांत संचलन समारंभ ९ जून रोजी रोजी अमरावती विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सत्र क्रमांक ६६ मधील पोलीस प्रशिक्षणार्थी यांनी दीक्षांत संचलन समारंभा दरम्यान परेड कमांडर, प्रशिक्षणार्थी रोल नंबर ४६१ सारगंधर गोविंद आकमार मुळ घटक जालना यांचे नेतृत्वात शिस्तबध्द व उत्कृष्ट कवायत संचलन सादर केले. अकोल्याच्या प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. निलेश पांडे यांनी आपल्या अहवाल वाचन केले तसेच प्रमुख अतिथीनी आपल्या भाषणात प्रशिक्षणार्थीचे अभिनंदन करुन प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण केंद्रामध्ये प्राप्त केलेल्या ज्ञानाचा पुर्णपणे वापर करुन जनतेस सेवा द्यावी.

**Change In Name**

I Have Change My Name From **DISHA RAJESH KUMAR NARAYANI** TO (After Marriage) **SAESHA RAVI GAJWANI** My Residential Address is - Near Jotwani line Sindhi Camp kacchi kholi Akola 444001

## शाश्वत विकासासाठी काटेकोर जलनियोजन व एकात्मिक शेती पद्धती आवश्यक

**तीन दिवसीय जल व्यवस्थापन परिषदेत कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे प्रतिपादन**

■ प्रतिनिधी | अकोला ■



शाश्वत शेती आणि ग्रामीण विकासासाठी काटेकोर जलनियोजन व आधुनिक एकात्मिक शेतीपद्धती आवश्यक आहे,' असे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व जनकल्याणकारी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय 'विदर्भातील कृषियोग्य पाणी : सद्यस्थिती, समस्या व उपाययोजना' या विषयावरील जलपरिषदेत ते अध्यक्षीय भाषण करत होते.

परिषदेत बोलताना डॉ. गडाख यांनी विदर्भातील शेती, सिंचन व पर्जन्यमान यांचा सखोल आढावा सादर करत जलसंवर्धनाच्या तांत्रिक उपायांची गरज अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, विदर्भात शेतीस योग्य जमीन असली तरी केवळ ३० टक्के क्षेत्रच सिंचनाखाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पीकपद्धतीचे नियोजन करणे, जोडधंद्यांकडे वळणे आणि पाणीबचतीचे उपाय अवलंबणे गरजेचे आहे.या परिषदेमध्ये आमदार डॉ. संजय कुटे यांनी खारपाण पट्ट्यावरील सखोल अभ्यास मांडला. त्यांनी सांगितले की, बुलडाणा, अकोला, अमरावतीसह १६ तालुके खारपाण पट्ट्याने बाधित आहेत. पाण्यातील जास्त क्षारांमुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषतः कळमखेड गावात कॅडमियम, लीड, मर्क्युरीसारखे घटक सापडून किडनीच्या आजारांचे प्रमाण वाढले आहे.ष्डॉ. कुटे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने जलयुक्त शिवार, स्काडा, आरओ प्लांट, जलपुनर्भरण, मेगा रिचार्ज प्रकल्प आदी उपायांमुळे खारपाण पट्ट्याचा नाश करणे शक्य होणार आहे. येत्या काही वर्षांत गोड्या पाण्याचे प्रमाण वाढून सिंचन व शुद्ध पाण्याचा प्रश्न सुटेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परिषदेमध्ये डॉ. महेंद्र देशमुख यांनी भारतातील ८२ टक्के पाणी कृषी क्षेत्रात वापरले जात असल्यामुळे पाणीबचतीसाठी ठिबक व तुषार सिंचनावर भर देण्याची गरज स्पष्ट केली. प्रगतिशील शेतकरी आनंदराव राऊत यांनी 'कमीत कमी पाणी, अधिक उत्पादन' या तत्त्वावर आधारित शेती तंत्राचे अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन डॉ. विजय इलोरकर यांनी केले. यावेळी डॉ. सुभाष कोंडावार, डॉ. नितीन मेहेत्रे, श्री. सुमंत पुणतांबेकर यांच्यासह विविध जिल्ह्यांतील शेतकरी, तज्ज्ञ, विद्यार्थी आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

**वि. ०३रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९४४/२०२५ प्रोसेस नं.८६१३/२०२५
चौ.ता. ०३/०७/२०२५ दिनांक : ०९/०६/२०२५

**अर्जदार :** १. प्रशांत कैलाशचंद्र लोहिया. रा. प्लॉट नं. ३४, तोष्णीवाल लेआउट, शासकीय दुध डेअरीच्या मागे, मुर्तिजापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. निकीता दिनेश दादरीवाल. रा. पंजाब नॅशनल बॅक च्या मागे, फुलचूर रोड, गोंदिया, ता. जि. गोंदिया.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कैलाशचंद्र बालचंद लोहिया.
**पत्ता :-** रा. प्लॉट नं. ३४, तोष्णीवाल लेआउट, शासकीय दुध डेअरीच्या मागे, मुर्तिजापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कैलाशचंद्र बालचंद लोहिया यांचे दि. १७/०४/२०२५ रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर सूचना**

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. सैय्यद साबीर सैय्यद नजीर रा. रेल्वे स्टेशन बोरगाव मंजू, ता. आणि जि. अकोला. हे मौजा. बोरगाव मंजू, ता. आणि जि. अकोला, हे मौजे बोरगाव मंजू येथील सर्व्हे/नं. ६७५/२ मधील अकृषक प्लॉट नं. ११, एकूण क्षेत्रफळ १६८.७५ चौ.मी. हा प्लॉट खरेदी करण्याचा सौदा श्री. सैय्यद सलीम सैय्यद नसीर आणि इतर दोन यांच्याशी केला आहे. सदर मालमत्ता हि श्री. सैय्यद सलीम सैय्यद नसीर आणि इतर दोन यांची वडिलोपार्जित मालमत्ता असून, त्याचे वडील मय्यत श्री. सैय्यद नसीर सैय्यद मुनीर यांनी ती र.द.क्र. २९४३, दि. ३०/०७/१९८७ ने खरेदी केली असून सदर मूळ खरेदी गहाळ झाली आहे, जर कोणलाही ती मिळाली असल्यास खाली संपर्क साधावा. तसेच श्री. आमचे पक्षकार सदर मालमत्तेवर Swatantra House Finance Bank Ltd, Akola मार्फत कर्ज घेत असून त्याकरिता माझे पक्षकार हे वरील नमूद मालमत्ता गहाण देत आहेत.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किवां गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून १५ दिवसांच्या आत संपर्क साधावा; तसे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल.तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- १०/०६/२०२५

**अँड. गौरव शि. देशमुख**
आळशी प्लॉट, गजानन महाराज फोटो जवळ,
दक्षता नगर चौक, ता. जि. अकोला.
मो. नं. ९०२८२३२२४६

## अकोल्यातील गंगानगरमधून ३६ किलो गांजाची जप्ती

**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई : दोन महिला ताब्यात**



■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत अमलीपदार्थविरोधी कारवाई करत, गंगानगर परिसरातून तब्बल ३६ किलो ओलसर गांजा जप्त केला. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे ७ लाख ३५ हजार ४०० रुपये इतकी आहे.

ही कारवाई ९ जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, जुने शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या गंगानगर येथील एका घरात दोन महिला गांजाची विक्री करत असल्याचे उघड झाले. त्यानंतर राजपत्रित अधिकारी व पंचनामा साक्षीदारांच्या उपस्थितीत घरावर छापा टाकण्यात आला.

छाप्यात बिलकीस बानो सय्यद रफिक व कनिज फातेमा सलीम शाह या दोन महिलांच्या घरातून मोठ्या प्रमाणात गांजा सापडला. या आरोपींविरोधात एन.डी.पी.एस. कायदा (NDPS Act) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना पुढील कारवाईसाठी जुने शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, पोउपनि गोपाल जाधव आणि राजपालसिंह ठाकूर, फिरोज खान, अब्दुल माजीद, रविंद्र खंडारे, अविनाश पाचपोर, वसीमोद्दीन, भास्कर धोत्रे, एजाज अहमद, खुशाल नेमाडे, किशोर सोनोने, आकाश मानकर, स्वप्नील खेळकर, स्वप्नील चौधरी, उदय शुक्ला, अन्सार अहमद, अशोक सोनवणे, महिला अंमलदार मेघा मुळे व स्वप्ना चौधरी, तसेच चालक मनिष ठाकरे, प्रशांत कमलाकर आणि विजय यादव यांनी केली.

## पोलिसांची अटक बेकायदेशीर ठरवत आरोपीस तात्काळ मुक्तता

■ प्रतिनिधी | अकोला ■



सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीच्या अपहरणप्रकरणी दाखल गुन्ह्यात अटकेतील आरोपीस न्यायालयाने कोणताही जामीन न देता केवळ वैयक्तिक हमीपत्रावर तात्काळ मुक्त करण्याचा निर्णय दिला. या निर्णयामुळे पोलिसांच्या अटकेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दि. ६ नोव्हेंबर २०२४ रोजी पीडितेच्या आईने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, सुरज मोरे या तरुणाने तिच्या अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा आरोप करण्यात आला होता. त्या आधारे पोलिसांनी भारतीय न्यायसंहिता (ँन्ए) अंतर्गत कलम १३७(२), कलम ९६ तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (इ्थ्एध) अंतर्गत कलम ८ नुसार गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

यानंतर ७ मे २०२५ रोजी आरोपी आणि पीडितेला शोधून काढल्यानंतर, पोलिसांनी दुसऱ्याच दिवशी म्हणजे ८ मे रोजी आरोपीला अकोला जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक १ येथे हजर केले आणि तपासासाठी ५ दिवसांची पोलीस कोठडी मागितली.

मात्र, आरोपीचे वकील अॅड. अक्षय दामोदर यांनी न्यायालयात जोरदार युक्तिवाद सादर करत पोलिसांनी अटकेपूर्वी आरोपीला कारणे सांगितली नसल्याचे निदर्शनास आणून दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ही बाब अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे ही अटक बेकायदेशीर असल्याचे त्यांचे म्हणणे होते. न्यायालयाने या युक्तिवादाला दुजोरा देत आरोपीची अटक बेकायदेशीर ठरवली व पोलिसांची कोठडीची मागणी फेटाळली. विशेष म्हणजे, आरोपीस कोणतीही न्यायालयीन कोठडी न देता वैयक्तिक हमीवर मुक्त करण्यात आले. या निर्णयामुळे पोलिसांच्या अटकेतील त्रुटी समोर आल्या असून, यापुढे पोलिसांनी कायद्याच्या चौकटीत राहून कार्यवाही करणे अत्यावश्यक असल्याचे या प्रकरणातून अधोरेखित होते. इतक्या गंभीर आणि संवेदनशील प्रकरणात न्यायालयाने त्वरित दिलेला निर्णय स्थानिक नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. या प्रकरणात आरोपीतर्फे अॅड. अक्षय गणेश दामोदर (दहीहांडा) यांना विधी विद्यार्थी प्रमय भोसले आणि प्रणव इंगळे यांनी सहकार्य केले.

## ऊर्जामंत्री यांच्यासह अकोला महाविरणतच्या दहा अधिका-यांना कायदेशीर नोटीस

**जुने शहर भागात वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यावर लवकरच जनहित याचिका**

■ प्रतिनिधी | अकोला ■

गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने जुने शहर भागातील वीज पुरवठा खंडीत होण्याचा क्रम सुरू आहे. यासंदर्भात महावितरणचे अधिकारी तीन वर्षांपासून चालढकल करीत आहेत. त्यामुळे त्यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे वकिल सौरभ भेंडे यांनी कायदेशीर नोटीस बजावली आहे. प्रसन्न जकाते यांच्यावतीने ही नोटीस बजावण्यात आली आहे.

ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव, अकोला महाविरतणचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, शहर विभागाचे कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आणि शहरातील चार सहाय्यक अभियंत्यांना ही कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. ४ जून २०२५ रोजी तयार करण्यात आलेली ही नोटीस ९ जून रोजी भारतीय डाक सेवेच्या रजीस्टर पोस्टाने आणि ई-मेलने सर्व संबंधिताना पाठविण्यात आली आहे. जनहित याचिका दाखल करण्यापूर्वीची ही प्रथम कायदेशीर पायरी असल्याचे अॅड. सौरभ भेंडे यांनी स्पष्ट केले. यापुढेही वीज पुरवठा खंडीत होण्याचा क्रम कायम राहिल्यास याचिका दाखल करण्याची तयारी पूर्ण झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या तीन वर्षांपासून प्रसन्न जकाते हे जुने शहर भागात वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या मुद्द्यावर लढा देत आहे. अलीकडेच महाविरतणच्या अधिकाऱ्यांसोबत त्यांच्या संभाषणाची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. त्यानंतर अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी महावितरण कार्यालयावर मोर्चा नेला होता. त्यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्यांना नोटीस बजावल्यानंतर उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. मोर्चानंतर काही दिवसांची मुदत महावितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. महाविरतणच्या मुख्य तंत्रज्ञांनी या समस्येवरील तोडगा सहाय्यक अभियंत्यांना सुचविला. शहराचे कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आणि सर्व सहाय्यक अभियंत्यांनी तंत्रज्ञांनी सुचविलेले सर्व उपाय धुडकावून लावले. आतापर्यंत झालेल्या सर्व कामाची माहिती संकलित केल्यानंतर ही नोटीस बजावण्यात आल्याचे अॅड. भेंडे यांनी स्पष्ट केले.

यानंतरही जुने शहर भागातील वीज पुरवठा वारंवार खंडित होत राहिल्यास जनहित याचिका दाखल करण्यात येणार आहे. या याचिकेत गेल्या तीन वर्षांपासून वीज पुरवठ्याचा प्रश्न कसा बिकट झाला याचे पुरावे सादर करण्यात येणार आहेत. जबाबदार सर्व अधिकाऱ्यांना महावितरणच्या सेवेतून कायमचे बडतर्फ करून अन्य सेवांसाठी काळ्या यादीत (ब्लॅक लिस्ट) टाकण्याची विनंती न्यायालयाला करण्यात येणार आहे.

याशिवाय इतकेच जुने शहरातील सर्व वीज ग्राहकांना महाविरतण कंपनी आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या व्यक्तीगत खात्यातून व्याजासह दोन वर्षांची नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी विनंतीही करण्यात येणार असल्याचे अॅड. भेंडे यांनी सांगितले. बजावण्यात आलेल्या नोटीसमध्ये केंद्र सरकारच्या विद्युत (ग्राहकांचे अधिकार) नियम २०२० मधील कलम १७६चा आधार घेण्यात आला आहे. यात वारंवार विनाकारण वीज पुरवठा खंडीत होत असल्यास सर्व वीज ग्राहकांना नुकसान भरपाईचा स्पष्ट उल्लेख आहे. याशिवाय देशातील अन्य राज्यांमधील विजेच्या समस्यांवरील, विनाकारण वीज पुरवठा खंडीत होण्याच्या घटनांमधील निकालांचे विश्लेषणही करण्यात येत असल्याचे अॅड. भेंडे यांनी सांगितले. सुमारे पाच ते सहा वकिलांची टीम यासाठी काम करीत आहे. अकोल्याच्या वीज वितरण प्रणालीमध्ये साहित्याची कमतरता असल्याचे कारण अधिकारी देत आहे. साहित्य, मनुष्यबळ, एबी स्वीच, वीज तार नसणे, खांब नसणे, डीपीचे फ्युज तार नसणे, पक्षी तारांवर बसल्याने शॉर्ट सर्किट होणे कशी कारणे दिली जात आहे. महाविरतणच्या या सर्व साहित्याची अत्यंत निष्पक्ष आणि निप:क्षपणे तपासणी करण्याची मागणी देखील न्यायालयाला करण्यात येणार आहे. याशिवाय गेल्या पाच वर्षांत अकोल्याच्या महाविरणमध्ये विकासाची किती कामे झाली, ही कामे कोणाला मिळाली, या कामांमध्ये भ्रष्टाचार झाला का? साहित्य दर्जेदार होते का याची सखोल चौकशी करण्याची विनंती देखील जनहित याचिकेतून करण्यात येणार असल्याचे अॅड. सौरभ भेंडे यांनी स्पष्ट केले.

अकोला शहर म्हणजे काही एखादे दुर्गम गाव नाही की जिथे वारंवार विजेचा पुरवठा खंडीत होईल. अकोला विदर्भातील महत्वाचे शहर आहे. शहरात वारंवार दंगलीच्या घटना घडल्या आहेत. ज्या भागामध्ये वारंवार वीज पुरवठा खंडीत होतो, तेथे अनेक हॉस्पीटल्स आहेत. धार्मिक स्थळांचा समावेश आहे, दलित वस्ती आहे, अल्पसंख्यांक वस्ती आहे. विनाकारण वारंवार जर वीज पुरवठा खंडीत होत असेल तर हे अधिकाऱ्यांच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे होत असल्याची भावना नागरिक म्हणून प्रसन्न जकाते यांची असल्याने त्याच दृष्टीने न्यायालयातील जनहित याचिकेची प्रक्रिया पार पाडली जाणार आहे, असेही सौरभ भेंडे यांनी स्पष्ट केले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक १९५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पक्षीमित्र प्रवीण कडू 'हिंगणघाट भूषण'ने सन्मानित

## गुणवंत विद्यार्थी आणि प्राचार्यांचाही गौरव

**हिंगणघाट/जनमाध्यम**

पत्रकार संघ, हिंगणघाट व बळीराजा बाजार हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित ९ जून रोजी महावीर भवनात 'हिंगणघाट भूषण पुरस्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि प्राचार्यांचा सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार समीर कुणावार होते, तर उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे आणि विलास नरवटे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लावली. याप्रसंगी तहसीलदार योगेश शिंदे, मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे, ठाणेदार देवेंद्र ठाकूर, बळीराजा बाजारचे संचालक राजू राठी, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. किरण वैद्य आणि सचिव राजेश कोचर हे प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर गायिका सुवर्णा भोयर यांनी स्वागत गीत सादर केले. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक आकाश अवतारे यांनी यूपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यावर भर दिला. विलास नरवटे यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन, वेळेचे योग्य नियोजन, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा सराव, उजळणी आणि स्वतःवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात आ.कुणावर यांनी असा स्वरूपाच्या कार्यक्रमाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळत असल्याचे सांगून पत्रकार संघाच्या कार्याचे कौतुक केले.या सोहळ्यात पक्षीमित्र तथा निसर्गसाथी फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रवीण वसंतराव कडू यांना वन्यजीव



आणि निसर्ग संरक्षणातील अतुलनीय योगदानाबद्दल 'हिंगणघाट भूषण पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. त्यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी तालुक्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षेत प्रावीण्य मिळवलेल्या पियुष डंभारे, दिपाली भुते, जान्हवी ठाकरे, राखी राठोर, मयुर पाटील, श्रृष्टी डफळे, योगेश्वरी डेकाटे, देवांश भांडे, मनस्वी ठाकरे, निलेश यादव, माही शर्मा आणि नाझ परवीन साबीर अली सय्यद या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच, यूपीएससी-सीडीएस परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर ३६६ वा क्रमांक मिळवून भारतीय सैन्यात लेफ्टनंट म्हणून रुजू झालेले वेदांत प्रभाकरराव कोळसे यांनाही विशेष सन्मानित करण्यात आले.

शिक्षणातील योगदानाबद्दल शहरातील विविध शाळा-महाविद्यालयांच्या वैशाली पोळ, प्रशांत शेळके, कल्पना ठाकूर, जेम्स सॅम्युअल, चंद्रकांत नगराळे, शिल्पा चव्हाण, कुरेशी सर आणि अजयकुमार यादव या प्राचार्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. किरण वैद्य यांनी केले, तर प्रा. संदिप रेवतकर यांनी संचालन केले. उपस्थितांचे आभार शुभम कोचर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भास्कर कलोडे, मुकेश चौधरी, अब्दुल रज्जाक, रमेश लोंढे, सुरेंद्र बोरकर, मोहम्मद रफीक, प्रदीप आर्य, मलक मोहम्मद नईम, केवलदास ढाले, जगदीशप्रसाद शुक्ला. आणि रवी येनोरकर. आदींनी सहकार्य केले.

# आंतराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत राघवी राऊरकर प्रथम

**वर्धा/जनमाध्यम**

गोवा येथे झालेल्या आंतराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत सानेवाडी येथील ५ वर्षीय राघवी दत्तात्रय राऊरकर हिने सबज्युनियर गटात प्रथम क्रमांक पटकविला आहे.

तिच्या या यशाने वर्धेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. अखिल नटराजम आंतर सास्कृतीक संघाच्या वतीने गोवा येथील कला अकादमी पणजी येथे आंतराष्ट्रीय नृत्य स्पर्धेचे आयोजन केले होते. या नृत्य स्पर्धेत सब ज्युनिअर गटातून सानेवाडी वर्धा येथील प्रतिष्ठित नागरिक दत्तात्रय राउरकर व विना दत्तात्रय राउरकर यांची मुलगी राघवी हिने बॉलिवुड स्टाईल फॉर्मेट या प्रकारात नृत्याचे सादरीकरण केले. यात तिने प्रथम क्रमांक पटकाविला. यावेळी बॉलिवुड कॉरिओग्राफर वैभव घुगे, लावणी प्रिस शुभम बोराडे व इतरर मान्यवरांच्या हस्ते राघविला



प्रथम पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

राघवी स्कूल ऑफ स्कॉलर्स शाळेची विद्यार्थीनी असून तिने अनेक नृत्य स्पर्धेत उल्लेखनिय यश प्राप्त केले आहे. तीला मिळालेल्या यशाचे श्रेय तीचे भरतनाट्यम गुरु सचिन डंभारे, एसओएसचे प्राचार्य सुरेश लकडे , शिक्षक व आई वडिलांना दिले.

# पाणीपुरवठा करणारी मशीन एकाच आठवड्यात दोन वेळा जळली

## वारंवार मशीन जळतेच कशी? ग्रामस्थही संभ्रमात

**विरूळ (आ)/जनमाध्यम**

मागील दोन महिन्यांपासून विरूळ गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या पाचही मशीन जळाल्या.याबाबत दैनिक जनमाध्यम ने वृत्त प्रकाशित केले होते. वृत्त झळकताच चार दिवसा पुर्वी पाणीपुरवठा करणारी मशीन दुरस्त करण्यात आली व गावचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला. दोन दिवस पाणी पुरवठा सुरळीत असतांना मात्र सोमवारी दुरस्त करण्यात आलेली नळयोजची मशनरी पुन्हा जळाल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहे.

वारंवार मशीन जळते की जाळते हे न समजणार कोडच आहे. दुरुस्त केलेली मशीन दोनच दिवसात जळतेच कशी? या बाबत ग्रामस्थ संभ्रमात असुन या भोंगळ कारभाची चौकशी करण्याची मागणी होत आहे. विरुळ ग्रामपंचायत मध्ये काही संबंध नसताना येथील कंत्राटदार ग्रामपंचायतच्या कारभारात सतत लुडबुड करीत आहे. पाणी पुरवठा करणारी मशीन जळली की तोच दुरूस्त करून आणतो व परत लावतो.व बिल ग्रामपंचायतच्या नावाने वारंवार काढत असल्याने गैरप्रकाराची शंका गावकऱ्यांना येत आहे. सध्या वर्धा नदीवरून व कुरझडी मौज्यातील विहिरीवरून विरूळ गावात पाणी पुरवठा सुरू आहे. या दोन्ही पाणी पुरवठा करणाऱ्या मोटर पंप मध्ये वारंवार बिघाड होत असल्याने विरूळ गावात पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. गावाला सरपंच नाही ग्रामसेवक नाही. प्रशासक आहे. हे अधिकारी गावात ढुंकूनही पाहत नाही. यामुळे विरूळ ग्रामपंचायतचा कारभार सैराट सुरू आहे.

# सेलू काटे येथे तंबाखू मुक्ती जनजागृती कार्यक्रम

**वर्धा/जनमाध्यम**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधून १ मे ते १५ जुन या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांतर्गत सेलू काटे येथे तंबाखू मुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला एवोनिथ स्टीलचे सीएसआर सहाय्यक व्यवस्थापक



दीपक तपासे, उन्नती प्रकल्प प्रमुख पिंकी निमजे, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या जिल्हा सल्लागार डॉ. नम्रता सलूजा, समुपदेशक राहुल बुचुंडे, सामाजिक कार्यकर्ता हर्षद ढोबळे आदी उपस्थित होते.

अकर्षणाचा मुखवटा उतरवूया तंबाखू आणि निकोटीन उत्पादनामागील उद्योगाच्या क्लूप्त्या उघड करुया या घोषवाक्यावर आधारीत तंबाखू नियंत्रण कार्यक्रम सामान्य रुग्णालय व एवोनिथ स्टीलच्या संयुक्त विद्यामाने सेलू काटे येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरीकांना तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याची माहिती देण्यात आली.

## संक्षिप्त

### तरुणीला मारहाण करीत आईला जिवे मारण्याची धमकी

**वर्धा-** तरुणाचे वागणे योग्य न वाटल्यामुळे तरुणीने प्रेमसंबंध थांबविले. तरुणी ही तिच्या आईसोबत नाक्यावर साहित्य घेण्यासाठी जात प्रेमसंबंध तोडले, आता तु ब्रेकअपनंतर घडलेला प्रकार कोणाशी बोलायचे नाही, मला माहिती पडले तर तुला जिवे मारून टाकीन, अशी धमकी देवून मुलीला आईसमोर धक्काबुक्की करून थापड मारली व तिच्या आईला भररस्त्यात जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. ही घटना शहरालगतच्या भागात रहदारीच्या रस्त्यावर घडली. होत्या. दरम्यान आरोपी त्याच्या दुचाकीने मागाहून येत आडवा झाला. तरुणीला तु माझ्यासोबतचे प्रेमसंबंध तोडले. आता तु कोणाशी बोलायचे नाही. कोणालाही भेटायचे नाही, जर मला माहिती पडले की, तुझे दुसऱ्यासोबत संबंध आहे, तर तुला मी जीवाने मारून टाकणार अशी धमकी देवून धक्काबुक्की करीब थापड मारली. त्यात तिची आई वाद सोडविण्यासाठी समोर आली असता आईलासुद्धा अश्लील भाषेत शिवीगाळ करून ढकलढकल करून जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी आईच्या तक्रारीवरून रामनगर पोलीस प्रेम कुणावर करायचे याचे भान आजच्या युवापिढीला राहिलेले नाही, केलेल्या प्रेमाचे वाईट कालांतराने दिसायला लागतात. शहरातीलच रहिवासी असलेल्या मुलीसोबत एक वर्षाअगोदर तिच्या घराच्या परिसरात राहणाऱ्या तरुणासोबत प्रेमसंबंध जुळले ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.

### अपघातात एक ठार, एक जखमी

**वर्धा-** सावंगी (मेघे) येथे जात असलेल्या युवकाच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या दुचाकीने धडक दिली. त्यात दोघेही जखमी झाले. त्यांना रुग्णालयात नेले असता एकाला मृत घोषित केले.

आशिष प्रेमनाथ डांगरे (४६) रा. हिंगणघाट व त्याचा सहकारी प्रवीण बन्सोड रा. सावंगी हे दुचाकी क्र. एमएच ३२ एस ५६५९ क्रमांकाच्या दुचाकीने सावंगी (मेघे) येथे जात होते. दुचाकी प्रवीण बन्सोड चालवित असताना कवडघाट येथील सीसीआय गोडावूनजवळून वर्धा येथून येत असलेल्या

एमएच ३२ एएल ८०८७ क्रमांकाच्या दुचाकी चालकाने त्याच्या ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने निष्काजीपणे चालवून प्रवीणच्या दुचाकीला जबर धडक दिली. या धडकेत प्रवीण बन्सोड, आशिष डांगरे हे रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाले. जखमींना नागरिकांच्या मदतीने हिंगणघाट येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी प्रवीण बन्सोड याला मृत घोषित केले. याप्रकरणी आशिष डांगरे यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलीस ठाण्यात दुचाकीचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.

### पुलगाव बसस्थानकात चोरट्यांचा सुळसुळाट

**पुलगाव-** स्थानिक बसस्थानक परिसरातून पर्समधून ५५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे, एसटी बसमधून प्रवास करीत असलेली ५४ वर्षीय महिला खाली उतरत असताना अज्ञात चोरट्यांनी पर्समधील सोन्याचे दागिने, नगदी असा एकूण ५५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना पुलगाव बसस्थानकावर घडली. या घटनेमुळे बसस्थानक परिसरात एकच खळबळ उडाली होती. अमरावती जिल्ह्यातील चांदूर (रेल्वे) येथील वॉर्ड क्रमांक ११ मधील रहिवासी प्रभा सुरेश गायगोले (५४) ही महिला लग्न समारंभाकरिता अहेरी आगाराच्या बसने चांदूर (रेल्वे) येथून येत होती. दरम्यान पुलगाव बसस्थानक आल्याने त्या बसमधून खाली उतरत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील ३० हजार रुपये किमतीची सोन्याची १० ग्रॅमची पोत, २५ हजार रुपये किमतीची ८ ग्रॅमची सोन्याची पोत, नगदी १ हजार ६०० रुपये असा एकूण ५५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. महिला गाडी मधून खाली उतरली तेव्हा पर्सची चेन उघडी आढळली. पाहणी केली असता सोन्याचे दागिने व रोख रक्कम दिसून आली नाही. चोरी झाल्याचे लक्षात येताच प्रभा गायगोले यांच्या तक्रारीवरून पुलगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध तक्रार नोंदविण्यात आली. त्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.

### दुचाकीच्या धडकेत इसम जखमी

**आर्वी-** मोटारसायकलला कट मारल्याने घडलेल्या अपघातात एक जण जखमी झाला. हा अपघात आर्वी पुलगाव मार्गावरील नांदोरा शिवारात घडला. दिनेश रामदास कडू (वय ४५) रा. बोरगाव (हातला), ता. आर्वी असे जखमीचे नाव आहे. दिनेश कडू हे नांदोरा शिवारातील शेतात दुचाकीने जात होते. दरम्यान, मागून आलेल्या मोटारसायकलने कट मारल्याने दिनेश कडू पडल्याने त्यांना दुखापत झाली. अनिल राठोड याने हयगयीने वाहन चालविल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली. त्यावरून आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### मारहाणीत युवक गंभीर जखमी

**वर्धा-** कुटाराचे शिल्लक पैसे मागितल्याच्या कारणातून मारहाणीत युवक जखमी झाला. ही घटना भादोड पुनर्वसन शिवारात घडली. आर्वी तालुक्यातील भादोड पुनर्वसन येथील शिवम कदम (वय २७) हा आईसह स्वस्त धान्य दुकानात धान्य घेण्याकरिता गेला. त्यावेळी सतीश जाधव यास कुटार विक्रीच्या शिल्लक असलेल्या रकमेची शिवमच्या आईने मागणी केली. त्यावरून सतीश जाधव याने वाद केला. तेव्हा शिवम मधे गेला. त्यावेळी दोन मुले धावून आल्याने स्वतःचा बचाव करत असताना सतीश जाधव याने दगड मारल्याने शिवम जखमी झाला. याप्रकरणी तक्रारीवरून तिघांविरोधात आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# कृषी विभागातील कर्मचा-यांच्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी प्रयत्न करणार - पालकमंत्री

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्य कृषि विभाग लिपीक संवर्गिय अधिकारी व कर्मचा-यांच्या न्याय मागण्यांच्या पुर्ततेसाठी शासन दरबारी प्रयत्न करणार, असे आश्वासन जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. भोयर यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य कृषि विभाग लिपीक संवर्ग संघटनेच्यावतीने पालकमंत्री यांना आपल्या मागण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले. संघटनेच्यावतीने अधिकारी व कर्मचारी यांच्या न्याय मागण्यांसाठी प्रदीर्घ काळापासून शासन दरबारी रेटा सुरू आहे. या मागण्यांमध्ये कृषि विभागातील सुधारीत आकृतीबंधामध्ये लिपीक संवर्गातील अधिकारी व लिपिकांची पदे कमी करण्यात येऊ नये, लिपीक संवर्गातील पदोन्नती स्तर मधील सहायक अधीक्षक पद गट ब मध्ये समाविष्ट करण्यात यावे, अधिकारी व कर्मचारी यांचे पदनाम ब्रिटीश कालीन असल्याने यामध्ये



सुधारणा करण्यात यावी, विभागातील वरिष्ठ लिपीकांची १०० टक्के पदे पदोन्नतीने भरण्यात यावी या मागण्यांचा समावेश आहे.

संघटनेने शासनाला १५७०.१९ कोटी रूपयांच्या बचतीचा आकृतीबंध सादर केला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याची मागणी संघटनेने केली आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष रविसिंह ठाकूर, उपाध्यक्ष अविनाश भागवत, कोषाध्यक्ष अमोल पोले, सचिव अतुल शिंदे, मार्गदर्शक गजानन राठोड, वर्षा वरघट, हर्षदा बांबल, वैशाली मरसकोल्हे, हर्षल सडमाके, प्रवीण बोरकर, किर्ती राठोड, सुचिता सयाम, संजय मांडोकर, संतोष बावणकर, अमोल मुनेश्वर आदी उपस्थित होते.

## दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव आमंत्रित

**वर्धा-** जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या धर्तीवर नमो दिव्यांग शक्ती अभियानांतर्गत राज्यातील दिव्यांग व्यक्तींना आवश्यक सोयीसुविधा व मदत उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक डीडीआरसी व्यतिरिक्त एक दिव्यांग पुनर्वसन केंद्र सुरु करण्यात येणार आहे. यासाठी दिव्यांग क्षेत्रात काम कारणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहे.इच्छुक संस्था दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत नोंदणी केलेली असावी. संस्थेमार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना उपक्रम राबविल्याचा अनुभव असावा. संस्थेच्या स्वत:च्या नावे असलेली जागा, इमारत अथवा भाडे कराराने घेतलेली इमारत पुरेशी असावी. इमारत अडथळा मुक्त व सुयोग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र असावे. समुपदेशन व थेरपीसाठी तज्ञ व्यक्ती तसेच आवश्यक व पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध असावे. संस्थेकडे बँक खात्याचा तपशील असणे आवश्यक आहे. प्रस्ताव तयार करतांना अडचण आल्यास जिल्हा समाज कल्याण कार्यालयाच्या ०७१५२-२४२७८३ क्रमांकावर संपर्क साधावा.

# आई वडिल हेच तुमचे खरे शुभचिंतक - डॉ. भांडवलकर

**वर्धा / जनमाध्यम**

दखने कुणबी समाज संस्थेच्या वतीने शांती भवन येथे समाजा तील इयत्ता १० वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. मुलांचे खरे शुभचिंतक त्यांचे आईवडीलच असतात. आईवडिलांचा कायम सन्मान करा, असे प्रतिपादन प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र भांडवलकर यांनी केले.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नरेंद्र मिसाळ, उदघाटक म्हणून डॉ.महेंद्र गायकवाड, प्रमुख अतिथी विवेक लोहकरे, डॉ.राजेंद्र भांडवलकर, सुनील गफाट, डॉ.शीतल आडगावकर, नितेश कराळे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि उपयोगी भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात



आला.यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी मार्गदर्शन केले व गुणवंत विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सत्कार व गुणगौरव सोहळ्यास ३०० पेक्षा जास्त समाजबांधव उपस्थित होते. याप्रसंगी ८० विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे संचलन अविनाश जाधव आणि अमृता घारे यांनी केले. प्रास्ताविक रमेश जाधव यांनी केले तर आभार जयवंत भालेराव यांनी मानले. कार्यक्र माच्या यशस्वीतेसाठी निलेश सावध, मुकुंद बोराडे, किशोर वाघ, अशोकराव वंजारी, सतीश मिसाळ, चाभारे, अनिल नखाते, घपाट, गुंजन मिसाळ, बावणे, कीर्ती मिसाळ, बोराडे, जयवंत भालेराव, महेश अडसूळे, भालेराव, लांडगे, किरण जंगले,ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

# विकसित कृषी संकल्प अभियाना दरम्यान 'शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या दारी'

## ड्रोन फवारणी तंत्रज्ञान प्रात्यक्षिक

**मोझरी (शे.) /जनमाध्यम**

कृषी व किसान कल्याण मंत्रालय यांच्या निदर्शनानुसार हिंगणघाट तालुक्यांतील मौजा मोझरी येथे विकसित कृषी संकल्प अभियानाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम कृषि विभाग, आत्मा व कृषी विज्ञान केंद्र सेलसुरा यांच्या संयुक्त विद्यमाने



सेलसुरा येथील वाजिरे , शास्त्रज्ञ यांनी पीक लागवड तंत्रज्ञान बीज प्रक्रिया इत्यादी बाबत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विघ्नेश्वरन नागपुर यांनी चारकोल व ब्रिकेट्स बाय प्रॉडक्ट व विक्री व्यवस्थापन बाबत मार्गदर्शन करण्यात आले. डॉक्टर प्रशांत सोनकुसले, माफसू नागपुर यांनी शेतीसोबत पूरक व्यवसाय करून आर्थिक उत्पन्न कसे वाढेल याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. किरणापुरे, बजाज कॉलेज पिंपरी वर्धा त्यांनी माती नमुने व जमिनीचे सामू बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमात शुभरबुध कांबळे, उपसरपंच, कु ठाकरे व कृषी सखी कोमल जांभूळकर उपस्थित होते. पडवे साहेब, कृषी पर्यवेक्षक अलीपुर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली व ए एन देवतळे, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक हिंगणघाट व ठाकरे कृषी साहाय्यक यांनी कार्यक्रमांचे आयोजन केले. तसेच ड्रोन द्वारे फवारणीचे प्रात्यक्षिक करून उपस्थित शेतकऱ्यांना दाखवण्यात आले.

# तलाठ्याकडे चकरा मारणे होणार बंद

## फेरफार आता होणार ऑनलाईन

**वर्धा / जनमाध्यम**

सातबारा उताऱ्यांमधील चुकांच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात येणाऱ्या १५५ कलमाबाबत तहसीलदारांवर आता निर्बंध घालण्यात आले आहेत. यापुढे १५५ कलमानुसार करण्यात येणारे आदेश ऑनलाइनच करावे लागणार आहेत, तसेच या आदेशानुसार आता ऑफलाइन फेरफार करताच येणार नाहीत, असे स्पष्ट आदेश भूमिअभिलेख विभागाने दिले आहेत. या निर्णयामुळे सातबारा दुरुस्तीच्या आदेशावर आता पारदर्शकता येणार आहे, तसेच आदेश फेरफरांची नोंद कशी व कुणी केली याची ऑनलाइन पडताळणीही होणार आहे.

राज्य शासनाच्या भूमिअभिलेख विभागाने याबाबत सविस्तर परिपत्रकच काढले आहे. त्यात या सूचनांचा अंतर्भाव केला आहे. यापूर्वीच्या तरतुदीनुसार केवळ हस्तलिखितातील चुका महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ च्या १५५ या कलमाद्वारे दुरुस्त करता येत होत्या. हे अधिकार तहसीलदारांना आहेत.मात्र, सातबारा उताऱ्यांचे संगणकीकरण झाल्यानंतर तलाठी, मंडल अधिकाऱ्यांच्या पातळीवर हस्तलिखित उताऱ्यातील नावे व क्षेत्र चुकविणे, नवीन शर्तीचे शेरे, कूळ कायद्यानुसार दाखल केलेले शेरे, आकारीपडबाबतचे शेरे, वारसांच्या नोंदी वैध व कायदशीर नोंदींमध्ये गैरप्रकार झाले. अनेक ठिकाणी गावरान जमिनीवर व्यक्तांची नावे लावण्यात आली. काही ठिकाणी एका मालकाच्या नावाऐवजी दुसऱ्याचे नाव लावले. त्यासाठी ऑफलाइन फेरफार नोंदविल्यामुळे हे गैरप्रकार रोखण्यासाठी सरकारला स्वतंत्र मोहीमही आखावी लागली.

आता भूमिअभिलेख विभागाने कलम १५५ नुसार काय करावे किंवा काय करू नये, यासाठी स्वतंत्र परपत्रक जारी केले आहे. त्यानुसार या कलमाचा वापर केल्यावर दिलेले आदेश ऑनलाइनच देण्यात येणार आहेत. फेरफार ऑफलाइन नोंदविता येणार नसल्याचे स्पष्ट केले असून.

अर्धन्यायिक, तसेच महसूल न्यायाधीकरणाकडून दिलेल्या आदेशांच्या फेरफार नोंदीही ऑनलाइनच देण्यात येणार आहेत.

पूर्वी आदेश फेरफार केल्याची नोंदीची माहिती ठेवली जात नव्हती. आता तलाठ्यांच्या लॉगीनला आदेश मिळाल्यानंतर त्याची नोंद केव्हा कशी व कुणी केली याची ऑनलाइन पडताळणी होणार आहे.

यासाठी संबंधित नागरिकांना तलाठ्यांकडे हेलपाटे मारावे लागत होते. तेही आता बंद होणार आहेत.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक - १९६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# एकाच वेळी तीन ठिकाणी चोरी

## दोन पानठेले,एक बंद घर फोडून लाखोंचा ऐवज लंपास

अमरावती/प्रतिनिधीः-

नागपूर गेट पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या टावर लाईन मेहबूबनगर आणि फैजल नगर येथे एकाच वेळी तीन चोऱ्या झाल्याने खळबळ उडाली आहे. रविवारी रात्री या चोऱ्या घडल्या. चोरट्यानी दोन पानठेले आणि एक बंद घर फोडून लाखोंचा ऐवज लंपास केला. माहिती मिळताच पोलिसांनी डॉग स्कॉड, फॉरेन्सिक टीम ची मदत घेऊन घटनास्थळ गाठले आणि चोरट्यांचा मागोवा काढण्याचा प्रयत्न केला . नागपूरी गेट पोलीस स्टेशन अंतर्गत मेहबूब नगर निवासी तनवीर अली अशफाक अली हे आपल्या कुटुंबासह घराला कुलूप लावून गावी गेले होते . ते जेव्हा घरी परतले तर त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले आणि घराच्या आतील सामान अस्ताव्यस्त आढळून आले. त्यांनी अलमारी तपासली असता चोरट्यांनी ४० हजार रुपये रोख, सोन्याचे चे मंगळसूत्र आणि सेवनपीस सोन्याचा हार चोरून नेला. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.याच श्रृंखलेत चोरट्यांनी हाजरा नगर येथे सलमान खान इब्राहिम खान याच्या पानठेल्याचे शटर वाकवुन चोरी केली. चोरट्यांनी शीतपेय, बिसलरी बॉटल्स ,चॉकलेट, सिगरेटचे पाकीट आणि नकदी वीस हजार सहित तीस हजार रुपयांचा माल लंपास केला. त्याच नगरातील शेख अदनान शेख गणी यांचा पानठेलाही फोडला. त्यातून दहा हजार रुपयांचे पान मटेरियल चोरून नेले.एक रात्री तीन चो-या घडल्याने पोलिसांसमोरही आव्हान आहे. दरम्यान पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### पोलीस पेट्रोलिंग वर प्रश्नचिन्ह

शहर पोलीस आयुक्तालयातील वेगवेगळ्या पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हेगारी रोखण्यासाठी रात्री पेट्रोलिंग करण्यात येते. परंतु नागपूरी गेट पोलीस अपवादात्मक पेट्रोलिंग करतात. त्यामुळे चोरट्यांचे साहस वाढलेले आहे. गेल्या काही दिवसापासून अनेक चोऱ्या होत आहे .पोलिसांच्या कार्यप्रणालीवर आणि पेट्रोलिंगवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलीस पेट्रोलिंग न झाल्याने गुन्हेगारांची सक्रियता वाढली आहे. परिसरात नाईट पेट्रोलिंग वाढवण्याची मागणी केल्या जात आहे.

# तब्बल ६० वर्षांपासून ते करीत आहे वृत्तपत्र वाटपाचे काम



वयाच्या दहाव्या वर्षांपासून वृत्तपत्र विक्रेता म्हणून कार्यरत असलेले ज्येष्ठ पत्रकार तथा ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेता अशोक शेंडे हे वयाच्या ८० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. आयुष्यातील तब्बल साठ वर्षापासून ते वृत्तपत्र विक्रेता म्हणून या व्यवसायात अविरत कार्य करीत असून आजही ८० व्या वर्षी ते वृत्तपत्र वाटप करतात.

सध्याच्या युगात प्रत्येकजण आपल्या स्वार्थासाठी आयुष्य वेचतो. पण समाजात असे काही लोक आहेत ज्यांना इतरांच्या आनंदात आपला आनंद दिसतो. अशीच एक व्यक्ती म्हणजे सत्तर वर्षात पदार्पण करणारे तालुक्यातील टाकरखेडा संभु या छोट्याशा गावातील पत्रकारितेतून समाजसेवेचा वसा घेणारे अशोक शेंडे. जे इतरांच्या सुखात आपला आनंद शोधत आजही आयुष्य घालवत आहे. अशोक यांचे वडील महादेव शेंडे यांनीही आपले संपूर्ण आयुष्य स्वत:साठी व कुटुंबासाठी न जगता इतरांच्या सेवेत समर्पित केले. स्वातंत्र्यसैनिकाचा वारसाही अशोकाने जपला. त्याला एकटेपणा आवडत नव्हता. त्याला इतरांसाठी काम करायला, लोकांच्या संपर्कात राहायला आवडते. पण अशोक यांनी कधीही राजकारणात प्रवेश केला नाही. असे असूनही, लोकांसाठी काम करून त्यांच्या संपर्कात राहणे त्यांना आवडते. लहानपणापासून त्यांनी वृत्तपत्र विक्रेता ते पत्रकार म्हणून आपले नाव प्रसिद्ध केले. वनविभागात रुजू होऊनही त्यांनी राजीनामा देऊन वृत्तपत्रविक्रीच्या व्यवसायाला जीवनाची ढाल बनवले. या व्यवसायाला आपले करिअर बनवले, वृत्तपत्र व्यवसाय हा मुळात सामाजिक व्यवसायाशी संबंधित आहे. अशोक यांनी या माध्यमातून जनतेच्या समस्या सरकारपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आणि आजही त्यांचे काम सुरू आहे. ही व्यक्ती अशी आहे जी आयुष्याच्या प्रत्येक बाबतीत स्वतःचा आणि कुटुंबाचा विचार न करता फक्त इतरांच्या आनंदातच आपला आनंद शोधते. अशोक यांची दोन मुलेही पत्रकार म्हणून काम करतात. पोलिस ठाण्यातील काम असो किंवा कौटुंबिक समस्या, त्यांनी मध्यस्थ म्हणून समस्या सोडविण्यास प्राधान्य दिले. एवढेच नाही तर अनेक निराधारांना त्यांच्या घरी अन्नाचे डबे पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. पोलीस आणि प्रशासनाशी चांगले संबंध ठेवून त्यांनी सामाजिक पत्रकारिता केली. आज ते वयाच्या ८० वर्षात पदार्पण करीत आहे तरीही त्यांचा सामाजिक कार्याशी संबंध तुटलेला नाही. अशोक आजही गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत. कलार समाजाचे सचिव,श्री संत राजेश्वर महाराज वाचनालय चे संचालक म्हणून त्यांच्या सामाजिक जबाबदाऱ्या आणि पत्रकार म्हणून सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्याचे काम करत आहेत. अख्या कोरोना काळातही जेथे पेपर वाटप करीता मुले मिळत नव्हती अशावेळी त्यांनी न्युज पेपर स्वतः वाटप केले. आजही ८० व्या वर्षात पदार्पण करीत असताना पहाटे ४ वाजता न्युज पेपर आणण्याकरिता टाकरखेडा वरून पाच किलोमीटर आष्टीला जातात, त्यांच्या या सेवाभावी आयुष्याला सलाम व ८० व्या वर्षात पदार्पण करीत असल्याने वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**-मनोहर कांडलकर, निवृत्त वनाधिकारी**

# चारचाकीने ऑटोला दिली धडक

## दोन गंभीर ; नारगावडी बायपासवरील अपघात

**धामणगाव रेल्वे /प्रतिनिधीः-**नारगावडी बायपास मार्गावर रविवारी (दि.८) सायंकाळी एका चारचाकीने समोरून येणाऱ्या ऑटोला जोरदार धडक दिली. या अपघातात ऑटोचालक रोशन दयाशंकर शर्मा (वय २७) व प्रवासी नीलेश दुर्योधन खडतकर हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास एमएच ४७ एन ३१९९ क्रमांकाची टाटा झेस्ट चारचाकी ही यवतमाळवरून आर्वीकडे भरधाव वेगाने जात होती. दरम्यान, एमएच २७ एआर १३०३ क्रमांकाचा ऑटो परसोडीहून नारगावडीकडे जात होता. यावेळी चारचाकीने समोरून येणाऱ्या ऑटोला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात, पॉवर हाऊस नारगावडी येथील ऑटोचालक रोशन शर्मा आणि साईनगर, धामणगाव रेल्वे येथील प्रवासी नीलेश खडतकर हे गंभीर जखमी झाले.

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

### १९ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -१०२९/२०२५
श्री ज्ञानेश्वरराव कवाने व दोन वि.निरंक
पुढील तारीख २७.०६.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Dnyaneshwarrao Yashwantrao Kawane**
Age 77 yrs., Occu.- Agriculturist
2) **Ramesh Yashwant Kawane**
Age 64 yrs., Occu.- Agriculturiest
3) **Rajendra Yashwantrao Kawane**
Age 60 yrs., Occu.- Agriculturiest
All R/o. Nandura Bk., Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Nil**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Yashvant Devman Kawane** हे **दि.२४.०३.२००४** रोजी अमरावती येथे व **Narmadabai Yashvantrao Kawane** हया दि.०३/०५/२०१५ रोजी नांदुरा बु. ता.जि.अमरावती येथे मयत झाल्या. **अर्जदार श्री ज्ञानेश्वरराव यशवंतराव कवाने व दोन** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री ज्ञानेश्वरराव यशवंतराव कवाने व दोन** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०९.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,अमरावती विभाग, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

**एस.आर.एन.क्रमांक :- AMR/0137/18/25**
**फेरफार अहवाल/अर्ज क्र. :- 63/19/2025**

**सार्वजनिक न्यासाचे नांव :-** **महादेव देवस्थान कुंभारपुरा येवदा तालुका दर्यापूर जिल्हा अमरावती बाबत**
**नोंदणी क्रमांक :-** **व्दारा श्री प्रदिप विठ्ठलराव देशमुख, वार्ड नं.१,येवदा तालुका दर्यापूर अमरावती, अमरावती, दर्यापूर, एओडा बु.**
**बाबत अर्जदार :-** **श्री रमेश मच्छिंद्रनाथ धरमकर.**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, अमरावती, हे वर नमुद केलेला अर्ज महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|

**(अ) जंगम मिळकत :- रोख रु. /- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गाव | सी.एस.किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/ कालावधी किंवा स्वरुप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MOUJE YEODA TALUKA DARYAPUR | GAON NAMUNA 8 A | 461 Chofit | Malmatta no. 1075 | MANDIR | 500000.00 |
| 2 | YEODA TALUKA DARYAPUR | 7/12, Bhogvat Varg 1 | 0 Hector 90 aar | 1439 (Khate no. 1788) | Agriculture land | 1000000.00 |

**(ब) स्थावर मिळकत :- रोख रु.१५,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये पंधरा लाख मात्र फक्त)**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी
आज दिनांक ०४/०६/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती**

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

### विद्यमान २१ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१०१४/२०२५
**शोभा व चार -वि- निरंके**
पुढील ता.०८.०७.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. शोभा मारोतराव वालकर, वय ७४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.कुंभारवाडा, दत्तमंदिराजवळ, अंबागेटच्या आत, अमरावती
२. फणींद्र मारोतराव वालकर, वय ४२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.६०१, साई हेरिटेज, साईनगर, अमरावती
३. शैलेश मारोतराव वालकर, वय ३९ वर्षे, व्यवसाय - व्यवसाय
रा.कुंभारवाडा, दत्तमंदिराजवळ, अंबागेटच्या आत, अमरावती
४. लक्ष्मी प्रदीप घाटोळे, वय ३७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.गुजझार पुरा, कुंभारवाडा, अकोला
५. शिवशंकर मारोतराव वालकर, वय ३५ वर्षे, व्यवसाय - व्यवसाय
रा.कुंभारवाडा, दत्तमंदिराजवळ, अंबागेटच्या आत, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मारोतराव आकारामजी वालकर** यांचे दिनांक **०४.०२.२०२०** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार श्रीमती शोभा मारोतराव वालकर व चार** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **मुंबई रेग्युलेशन अधिनियम** VIII १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती शोभा मारोतराव वालकर व चार** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२६.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

### ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -८२१/२०२५
श्रीमती आशा चर्हाटे व तीन- वि- बेबी चर्हाटे
पुढील तारीख १९.०६.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Asha W/o Ravindra Charhate ,** Age 41 yrs., Occu.- Household
2) **Amit Ravindra Charhate ,** Age 20 yrs., Occu.- Student
3) **Aaditya Ravindra Charhate ,** Age 18 yrs., Occu.- Student
4) **Roshani Ravindra Charhate ,** Age 10 yrs., Occu.- Student
Minor natural guardian mother applicant no.1 to 4
R/o Near Mahafil Hotel, Juni Adiwasti Nagar, Amravati, Camp Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Beby Shrikrushna Charhate ,** Age 60 yrs., Occu.- Agruculturist
R/o Pimpalkhuta, Armal Mardi Road, Amravati, Tq. & Dist. Amravati

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Ravindra Shrikrushna Charhate** हे **दि.२०.०२.२०२३** रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **श्रीमती आशा रविंद्र चर्हाटे व तीन -वि-गैरअर्जदार बेबी श्रीकृष्ण चर्हाटे** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती आशा रविंद्र चर्हाटे व तीन -वि-गैरअर्जदार बेबी श्रीकृष्ण चर्हाटे** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २३.०४.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## विकणे आहे

2 B.H.K रो-हाऊसेस आणि 1 BHK फ्लॅट

२ बाल्कनी सुविधेसह, सोबतच वातानुकुलीत योगा हॉल, लिफ्टची सुविधा, तळमजला संपूर्ण पार्किंग, आणि सौर ऊर्जा यंत्रणा (आजीवन देखभाल मोफत)

**फ्लॅट्स - शुभम लेआऊट, नेमाणी गोडाऊनच्या मागे, तापडिया मॉलपासून फक्त १.०० कि.मी. अंतरावर**

**- संपर्क -** 9518911428, 8788644334, 9823255054

**1 B.H.K. फ्लॅट ११.९० लाख, 2 B.H.K. फ्लॅट १६.९० रो-हाऊस - १९.९० लाख**

पहिले या, आणि पहिले फायदा मिळवा, शहरात सर्वात स्वस्त किंमतीत

## पाहिजेत

**डिजिटल न्यूज कार्यालयासाठी निवेदक, संपादक, वृत्त प्रतिनिधी पाहिजे. अनुभवास प्राधान्य. तसेच फ्लॅट विक्रीकरीता अनुभवी मुले / मुली पाहिजेत. कार्यालयासाठी रिसेप्शनिस्ट पाहिजे.**

संपर्क

**९८२३२५५०५४, ९८२३५४४४४६**

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, मी **सौ.दिपाली नरेंद्र भसाटे,** माझा सौदेपत्र **श्री.प्रभाकर शेषराव काळबांडे**, वय ७८ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त, रा.साई मंदिर, किरण नगर नं.१, रुक्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती-४४४६०६ यांच्या राहत्या घराचा ज्याचे वर्णन खालीलप्रमाणे--

**वर्णन -** नोंदणी पोट तुकडी अमरावती शहरचे वि.कचेरीचे कक्षेतील व अमरावती म.न.पा.चा हद्दीतील मौजे राजापेठ, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.२०/२ मधील प्लॉट नं.९ (नऊ) याची साईज ४० X २२.६ फुट, याचे क्षेत्रफळ ९०० चौ.फुट आहे. सदर्हु जागेत खालच्या मजल्यावर ३ रुम संडास, बाथरुम व वरच्या मजल्यावर २ रुम संडास, बाथरुम, पक्के बांधकाम नकाशानुसार बांधकामाचे क्षेत्रफळ २०० फुट आहे. या जागेसह घराची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

**पुर्वेस** - सर्व्हीस लाईन **पश्चिमेस** - २० फुटाचा रोड
**उत्तरेस** - खेडकर यांचे घर **दक्षिणेस** - सागळे यांचे घर

येणेप्रमाणे या घराचा सौदा झालेला आहे. त्यांनी वरील घराचा सौदा कायम खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले असून त्या अनुषंगाने ईसार रक्कम स्विकारली आहे. सदर राहते घर मालकी हक्काने अधिकारासह निर्वेध निजोखमी व बोझारहीत असल्याची खात्री व भरवसा त्यांनी दिला आहे. सदर घरावर गहाण, दान, सरकारी-निमसरकारी, बहुउद्देशीर पतसंस्था, लीज, करार-मदार, खरेदी विक्री, हक्क, दावा, ताबा, वहिवाट, कर्ज, बोजा, जप्ती, जमीन साठेखत ईसार मुखत्यार, वारसा, कब्जा इत्यादी कोणत्याही प्रकारचा विधीसिध्द हक्क व हितसंबंध असल्यास संबंधितांनी नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मूळ कागदपत्रासह आमच्याकडे लेखी हरकत नोदवावी व पोहोच द्यावी. अन्यथा सदरचे घर व त्यातील मालकाचे मालकी हक्क निर्वेध समजून व संबंधितांनी त्यांचे हक्क जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून योग्य तो व्यवहार करतील. तद्नंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. करीता ही जाहीर नोटीस.

दिनांक / /२०२५
अमरावती

सही,
**(सौ.दिपाली नरेंद्र भुसाटे)**
पत्ता- मुरलीयार नगर, मोती नगर चौक जवळ, अमरावती
मो.नं.८३०८१०६७१८

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

### १९ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - ९९४/२०२५
श्रीमती सारिका माहुलकर व दोन वि.निरंक
पुढील तारीख २४.०६.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Sarika Santoshrao Mahulkar,** Age 36 yrs., Occu.- Household
2) **Rashi Santosh Mahulkar,** Age 14 yrs., Occu.- Education
Applicant No.1 is the natural guardian mother behalf of her minor daughter i.e. applicant no.2)
Both R/o. Nandura Bk. Tq. & Dist. Amravati
3) **Savita Anilrao Mohod,** Age 49 yrs., Occu.- Household
Rasegaon, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Nil**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Basvant Jayram Mahulkar** हे **दि.०५.०७.२०२०** रोजी अमरावती येथे **Dewkabai Basvant Mahulkar** हया दि.०७/१०/२०२० रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **अर्जदार श्रीमती सारिका संतोषराव माहुलकर व दोन** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती सारिका संतोषराव माहुलकर व दोन** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०९.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

### १८ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -९४६/२०२५
श्री गौरव गजानन डगवार वि.निरंक
पुढील तारीख २०.०६.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Gaurav Gajanan Dagwar**
Age 25 yrs., Occu.- Electric Work
R/o. M.I.D.C. Road, Sant Rohidas Colony, Rukhmini Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Nil**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Gajanan Wamanrao Dagwar** हे **दि.१८.०५.२०१५** रोजी अमरावती येथे व **Rekha Gajanan Dagwar** हया दि.२६/११/२०२३ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **अर्जदार श्री गौरव गजानन डगवार** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री गौरव गजानन डगवार** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०६.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, अमरावती

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, अमरावती हे खालील बस स्थानकावरील रिक्त वाणिज्य आस्थापना मासिक परवाना शुल्कावर (फिवर) लिव्ह ॲण्ड लायसेन्स पध्दतीने चालविण्यास देणेसाठी निविदा मागवित आहेत. कोरे छापिल निविदा फॉर्म जामीनदार संमतीपत्र, अटी व शर्ती फॉर्म तसेच विक्री करावयाच्या पदार्थांची यादी, इ. तपशील विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे उपलब्ध होतील. निविदा स्विकारण्याची शेवटची तारीख दि.२५.०६.२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत राहील.

**निविदा सुचना क्र.०१/२०२५-२६**

| अ. क्र. | बसस्थानक | आस्थापना प्रकार | बांधीव/ मोकळी | जागेचे क्षेत्रफळ (चौ.फुट) | जागा वापरणावळ रक्कम व अपेक्षित भाडे रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | अमरावती-१ | दुरध्वनी कक्ष | मोकळी | ६४ | १९८० | २३७६० |
| २. | बडनेरा | जनरल प्रोव्हिजन स्टॉल | बांधीव | ९७ | २६७५ | ३२१०० |
| ३. | वलगांव | जनरल प्रोव्हिजन स्टॉल | बांधीव | ९५.९ | ४९२७ | ५९१२४ |
| ४. | वलगांव | चहा दुकान | मोकळी | ६४ | २१३८ | २५६५६ |
| ५. | मोझरी (तळमजला) | शेतकी भंडार | बांधिव | २६८.३ | १९३७ | २३२४४ |
| ६. | मोझरी (तळमजला) | दुरध्वनी कक्ष (मोबाईल शॉपी) | बांधिव | १९७.१ | १४२३ | १७०७६ |
| ७. | मोझरी (पहिलामजला) | जनरल प्रोव्हिजन्स स्टॉल | बांधिव | १९७.१ | १४२३ | १७०७६ |
| ८. | मोझरी (पहिलामजला) | बचत गट (उत्पादित माल विक्रीबाबत | बांधिव | १६३.९ | १८८४ | २२६०८ |
| ९. | मोझरी (पहिलामजला) | फ्रुट ज्युस स्टॉल | बांधिव | १५६.२ | ११२८ | १३५३६ |
| १०. | मोझरी (पहिलामजला) | होजियरी स्टॉल | बांधिव | ११९.५ | १०४६ | १२५५२ |
| ११. | मोझरी (पहिलामजला) | पत्रकार भवन | बांधिव | १५६.२ | ११२८ | १३५३६ |
| १२. | मोझरी (तळमजला) | पुस्तक दुकान व झेरॉक्स सेंटर | बांधिव | १००.५ | ६४४ | ७७२८ |
| १३. | मोझरी (तळमजला) | फळ दुकान | बांधिव | १०१.१ | ७३० | ८७६० |
| १४. | मोझरी (पहिलामजला) | स्नॅकबार | बांधिव | ११९.५ | ८४३ | १०११६ |
| १५. | परतवाडा | बेकरी | बांधिव | १०० | ५६२६ | ६७५१२ |
| १६. | वरुड | फळ दुकान | बांधिव | ५२ | १५०२ | १८०२४ |
| १७. | तिवसा | स्नॅकबार | बांधिव | ५१८.५ | ३०८२ | ३६९८४ |
| १८. | तिवसा | पुस्तक दुकान व झेरॉक्स सेंटर | बांधिव | ५३.८ | ३४२ | ४१०४ |
| १९. | धामणगांव रेल्वे | दुध व दुग्धजन्य पदार्थ | मोकळी | १०० | २३४० | २८०८० |
| २०. | अंजनगांव सुर्जी | स्नॅकबार | बांधिव | ६०७ | २५०५ | ३००६० |
| २१. | अंजनगांव सुर्जी | सायबर कॅफे | बांधिव | ४४१.६ | २७९० | ३३४८० |
| २२. | अंजनगांव सुर्जी | चहा दुकान | बांधिव | ६२.६२ | १०७० | १२८४० |
| २३. | अंजनगांव सुर्जी | पुस्तक दुकान व झेरॉक्स सेंटर | बांधिव | ६२.६२ | ३९५ | ४७४० |
| २४. | अंजनगांव सुर्जी | फळ दुकान | बांधिव | ५५.१४ | ३४९ | ४९८८ |
| २५. | चांदूर बाजार | फळ दुकान | बांधिव | ३४.९४ | ६४७ | ७७६४ |

वरील नमुन्यातील निविदा मोहोरबंद लखोट्यात भरुन त्या लखोट्यावर ................ येथील ............ साठी निविदा असे स्पष्ट लिहून तो लखोटा रजिस्टर्ड पोस्टाने/विभागीय कार्यालयात निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत विहीत वेळेत पोहोचेल अशारितीने पाठवावा किंवा कार्यालयात स्वतः सादर करावा.

१. कोणतीही निविदा/अर्ज कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार रा.प.महामंडळ राखून ठेवत आहे. रा.प.महामंडळाचे नियम/अटी यामध्ये वेळोवेळी होणारे बदल परवानाधारकावर बंधनकारक राहतील. निविदा रद्द करण्याचे किंवा त्यामध्ये दुरुस्ती करण्याचे अधिकार रा.प.महामंडळ राखून ठेवीत आहे.

२. निविदा अर्जावर निविदाकाराचा फोटो लावणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे निविदा अर्जाची किंमत अदा केल्याशिवाय निविदा फॉर्म ग्राह्य धरणार नाही. **उपहारगृह व स्नॅकबार करीता रु.११८०/- (जी.एस.टी.१८ टक्के करासह) व इतर वाणिज्य आस्थापनेकरीता रु.५९०/- (जी.एस.टी.१८ टक्के करासह)** फॉर्म फी भरणे आवश्यक आहे अथवा शासनाच्या बदलणाऱ्या नियमाच्या कर धोरणास अधिन राहून निविदा फॉर्म भरावा लागेल.

३. पुढील शुध्दीपत्रक ऑनलाईन प्रकाशित करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी

**निविदा सादर करण्यासाठी काही प्रश्न उपस्थित झाल्यास विभागीय कार्यालयातील दुरध्वनी क्र.०७२१-२६६०३०० संपर्क साधावा.**

**एस.टी.चा प्रवास - राज्याचा विकास**

**विभाग नियंत्रक,**
**राज्य परिवहन, अमरावती**

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक २७६**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# विदर्भातल्या शेतकऱ्याने केली संत्रा पिकात क्रांती

## एआयच्या मदतीने एका झाडाला लागतात १५०० फळे

**अचलपूर/वार्ताहर**

संत्र्याच्या झाडाला रोज पाणी किती हवे? खतांची खरंच गरज आहे का? झाडावर किंवा फळाला कीड लागलीय का? अशी सर्व माहिती मोबाईल फोनवर मिळत असेल आणि सकाळी उठल्यावर अवघ्या १५ मिनिटात आपल्या संत्रा बागेची संपूर्ण माहिती घेऊन संत्रा उत्पादक शेतकरी नियोजन आखत असेल तर आश्चर्य वाटायला नको, कारण हे सारे आता 'एआय' अर्थात कृत्रिम बुद्धिमताद्वारे शक्य झाले.

अमरावती जिल्ह्यात अचलपूर तालुक्यात खरपी या छोट्याशा गावात विजय बिजवे यांच्या शेतात या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कधी नव्हे इतका संत्रा बहरला. एका झाडावर १००० ते १५०० फळ आता विपरीत परिस्थितीतही लागलेली आहेत. हे तंत्रज्ञान शेतीसाठी वरदान ठरले. भविष्यात विदर्भातील संत्र्याची गोडी आणखी वाढवणार, अशी आशा निर्माण झाली आहे. संत्रा बागेत हे तंत्रज्ञान नेमके कसे काम करते? यामुळे फायदा कसा होतोय?जाणून घ्या. उपग्रह प्रणालीद्वारे पिकांचं निरीक्षण- विजय बिजवे यांच्या शेतात इंटरनेट प्रणालीवर चालणारें सेन्सर उभारण्यात आले. या सेन्सरद्वारे उपग्रह प्रणालीच्या माध्यमातून संपूर्ण ८ एकर शेतात लागलेल्या संत्रा पिकाचे निरीक्षण केले जाते.

म्हणजे, शेतातील १२०० झाडांचे संपूर्ण व्यवस्थापन या तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. झाडावर आणि फळांवर येणाऱ्याया





किडीच व्यवस्थापनसुद्धा या तंत्रज्ञानामुळे शक्य झालय. या शेतात ओलाया किती? हे सांगणारे सेन्सर लावण्यात आलय. याद्वारे जमिनीचे तापमान आणि जमिनीचा ओलावा कळतो. या सेन्सरवर सोलर पॅनल लावलं असल्याने वातावरणातील तापमान, आर्द्रता, सूर्गप्रकाशाची तीव्रता कळते, अशी माहिती या तंत्रज्ञानातील नाशिक येथील एआय आणि कृषीतज्ज्ञ डॉ. भूषण गोसावी यांनी दिली.

स्मार्ट इरिगेशन शेड्यूल-संत्रा पिकाला योग्य इरिगेशनची गरज आहे. या तंत्रज्ञानाद्वारे बिजवे यांच्या शेतात खास स्मार्ट इरिगेशन शेड्युल आखून देण्यात आले. शेतात पाणी किती उपलब्ध आहे? पिकांच्या अवस्थेनुसार आणि मातीच्या प्रकारानुसार एखाद्या पिकाला पाण्याची किती गरज आहे या बाबतची माहिती या तंत्रज्ञानाद्वारे आपल्या मोबाईल ?पमध्ये कळते. याठिकाणी स्मार्ट इरिनेशन शेडकुल लावण्यात आले. त्यामुळे जमिनीत उपलब्ध असणारी खत किती आहेत आणि ती कशी आहेत याची माहिती उपग्रहाच्या माध्यमातून कळते. यामुळे मातीची नेमकी कशी अवस्था आहे, हेही लक्षात येत. मातीमध्ये नायट्रोजन, पोटॅशियम, फॉस्फरस यांचे प्रमाणही कळते आणि कोणते घटक अमिनीत कमी आहेत? हे लक्षात येते असेंही डॉ .भूषण गोसावीनी सागितले.

असा होतोय फायदा- बिजवे यांच्या सेतात पूर्णत विषमुक्त संत्रीआहेत. विशेष म्हणजे, बिजवे यांच्या शेतातून १५ किलोमीटरच्या परिसरात कोणाच्याही शेतात संत्री सेट झाली नाहीत. या तंत्रज्ञानाचा वापर केल्यानं आमची ५० ते ६० टक्के पाण्याची बचत होते. यासह कीटकनाशक आणि बुरशीनाशकांचा वापर अर्ध्यावर आला. सकाळी केवळ २५ मिनिटे मोबाईल फोनवर शेतीची संपूर्ण परिस्थिती मला घरबसल्या कळते. मोबाईल फोनवर पाहताना कुठे काही त्रुटी आढळ्यास मी घरूनच शेतातील गड्याला काय कुठे सुधारणा करायची, हे सांगतो. या तंत्रज्ञानामुळे वेळेची, पैशांची मोठी बचत होत आहे. केवळ ६० हजार रुपये खर्चातून आम्ही है तंत्रज्ञान आमच्या शेतात वापरत आहोत, असे गौरव बिजवे यांनी सांगितले.१५ वर्षात पहिल्यांदा भरभराट-आमची २५ वर्षापासून संत्र्याची बाग आहे. सतत नुकसान होत असताना यावर्षी मुलगा गौरव यानं आपल्या शेतात एआय तंत्रज्ञानाचा वापर करू असा निर्णय घेतला. त्याचा हा निर्णय खरंच योग्य ठरला असे आता शेतात फिरताना वाटते. लगतच्या शेतात कुठंही संत्री दिसत नसताना आमच्या शेतात एका झाडाला १००० ते १५०० फळ लागली आहेत. यावर्षी आमच्या उत्पन्नात निश्‍चित भर पडेल, असा विश्वास विजय बिजवे यांनी व्यक्त केला. संत्री उत्पादनात एआयचा वापर, देशातील पहिलाच प्रयोग- खरपी गावातील विजय बिजवे यांच्या शेतात सुरू असलेले हे काम देशातील पहिलाच प्रयोग असल्याचेही डी. गोसावी नी सांगितल. हा प्रयोग खरच यशस्वी ठरणारा आहे का? याचा नेमका काय फायदा होतो आहे, याची माहिती घेण्यासाठी अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यांतून अनेक शेतकरी बिजवे यांच्या शेतात भेट देत आहेत. कृषी क्षेत्रातील तज्ञांची भेट देणाऱ्यांची संख्या अधिक आहे. हे तंत्रज्ञान नवे असून देणाऱ्या काळात शेतीच्या भरभराटीसाठी आणि शेतकऱ्यांचा विकासासाठी ते फायदेशीर ठरेल. अडचणीत सापडलेली विदर्भातील संत्री पुन्हा एआय तंत्रज्ञानामुळे जोमात बहरतील, असा विश्वास देखील डॉ .भूषण गोसावी यांनी व्यक्त केला. यावेळी राजेश शिरोळे,सार्वजनिक बांधकाम विभाग निवृत्त कार्यकारी अभियंता एन. ए. मर्चंट, विलास खडके ,अभिजीत देशमुख, गिरी ,राजेश काशीकर ,सागर पुरोहित आदी उपस्थितीत होते .

## संक्षिप्त




### सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाची भेट

**अमरावती-** फर्मागुडी, फोंडा (गोवा) येथे पार पडलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे यशस्वी आयोजन करण्यात आले. या महोत्सवात भारतासह २३ देशांतील ३० हजारांहून अधिक हिंदूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संत-महात्मे, विद्वान वक्ते, लेखक तसेच सनातन राष्ट्रहितैषी विविध मान्यवरांनी या महोत्सवात मार्गदर्शन करत उपस्थित हिंदूंना दिशा दिली. या महोत्सवानिमित्त सच्चिदानंद परब्रह्म परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांनी पूज्य संतोषदेवजी महाराज यांना विशेष भेटवस्तू पाठवली. ही भेट वस्तू पू. महाराजांना त्यांच्या सिंधु नगर स्थित शिवधारा आश्रमात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली. भेट मिळाल्यानंतर पू. संतोषदेवजी महाराजांनी अत्यंत आनंद व्यक्त करत सनातनच्या राष्ट्र आणि धर्मकार्याच्या महान उद्दिष्टांप्रती आपली पूर्ण तत्परता दर्शवली. त्यांच्या या सकारात्मक आणि राष्ट्रनिष्ठ प्रतिसादाबद्दल सनातन संस्थेच्या साधकांनी पू. संतोषदेवजी महाराजांविषयी मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.



### विद्यापीठाचा स्थापना दिवस साजरा

**अमरावती-**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या स्थापनेला २७ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल पी.आर.पोटे.पाटील आयुर्वेद व नर्सिंग महाविघालयाच्या वतीने विविध उपक्रमाद्वारे वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सुप्रसिद्ध आयुर्वेद तज्ञ डॉ. चरण सोनारे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. श्याम भुतडा प्राचार्य सुज्ञान गवई शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. रणजीत देशमुख यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर व रुग्णालयीन कर्मचारी, तथा,दोन्ही शाखेतील विद्यार्थी यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहन करण्यात आले. या प्रसंगी विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. प्राचार्य डॉ.श्याम भुतडा यांनी विद्यापीठाच्या २७ वर्षांचा आलेख सादर करून आरोग्य सेवा, आरोग्य शिक्षण व संशोधन क्षेत्रात केलेल्या प्रगतीची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन डॉ.पारूल नांदगावकर यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य गवई यांनी केले. प्रसाद वितरण व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



### आयएपा द्वारा पर्यावरण दिन साजरा

**अमरावती-**आयएपी अमरावती शाखेतर्फे पर्यावरण सप्ताहानिमित्त स्थानीक जिल्हा स्त्री रुग्णालयात नर्सिंग विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून आयएपी विदर्भ शाखेचे अध्यक्ष डॉ सतीश तिवारी, केंद्रीय आयएपीच्या पर्यावरण समूहाचे आगामी अध्यक्ष डॉ सतीश अग्रवाल, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ अरुण साळुंखे,आयएपी अमरावतीचे माजी अध्यक्ष डॉ प्रल्हाद पाटील, डॉ ऋषिकेश नागलकर, डॉ प्रीती इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ निलेश पाचकवडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता आयएपी अमरावती शाखेच्या उपाध्यक्ष डॉ प्रतिभा काळे, कोषाध्यक्ष डॉ ऋतुराज पाटील, प्रचार प्रमुख डॉ आदित्य टाक, डॉ जयंत पांढरीकर, डॉ अमोल फाले, डॉ अभिलाष चौहान, डॉ अमित वडूरकर यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी सलोनी दोरसिंबे, मिताली वानखडे, आंचल धाकडे, साक्षी गवळीकर, संजीवनी गवई, शीतल गवई, सोनाली गुल्हाने, वृनाली गुल्हाने, स्नेहा इंगळे, भावना इंगोले, पूनम काळे, आंचल खडसे, मनस्वी खाडे, गौरी कुसराम, नंदिनी मरकड, रेणुका परीसे, रिया पारखंडे, जया राठोड, चित्रा सोळंके, दामिनी सोनवणे, अनिता तायडे, उत्कर्ष नांद्रे उपस्थित होते.

# पं.स.च्या तीन दिवसीय प्रशिक्षणाला सुरुवात

## भातकुलीमधिल ८० शिक्षक सहभागी





**अमरावती/का.प्र.**

पं. स.भातकुली अंतर्गत वर्ग १ च्या मराठी माध्यमाच्या तीन दिवसीय प्रशिक्षणाला गोल्डन किड्स विद्यालय,अमरावती येथे सुरवात झाली आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वर्ग १ ली ला शिकविणाऱ्या शिक्षक बंधू भगिनी यांच्या करिता या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.या शैक्षणिक वर्षा पासुन सीबीएस प्यार्टन लागु झाला आहे.या नविन अभ्यासक्रम व मुल्यमापनाचे प्रशिक्षण सुरु झाले आहे.

९ जून २०२५ ला सकाळी ठीक १०:०० वा या प्रशिक्षणाला सुरुवात झाली, हे प्रशिक्षण ९,१० व ११ जून असे तीन दिवस चालणार आहे.(शिक्षण विस्तार अधिकारी, पं. स.भातकुली)रामेश्वरजी माळवे ,(शिक्षण विस्तार अधिकारी, पं. स.भातकुली)शकील अहमद खान , (मुख्याध्यापक, गोल्डन किड्स, विद्यालय, अमरावती)उमाकांतजी सिंगरोल,(विषय साधन व्यक्ती, पं. स.भातकुली)चंद्रकांतजी कडब यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये, आनंददायी वातावरणात प्रशिक्षणाला सुरुवात झाली.या प्रशिक्षणाच्या मध्ये केंद्र प्रमुख उपस्थित आहे.

पं. स.भातकुली अंतर्गत वर्ग १ ली. ला शिकविणाऱ्या जवळपास ८० शिक्षक बंधू भगिनींना हे प्रशिक्षण देण्यात येत आहे. बालगीते, कृतियुक्त गीते म्हणजे विद्यार्थ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. मात्र, अधिकाऱ्यांनीही त्याविषयी आत्मीयता दाखवत, आपला सहभाग नोंदवत या गीतांवर ठेका धरला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या शिक्षण अंमलबजावणीच्या अनुषंगाने यंदापासून नवीन अभ्यासक्रमाची टप्प्याटप्प्याने राबवणूक केली जाणार आहे. त्या दृष्टीने यंदाच्या वर्षी इयत्ता पहिलीचा अभ्यासक्रम बदलणार आहे.

या पार्श्वभूमीवर पहिलीच्या शिक्षकांसाठी सध्या राज्यभर प्रशिक्षण कार्यक्रम सुरू आहे.भातकुली तालुक्यातील शिक्षकांचे प्रशिक्षण सुरु आहे.

**वैविध्यपूर्ण बाबींचा समावेश**

नवीन अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणात कृतियुक्त शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, व्यावसायिक शिक्षण आदी बाबींवर भर देण्यात आला आहे. ध्येय, क्षमता, अध्ययन निष्पत्ती अन् त्यावर आधारित अध्ययन अनुभव या विषयांचे धडे प्रशिक्षणात दिले जात आहेत.यावेळी सुरू असलेल्या आनंददायी कृतियुक्त गीतात हे अधिकारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. मोठ्या उत्साहाने त्यांनी या गीतांवर ठेका ठरला.

उपस्थित सर्व शिक्षकांनी त्यांना दाद दिली. या प्रशिक्षणाला तज्ञ मार्गदर्शक म्हणून राजकुमार गंगराळे ,श्रीमती देवकी औघड, ज्योती सानप,मार्गदर्शन करीत आहे,तर प्रशिक्षण समन्वयक म्हणून चंद्रकांत कडबे,,कामकाज पाहत आहे. प्रशिक्षण स्थळी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.असे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा

**अमरावती-**महाराष्ट्र राज्यामध्ये आधुनिक वैद्यक आणि भारतीय औषध प्रणालीमध्ये योग्य आणि पध्दतशीर शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण आणि संशोधन सुनिश्चित करण्यासाठी आणि संतुलित विकासासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना नाशिक येथे १० जुन १९९८ रोजी केली. त्यामुळे विद्यापीठाचा वर्धापन दिन दरवर्षी करण्यात येतो. त्याअनुषंगाने विद्यापीठाशी सलग्न महाविद्यालयांनी सकाळी १० वाजता विद्यापीठ ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजीत करावा व विद्यापीठ गीत वाजविण्यात यावे अशा सुचना विद्यापीठ प्रशासनाकडून प्राप्त झाल्याने श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ.



पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात विद्यापीठाचा २७ वा वर्धापण दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचो अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन क्रिडा अधिकारी संजय वाटाणे यांनी केले.

# राष्ट्रीय महामार्गाचे कठडे तोडून व्यावसायिकांनी उभारली दुकाने

**अमरावती/का.प्र.**

गेल्या काही दिवसांपासून मोठ्याप्रमाणात महामार्ग बायपास हायवेवर रस्त्यावर जागोजागी महामार्गाचे कठडे तोडून व्यावसायिकांनी दुकाने, हॉटेल, ढाबे टाकून महामार्गावर रस्ते बनवले. यामध्ये मोठ्या प्रमाणात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. उभ्या ट्रकवर भरधाव कार आदळली होती. या घटनेत पती-पत्नीचा मृत्यू झाला होता. उभा असलेला ट्रक हा कठडे तोडून उभारण्यात आलेल्या दुकानावरच थांबला होता हे विशेष! वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. यामुळे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्यात आले, तसेच या मार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने लोखंडी कठडे बनवण्यात आले; परंतु येथील महामार्गावरील बसवलेले कठडे काही व्यावसायिकांनी आपल्या सोयीसाठी तोडले आहेत. तिथून येण्या-जाण्यासाठी मार्ग बनविला आहे. यामुळे जाणीवपूर्वक अपघाताला आमंत्रण देत असल्याचे अनेक सुजाण नागरिकांचे म्हणणे आहे, याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे. दिवसेंदिवस लोकसंख्येत वाढ होते. त्यामुळे वाहनांच्या संख्येतसुद्धा वाढ झाली आहे. त्यामुळे महामार्ग मोठे करण्यात आले. अपघाताचे प्रमाण कमी व्हावे, यामुळे रस्ते मोठे करण्यात आलेः परंतु व्यवसाय त्यांनी यावरसुद्धा अतिक्रमण करून महामार्गावरे दोन्ही बाजूच्या ग्राहकांना येण्या-जाण्याकरिता लावलेले लोखंडी कठडे यामधून मार्ग तयार केला आहे. राष्ट्रीय महामार्ग असल्याने या महामार्गावर वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे रस्ता ओलांडताना त्यांना सुसाट वाहनांनी केव्हा अपघात घडेल, हे सांगता येत नाही. याविषयी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली असल्याचे नागरिकांनी सांगितले; परंतु अद्याप कोणतीही कारवाई तसेच नवीन कठडे बनवण्यात नाही आले. त्यामुळे अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. कठडे कापण्यात आल्यावर यावर कोणतीच कारवाई केली नाही. त्यामुळे अपघातात वाढ होताना दिसत आहे. रविवारी बडनेरा परिसरात एक्स्प्रेस हायवेवर रस्त्यावर पती-पत्नी तसेच तीन मुलाचा अपघात झाला. ट्रक रस्त्यावर उभा होताः परंतु नियम सांगतो की महामार्गावरील रस्त्यावर वाहन थांबवता येत नाही. त्यामुळे हा अपघात घडला तसेच वाहनचालक रस्त्यावर उभे राहून ढाबे, हॉटेल, काही व्यवसाय टाकलेले दुकान यावर आपले ट्रक थांबून उभे राहतात. यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात घडत आहे. यामुळे कठडे तोडून व्यवसाय करणाऱ्या कारवाई करण्यात यावी, अशी नागरिकांची मागणी केली जात आहे.


# मेळघाटातील दुर्गम भागात सेंद्रिय शेतीचा यशस्वी प्रयोग

## गणेश राठोर यांची डीडी सह्याद्रीवर विशेष मुलाखत

**चिखलदरा /वार्ताहर**

मेळघाटातील अतिदुर्गम भागात राहूनही आधुनिक शेतीचा अभ्यास करून शास्त्रशुद्ध पद्धतीने शेती करणारे गणेश राठोर हे सध्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक प्रेरणास्त्रोत ठरत आहेत. त्यांची सेंद्रिय शेतीतील कामगिरी आणि प्रयोगशील दृष्टिकोन यामुळे त्यांची विशेष मुलाखत दूरदर्शनच्या डीडी सह्याद्री वाहिनीवर प्रसारित करण्यात आली. गणेश राठोर यांचे मुख्य पीक मुसली असून, हे एक औषधीदृष्ट्या महत्त्वाचे आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पीक आहे. पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळी दिशा घेत त्यांनी मुसलीचे उत्पादन सेंद्रिय पद्धतीने घेतले असून, कमी पाणी व योग्य व्यवस्थापनामुळे त्यातून चांगले उत्पन्न मिळते. बाजारात मुसलीला असलेली उच्च मागणी हे त्यांच्या शेतीचे एक बलस्थान ठरते.

राठोर यांनी शेतीच्या आजूबाजूला म्हणजे शेताच्या धुऱ्यांवर आंबा, पेरू, चारोळी, मोह यांसारखी फळझाडे लावली आहेत. यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो, तर दुसरीकडे साईड पिक्सद्वारे अतिरिक्त उत्पन्न मिळते. त्यांच्या शेतात जैवविविधतेचे सुंदर



उदाहरण पाहायला मिळते. फक्त औषधी पीकच नव्हे, तर सोयाबीन, मका आणि ज्वारी यांसारखी पारंपरिक पिकेही गणेश राठोर शास्त्रशुद्ध पद्धतीने घेतात. योग्य पीक फेरपालट, सेंद्रिय खते, मृदा परीक्षण आणि हवामानाशी सुसंगत शेती पद्धतीचा वापर करून त्यांनी या पिकांमध्येही चांगले उत्पादन मिळवले आहे. पारंपरिक शेतीला विज्ञानाची जोड दिल्यास त्यातून अधिक उत्पादन आणि टिकाऊ शेती शक्यआहे, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

**अन्य शेतकऱ्यांसाठी प्रेरणा**

गणेश राठोर यांच्या कार्यामुळेआज मेळघाटातील अनेक शेतकरी सेंद्रिय व वैज्ञानिक शेतीकडे वळू लागले आहेत. त्यांनी त्यांच्या अनुभवातून जे शिकले ते खुलेपणाने इतरांना सांगितलं, मार्गदर्शन केलं आणि एक 'शेती प्रयोगशाळा'च उभी केली. डीडी सह्याद्रीवरील त्यांच्या मुलाखतीतून राज्यभरातील शेतकऱ्यांना त्यांच्या

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश- २ सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधीकरण यांचे न्यायालय**

मोटार अपघात दावा किरकोळ अर्ज क्र. ४१९/२०१९ **ने.ता. २५/०६/२०२५**

**पिटीशनर :-** नामदेव लक्ष्मणराव भानडेकर

विरुध्द

**रिस्पांडंट :-**सुरेश श्रीरामजी मुधोळकर व इतर

**बनाम :- उज्वला सुरेश मुधोळकर,** रा. वडारपुरा, ता. जि. अमरावती.

**APPLICATION U/SEC. 166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **नामदेव लक्ष्मणराव भानडेकर,** वय ५४ वर्षे, व्यापार -नोकरी, रा. वडारपुरा, ता. जि. अमरावती यांनी वि. सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधीकरण,
अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.
त्याअर्थी रिस्पांडंट **क्र. श्रीमती उज्वला सुरेश मुधोळकर,** वय ३५ वर्षे, व्यापार : घरकाम,रा. वडारपुरा, ता. जि. अमरावती यांनी **दि. २५.०६.२०२५** रोजी सकाळी ११.०० वाजता वि. सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, **वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश-२,** अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.
आज दिनांक ०२.०५.२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला असे.

अमरावती.
**दिनांक : ०२.०५.२०२५**
शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक** (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती

# आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी बच्चू कडू यांची प्रकृती खालवली

## विश्रोळी जलाशयात प्रहार पदाधिकाऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

### आज चांदूरबाजार बंदची हाक

**अमरावती/प्रतिनिधीः-**
शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून प्रहारच्या कार्यकर्त्यांनी आज मंगळवारीं १० जून रोजी पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या विश्रोळी येथील जलाशयात जलसमाधी आंदोलन केले आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणेवरील ताण वाढला आहे.बच्चू कडू यांनी गुरूकूंज मोझरी येथे गेल्या तीन दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. तिसऱ्या दिवशी बच्चू कडू यांची प्रकृती खालवली आहे. तरीपण शासन प्रशासनाने त्यांच्या मागणीकडे अद्यापही लक्ष दिले नाही. यामुळे आता पदाधिकारी-कार्यकर्त्यांमध्ये आक्रोश वाढत चालला आहे. संतापलेल्या कार्यकर्त्यांनी राज्यभरात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे तर दुसरीकडे अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ कार्यकर्त्यांनी जलाशयात उड्या घेतल्या. प्रहारचे पंधरा ते वीस कार्यकर्ते पूर्णा धरणाच्या जलाशयात घोषणा देत उभे होते. या आंदोलनाच्या समर्थनार्थ आज बुधवारीं ११ जून रोजी प्रहार तर्फे चांदूरबाजार बंद ची हाक दिली आहे. आज सकाळी सात ते दुपारी दोन ☞(पान २ वर)

### ■ शिवसेना ठाकरे गटाचा पाठिंबा

शिवसेना ठाकरे गटाने बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. दर्यापूर मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार गजानन लवटे यांनी गुरूकूंज मोझरी येथे पोहचून उपोषणस्थळी बच्चू कडू यांची भेट घेतली. त्यांच्या समवेत संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी हेही होते. आंदोलनाच्या प्रत्येक पायरीवर बच्चू कडू यांची साथ देण्याचा निर्णय गजानन लवटे यांनी जाहीर केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत बच्चू कडू यांची भेट घेणार असल्याचे संकेत गजानन लवटे यांनी दिले.परभणीचे शिवसेना ठाकरे गटाचे आमदार डॉ. राहुल पाटील यांनीही बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे. दिव्यांग व विधवा महिलांना ६ हजार रुपये मानधन देण्यात यावे, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी आणि शेतमालाला हमीभावाच्या वर २० टक्के अनुदान देण्यात यावे, अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत.



■ जनार्दन परसराम राऊत, (वनी, तालुका चांदूरबाजार, जि.अमरावती) यांनी जलसमाधी घेतल्यामुळे लगेच प्रशासनाने त्यांच्या मागील सहा महिन्याचा खोळंबलेला पगार एका क्षणात बँकेत जमा केला. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या यशस्वीतेला सुरुवात झाली आहे.



### ■ उद्धव ठाकरे मोझरीत येणार

माजी आमदार बच्चू कडू यांच्या आंदोलनाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने पाठिंबा दिला आहे. अशात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत हे बच्चू कडू यांना भेटण्यासाठी मोझरी येथे दाखल होणार असल्याची माहिती आमदार गजानन लवटे यांनी दिली आहे.

# माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांचा शिंदे गटात प्रवेश

अमरावती/मुंबई/प्रतिनिधीः-
महाराष्ट्रातील सत्तारूढ शिवसेना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाच्या राजकीय प्रवासात आज एक महत्त्वाचा टप्पा पार पडला. अमरावती जिल्ह्यातील बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि प्रखर जनाधार असलेले नेते ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आणि शिवसेनेचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसूळ यांच्या



उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. जलसंधारण मंत्री संजय राठोड, राष्ट्रीय सचिव कॅप्टन अभिजीत अडसूळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सोहळ्याने अमरावतीच्या राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली आहे.

ज्ञानेश्वर धाने पाटील हे विदर्भातील एक अभ्यासू, शांत आणि जनतेच्या प्रश्नांसाठी झगडणारे लोकप्रतिनिधी म्हणून परिचित आहेत. ☞(पान २ वर)

### स्थानिक नेतृत्वाचा एकत्रित प्रवेश :

धाने पाटील यांच्यासोबत एकूण १५० पेक्षा अधिक स्थानिक नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसेनेत दाखल झाले. उबाठा उपमहानगर प्रमुख व नगरसेवक सुनील राऊत, बडनेरा युवा सेना जिल्हा प्रमुख श्याम धाने पाटील, उपजिल्हा प्रमुख पवन दळवी, तालुका प्रमुख राहुल लांजेवर, स्थानिक नेते नीलेश तिवारी, संतोष मनोहर, नीलेश पारवे यांच्यासह अनेक कार्यकर्ते शिंदे गटात सामील झाले. या घटनेंमुळे केवळ बडनेराच नव्हे, तर अमरावती जिल्ह्यातील अनेक विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेनेची पकड अधिक मजबूत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# उबाठा जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांचा भाजपात प्रवेश

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले स्वागत

अमरावती/प्रतिनिधीः-
शिवसेना उबाठा गटाचे माजी जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी आज मंगळवारी १० जून रोजी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि आमदार रवी राणा यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला. खराटे यांच्या भाजपा प्रवेशाने राजकीय समीकरण बदलतील असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत खराटे यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहील. सुनील खराटे पूर्वाश्रमी चे भाजपाचे पदाधिकारी होते आणि ते तत्कालीन जगदीश गुप्ता यांचे समर्थक मानले जायचे. कालांतराने त्यांनी तत्कालीन खासदार आनंदराव अडसूळ यांच्या प्रभावाने शिवसेना उबाठा मध्ये प्रवेश केला. सुनील खराटे यांचे शिवसेना उबाठा मध्ये चांगलाच जम बसला होता. त्यांना मातोश्री वरून जिल्हाप्रमुख म्हणून जबाबदारी दिली होती. एवढेच नव्हे तर गेल्या विधानसभा निवडणुकीत ते बडनेरा मधून शिवसेनेचे उबाठाच्या तिकिटावर उमेदवार म्हणून लढले. त्यांना केवळ ७००० मते मिळाली. त्यांचे डिपॉझिट देखील जप्त झाले. शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यासाठी काम केले नाही. बडनेरा हा शिवसेनेचा गड असतानाही त्यांना अपेक्षित मते मिळाली नाही. त्यामुळे खराटे यांचा मोहभंग झाला होता. काही दिवसांपूर्वीपासून ते ☞(पान २ वर)



### ■ भाजपाचा अजेंडा देशाच्या विकासासाठी-खराटे

सुनील खराटे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच गृहमंत्री अमित शहा यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची कार्यक्षमता हीच देशाच्या विकासाची खरी दिशा आहे. मला राष्ट्रहितासाठी व्यापक पातळीवर काम करण्याची इच्छा आहे आणि ती संधी मला भारतीय जनता☞(पान २ वर)

# जिल्हाकचेरीवर किसान सभेचे शेतकरी कर्जमुक्ती आंदोलन

## -बच्चु कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला समर्थन

**अमरावती/प्रतिनिधीः-**
महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने १० जून रोजी राज्यभर आंदोलन छेडण्यात आले. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी कर्जमुक्ती आंदोलन करण्यात आले. शेतकरी कर्जमुक्तीच्या घोषणा देत जोरदार निदर्शने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आली. माजी आमदार बच्चू कडू यांचे गुरुकुंज आश्रम मध्ये ८ जून पासून सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनास जाहीर समर्थन दिले व तातडीने दखल घेऊन आंदोलकांशी बोलणी सुरू




करावी ,अशी मागणीही केली.

मुख्यमंत्र्यांच्या नावे शासनास दिलेल्या निवेदनामध्ये शेतकरी कर्जमुक्ती ,नवे शेती कर्ज व व्याजदर शून्य या मागण्यांच्या प्रामुख्याने समावेश आहे. त्याची विस्ताराने भूमिका विशद केली. शेती व शेतकरी सातत्याने अस्मानी व सुलतानी संकटाचा सामना करीत असून त्याबाबत उपाययोजना म्हणून डॉ. स्वामीनाथन आयोगाचे शिफारशीनुसार, उत्पादन खर्चाचे दीडपट आधार भाव शासनाने जाहीर करावा व एम एस पी चा केंद्रीय कायदा करावा, ही सूचना केली आहे .परंतु सरकारने तसे काही केले नाही. त्यामुळे शेतीतील उत्पन्नापेक्षा शेतमालाचा खर्च जास्त होऊन कर्जबाजारीपण अधिकच वाढला.बँकेचे कर्ज थकीत झाले. यास सरकार जबाबदार आहे. कर्जामध्ये खाजगी सावकार ,मायक्रो फायनान्स कंपन्या, राष्ट्रीयकृत बँक, बचत गट यांचा समावेश आहे .कर्जे कृषी ,मत्स्यपालन, कुक्कुटपालन ,ट्रॅक्टर, शिक्षण या प्रकारच्या या सर्व कर्जातून शेतकरी मुक्त करावा, अशी भूमिका आहे. तसेच सर्व शेती संसाधनाच्या वाढत्या किमतीमुळे शेतमाल उत्पादन खर्च वाढला आहे. त्यामुळे☞(पान २ वर)

# बडनेरा पोलिसांची अवैध दारूवर धडक कारवाई

### दोन आरोपी गजाआड, ७० हजारांचा अवैध साठा जप्त

**अमरावती /प्रतिनिधीः-**
बडनेरा पोलीस ठाणे हद्दीतील बेकायदेशीर देशी दारू वाहतुकीवर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत एकूण ७०,६०० रुपये किमतीचा अवैध देशी दारूचा साठा व दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

मंगळवारी बडनेरा परिसरात दोन तरुण दुचाकीवरून संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना



मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचत त्या तरुणांना थांबवून त्यांच्या पोत्यांची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध देशी दारू साठवलेली आढळून आली. रोहित अरविंद वानखडे (वय २६, रा. ☞(पान २ वर)

# निम्न पेढी प्रकल्पातील बाधित गावांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य- -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## -नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी प्रयत्न करणार

अमरावती/प्रतिनिधीः-
जिल्ह्यातील दुसरा मोठा सिंचन प्रकल्प म्हणून निम्न पेढी प्रकल्प साकारण्यात येत आहे. यातील भुसंपादनाची प्रक्रिया पार पडली आहे. सात गावातील बहुतांश नागरिकांनी पुनर्वसित गावात स्थलांतरही केले आहे. प्रकल्पातील बाधित गावांच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य देण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात निम्न पेढी प्रकल्पातील बाधित गावांच्या पुनर्वसन, वाढीव



मोबदला आणि पुनर्वसित गावातील मूलभुत आणि नागरी सुविधांचा आढावा घेण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी मिन्नू पीएम., अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी प्रसेनजित चव्हाण, सिंचन विभागाच्या अधिक्षक अभियंता मेघा अक्केवार, तहसिलदार विजय लोखंडे, अजितकुमार येळे आदी उपस्थित होते.☞(पान २ वर)

# आरडी एजंटकडील पैसे हिसकावणारा आरोपी ताब्यात

## एक अद्यापही फरार, गुन्हे शाखा युनिट एकची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः-
खोलापुरी गेट पोलीस ठाणे हद्दीतील बुधवारा टाकसाळ भागातील एसबीआयच्या एटीएममध्ये घुसून आरडी एजंटकडील ३० हजार रुपये हिसकावून पळ काढणाऱ्या आरोपींपैकी एकास गुन्हे शाखेच्या युनिट १ च्या पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेले दुचाकी वाहनही जप्त करण्यात आले आहे. आरोपीचे नाव चेतन हिरालाल प्रधान (वय २५, रा. परदेशीपुरा, महाजनपुरा, अमरावती) असे असून दुसरा



आरोपी अंकुश कोठार सध्या फरार आहे.

पोस्ट ऑफिसमध्ये आरडी खाते चालवणारे एजंट अरविंद जहांगीरदार हे ८ जूनच्या रात्री बुधवारा परिसरातील एसबीआय एटीएममधून पैसे काढत होते. त्यांनी त्यांच्या एटीएम कार्डद्वारे प्रत्येकी १० हजार असे तीन वेळा करून एकूण ३० हजार रुपये काढले. पैसे मोजत असताना सुमारे ३० ते ३५ वयोगटातील एक युवक एटीएममध्ये घुसला आणि अरविंदच्या हातातील ३० हजार रुपये हिसकावून बाहेर थांबलेल्या दुचाकीवरील दुसऱ्या आरोपीकडे जाऊन माताखिडकीच्या दिशेने पळून गेला. या प्रकरणी अरविंद जहांगीरदार यांनी खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. गुन्ह्याचा तपास सुरू असताना गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाने स्वतंत्र तपास सुरू केला होता. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. गोपनीय माहितीच्या आधारे महाजनपुरा येथून चेतन प्रधान याला ताब्यात☞(पान २ वर)

# लग्नाचे आमिष देऊन महिलेवर लैंगिक अत्याचार

## अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-**
लग्नाचे आमिष दाखवून २४ वर्षीय विवाहित महिलेवर तिच्या दिराने वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. २९ मे ते ८ जून २०२५ दरम्यान ही घटना घडल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.



पीडित महिलेच्या पतीचे एचआयव्ही संक्रमणाच्या दीर्घ आजाराने मृत्यू झाला. त्यानंतर दिराने विवाहितेला लग्नाचे आमिष दाखवत याचा गैरफायदा घेत २९ मे रोजी रात्री लैंगिंक अत्याचार केला. पिडित महिला ही रात्री झोपेत असताना आरोपी दिर हा घरात शिरला आणि☞(पान २ वर)

# १४ जूनला अमरावतीत जिल्हा काँग्रेसचा मशाल मोर्चा

## राष्ट्रपती, राज्यपालांना दिलं जाणार निवेदन, मतदारांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरणार

### जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांची पत्रकार परिषदेतून माहिती

**अमरावती /प्रतिनिधीः-** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत झालेल्या गंभीर अनियमितता, मतमोजणी प्रक्रियेमधील संशयास्पद घडामोडी, आणि निवडणूक आयोगाच्या संदिग्ध भूमिकेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरणार आहे. याकरिता जिल्हा काँग्रेसच्या वतीने मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय येथे १४ जून रोजी सायंकाळी पाच वाजता जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्यानंतर येथून मशाल मोर्चाला सुरुवात होईल, इर्विन चौक येथे बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केल्यानंतर मोर्चाचा समारोप



होईल, याबाबत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी आज (दि.१०) आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत माहिती दिली.

यावेळी खासदार बळवंत वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. बबलू देशमुख म्हणाले, 'ही निवडणूक निष्पक्ष नव्हती. मतदार यादीतील तांत्रिक चुका, ईव्हीएममध्ये हस्तक्षेप, आणि प्रशासनाच्या दबावामुळे निवडणूक आयोगाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. काँग्रेस पक्षाने वेळोवेळी यावर आक्षेप नोंदवले आहेत. पण अद्याप कोणतेही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही.'

'लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी जनता जागृत झाली पाहिजे. काँग्रेस पक्ष केवळ सत्ता ☞(पान २ वर)

# महावितरणच्या डीपीला लागली आग

अमरावती/प्रतिनिधीः-
स्थानिक सक्कर साथ येथील छत्रपुरी खिडकी परिसरातील महावितरणच्या डीपीला आज मंगळवारीं १० जून रोजी सकाळी अचानक आग लागली. यामुळे परिसरात खळबळ उडाली होती. अग्निशमन विभागाच्या वाहनाने घटनास्थळावर पोहोचून आगीवर नियंत्रण आणले. त्यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. सुदैवाने मोठा अनर्थ यामुळे टळला. व्यापारी क्षेत्र असल्यामुळे येथे नेहमी नागरिकांची गर्दी असते. अशाच आज सकाळी इथे महावितरणच्या डीपीला आग लागली. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली होती.

